म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ८८८
REFBK-0005031

[illegible]

[illegible] ग्रंथ संग्रह [illegible]
[illegible]
[illegible]

नि. ७०८

## रघुनाथ गोविंद सरदेसाई

# खुसखुशी

(विनोदी लेखसंग्रह)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५०३७
REFBK-0005031

कॉन्टिनेंटल बुक सर्व्हिस, पुणे २

प्रकाशक
**गो. रा. पाटणकर,**
**कॉन्टिनेंटल बुक सर्व्हिस,**
टिळकरोड, पुणें २

पुनर्मुद्रणाचे, भाषान्तराचे, उतारे घेण्याचे वगैरे सर्व प्रकारचे
हक्क श्री. **रघुनाथ गोविंद सरदेसाई** यांच्या स्वाधीन.

**किंमत १॥ रुपया**

मुद्रक
**वि. गं. केतकर,**
६२४ सदाशिव, पुणें २

मुद्रणस्थळ
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव, पुणें २



# खुसखुशी

र. गो. सरदेसाई

# कोण काय म्हणतात—

## चित्रा (कथासंग्रह)

★ मानवी हृदयांतल्या नाजुक आणि गूढ भावना हळुवारपणानें छेडून त्या रेखीव, सुश्लिष्ट भाषेंत चित्रित करण्याचें लेखकाचें कौशल्य पहिल्या प्रतीचें असून, एकाद दुसऱ्या घटनेच्या भोंवतीं ते कथेंतील भावना-जाल मोठ्या शिताफीनें गुंफतात. —महाराष्ट्र

★ मनोवेधक घटना, साधे प्रसंग, सोपी भाषा आणि हळुवारपणें हाताळलेल्या भावनांच्या जोडीला सूक्ष्म निरीक्षण ह्यांमुळें व नक्षत्रासारख्या चमकणाऱ्या व्यवहार्य उपमांमुळें चित्रासारखा हा संग्रह उठून दिसतो.—काळ

★ लेखकाच्या गुणसंपन्न व्यक्तित्वाच्या विविध छटा पाहण्याच्या दृष्टीनें चित्रा हा त्यांच्या लघुकथांचा नवा संग्रह वाचकांना विशेष अभ्यसनीय वाटेल. —झंकार

## स्वाति (कथासंग्रह)

★ स्वातींत खरीं कथा-मौक्तिकें आहेत. —किर्लोस्कर

★ भावनांचें नाजुक रेखाटण, मनाचा वेध घेणारी वर्णनशैली आणि हृदयाला हलविणारे रसप्रसंग यांच्यामुळें हा कथासंग्रह सध्यां मराठी वाङ्मयांत पडत असलेल्या गोष्टींच्या श्रावण झडींत स्वाति मौक्तिक बिंदूसारखा वाटेल. —महाराष्ट्र

## कागदी विमानें (लघुनिबंधसंग्रह)

★ श्री. सरदेसाई यांच्यांत निरीक्षणबुद्धि भरपूर असून तिच्या जोडीला त्यांना तरल कल्पनाशक्तीचीही देणगी मिळाली आहे, त्यामुळें त्यांचे सर्वच लघुनिबंध मनोरंजक आणि मनाची पकड घेणारे झाले आहेत. —महाराष्ट्र

★ विनोदप्रचुर उदाहरणें, ठिकठिकाणीं विखुरलेलीं संस्कृत, इंग्रजी सुभाषितें, यामुळें यांतील कोणताही निबंध वाचावासा वाटतो. —केसरी

★ श्री. सरदेसाई यांना आपल्या 'कागदी विमानें' या पहिल्याच निबंधसंग्रहानें मराठी निबंधकारांच्या श्रेणींत आघाडीवर स्थान मिळेल, याबद्दल मला शंका वाटत नाहीं... सरदेसाई जसे समीक्षक आहेत तसेच कवि म्हणजे कल्पकही आहेत... वृत्तव्यवसायांत राबणाऱ्या कल्पक माणसांनाही कवीची अंतर्भेदी, स्वप्नशील दृष्टि कशी लाभलेली असते, याचें श्री. सरदेसाई यांचीं 'कागदी विमानें' हें एक सुंदर प्रत्यंतर आहे.

—रेडिओवरून परीक्षण (श्री. माडखोलकर)

माझे बंधु

**सीताराम गोविंद सरदेसाई**

यांस

# सुरसुरी

# सुरसुरी

कॉन्टिनेंटल बुक सर्व्हिस, पुणें २

# सुरसुरी

वाङ्मयांतील दुफळीचें दृश्य
अखिल भारतीय पुण्यपत्तनस्थ देवपरिषद
म्युनिसिपल सभांचा अहवाल
साहित्य संमेलनाची सर्कस
टिनमेकरची साहित्यसेवा
नोकरीची लायकी
माझें हस्तलिखित मासिक
मुलाखती
खुलासे
अपरिहार्य कारण
पुरणांत मीठ !
नगरशेटांचें आभारप्रदर्शन !
आठवणी-लेखनाची कला
एका सिनेमा तारकेची मुलाखत
पिता-पुत्र !
एका वर्तमानपत्राचें मत
चहाच्या कपाला पैसा !
एक सत्कार-समारंभ
समाधि-लेखांतील विनोद

कॉन्टिनेंटल बुक सर्व्हिस, पुणें २

दा. क्र. ५०३७

# वाङ्मयांतील दुफळीचें दृश्य !

नवजीवन मासिकाच्या जून (१९३४) च्या अंकांत महाराष्ट्र-भाषा-भूषण ज. र. आजगांवकर यांचा "वाङ्मयांत देखील दुही" या मथळ्याचा जो छोटा लेख प्रसिद्ध झाला आहे, तो वाचून मला प्रस्तुत लेखाची कल्पना सुचली, हें प्रथमतःच सांगून टाकलेलें बरें. रा. आजगांवकरांनीं नवमतवादी लेखकांचा जो उपहास आपल्या लेखांत केला आहे, तो बराचसा एकदेशीय व अतिरंजित आहे. त्यांचीच कल्पना घेऊन मीं या लेखासाठीं एक कल्पनाचित्र तयार केलें आहे. नुकत्याच इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या दोन देशांत सुरू असलेल्या टेस्ट मॅचेस्मुळें वर्तमानपत्रांतून क्रिकेटच्या खेळाला बरेंच प्राधान्य दिलें जात होतें. रा. आजगांवकरांनीं साहित्यिकांचे जे दोन गट कल्पिले, त्यांमध्यें असा एक चेंडूफळीचा कसोटीचा सामना झाला, अशी कल्पना केली तर त्याचा वर्तमानपत्रांत येणारा सविस्तर वृत्तांत खालील स्वरूपाचा होईल असें मला वाटतें. रा. आजगांवकरांच्या लेखामुळें मला ही कल्पना सुचली असल्यामुळें त्यांचें ऋण मी त्यांना एका संघामध्यें स्थान देऊन फेडण्याचा यत्न केला आहे, तो त्यांना मान्य होवो म्हणजे झालें !

## नवमतवाद्यांचा अपूर्व विजय !
## चेंडूफळीचा कसोटीचा सामना
## कर्वे, वरेरकर, फाटक व दिवेकरशास्त्री यांचा जंगी स्कोअर
## जीर्णमतवाद्यांचें बोलिंग झोडपून काढलें

*विभावरीबाईंनीं भालाकारांची दांडी उडविली !!*

**( आमच्या खास बातमीदाराकडून )**

काल रोजीं पुणें येथें पेशवाईंतील प्रसिद्ध कबुतरखान्यांत मराठी

वाङ्मयांतील जीर्णमतवादी व नवमतवादी साहित्यिकांचा एक कसोटीचा क्रिकेटचा सामना झाला. सामना पाहण्यास रसिक स्त्री-पुरुषांची खूपच गर्दी लोटली होती. जीर्णमतवाद्यांच्या तंबूंत पेशवाई पागोटीं व पुणेरी पगड्या आणि उपरणीं व रुमाल यांची गर्दी दिसत होती. सर्वत्र पिकल्या मिशांचें प्रदर्शन भरल्यासारखें वाटत होतें. म्हातारे पेन्शनर लोक त्या तंबूंत विशेष दिसत होते. या तंबूंत एकही स्त्री—वृद्धा, प्रौढा, तरुणी, कुमारी किंवा बालिकाही औषधालासुद्धां दिसत नव्हती, तर तिकडे नवमतवाद्यांच्या छावणींत सुंदर सुंदर तरुण कॉलेजकन्यका रंगीबेरंगी पातळांनीं व नाना तऱ्हांच्या केशरचनांनीं विभूपिलेल्या अशा सर्वत्र तारकांप्रमाणें विखुरलेल्या होत्या. या स्त्री-पुरुष संमेलनामुळें समाजांत भ्रष्टाकार माजतो असें मानणाऱ्या जीर्णमतवाद्यांपैकीं कैक जण डोळे विस्फारून खेळ पाहण्याऐवजीं या तारांगणाकडेच पाहात होते. मग तृतीय नेत्र उघडून मदनाला जाळणाऱ्या शंकराप्रमाणें त्यांच्या त्या नेत्रांत राग सळसळत होता कीं काय सांगतां येत नाहीं! नवमतवाद्यांच्या छावणींत शिरस्त्राणें अभावानें तळपत होतीं. त्यांची जागा पोमेड लावून भांग काढलेल्या केशाच्छादनानें भरून काढली होती.

सामना सुरू झाला त्या वेळेस सूर्यप्रकाश भरपूर असून विकेटही सुस्थितींत होती. बरोबर दहा वाजतां खेळास सुरुवात झाली. दोनही बाजूंचे संघ पुढें दिल्याप्रमाणें होते (नांवें बॅटिंग ऑर्डरप्रमाणें दिलीं आहेत).

## सनातनी संघ

१. आहिताग्नि राजवाडे (ओपनिंग बॅट्स्मन व फर्स्ट स्लिप)
२. ह. भ. प. पांगारकर (ओपनिंग बॅट्स्मन व कव्हरवरील क्षेत्ररक्षक)
३. श्री. दा. सातवळेकर (कॅप्टन व स्लो बोलर)
४. व्यं. ग. जावडेकर (प्रबोध, धुळें) (मिडियम् स्पेस बोलर)
५. शं. श्री. देव (शॉर्ट लेग फिल्डर)
६. भा. व. भोपटकर (बोलर व लेगकडील क्षेत्ररक्षक)
७. श्री. म. माटे (बॅट्स्मन व चेंज बोलर)
८. वा. कृ. भावे (गलीमधील फिल्डर)
९. दा. न. शिखरे (सिली मिड ऑफ वरील फिल्डर)

१०. शं. दा. पेंडसे (विकेटकीपर)
११. गो. म. जोशी (फास्ट बोलर व सेकंड स्लिप)
१२. महाराष्ट्र भाषाभूषण ज. र. आजगांवकर (रिझर्व)
सनातन्यांचे अंपायर :—न. चिं. केळकर
स्कोअरर :—कृष्णराव मराठे

## नवजवान संघ

१. पु. य. देशपांडे (ओपनिंग बॅट्स्मन व ऑफ साइड फिल्डर)
२. न. र. फाटक (ओपनिंग बॅट्स्मन व फर्स्ट स्लिप)
३. र. धों. कर्वे (कॅप्टन व फास्ट बोलर)
४. भा. वि. वरेरकर (लेफ्ट हॅंड बोलर, बॅट्स्मन)
५. ना. सी. फडके (बॅट्स्मन व विकेटकीपर)
६. दिवेकरशास्त्री (बॅट्स्मन व मिडियम स्पेस बोलर)
७. प्र. के. अत्रे (सिली मिड ऑफ फिल्डर)
८. श्री. वि. वर्तक (बॅट्स्मन)
९. विभावरी शिरूरकर (गल्लीमधील फिल्डर)
१०. खरा ब्राह्मणकर्ते ठाकरे (स्पीड मर्चंट व सेकंड स्लिप)
११. अनंत काणेकर (चेंज बोलर)
१२. शं. वा. किर्लोस्कर (रिझर्व)
नवजवान संघाचे अंपायर :—वा. म. जोशी
स्कोअरर :—गो. गो. अधिकारी।

नवजवान टीमचे कॅप्टन र. धों. कर्वे यांनीं टॉस जिंकून बॅटिंग पत्करलें. पं. सातवळेकर यांच्या नेतृत्वाखालीं सनातनी साहित्यिकांचे खेळाडू क्षेत्र-रक्षणासाठीं क्रीडागणांत उतरले. बाराबंदी बंडी व काचा न मारलेला पंचा हा त्यांचा 'गणवेष' पाहून तरुण प्रेक्षकवर्गांतून हास्यध्वनि खळखळला व उपरोधिक टाळ्यांच्या गजरांत "वक अप् सनातनीज्" चा जयघोष झाला. इतक्यांत विरुद्ध बाजूच्या छावणींतून नवजवानांची पहिली जोडी देशपांडे व फाटक ही बाहेर पडली. देशपांडे खादीच्या वेषांत असून फाटकांच्या तुळतुळीत गोट्यावर सूर्यकिरणें परावर्तित होत होतीं. त्यामुळें थोडा हंशा पिकला !

देशपांडे व फाटक या पहिल्या जोडीनें सुरुवातीसच खेळास रंग भरण्यास सुरुवात केली. पॅव्हेलियन एंडकडून भालाकार भोपटकर व विरुद्ध दिशेनें गो. म. जोशी हे गोलंदाजी करीत होते. भालाकारांची पहिलीच 'डिलिव्हरी' देशपांड्यांनीं सरहद्दीला पाठवून टाळ्या मिळविल्या, आणि त्याच ओव्हर-मध्यें देशपांड्यांनीं दोन-दोनचे दोन फटकारे मारून आठ धांवा काढल्या. दुसऱ्या बाजूनें जोशी यांची पहिली ओव्हर मेडन झाली. फाटक हे जरा धिम्मे-पणानें खेळत होते. पण कोणाही खेळाडूला गोलंदाजीबद्दल दहशत अशी मुळींच वाटत नव्हती. जोशी यांची गोलंदाजी गुडलेंग्थ पडत होती; पण भालाकार बरेचसे नोबॉल्स टाकून प्रतिपक्षाला निष्कारण धांवांची मदत करीत होते! त्यामुळें अवघ्या वीस मिनिटांत धांवांचा आंकडा पंचवीसवर गेला. तेव्हां भालाकारांच्या जागीं जावडेकरांना चेंडू देण्यांत आला. त्यांची गोलंदाजी बरी पडत होती, पण देशपांडे व फाटक यांच्या टोलेबाजीपुढें तिचें तेज पडेना. खेळास रंग भरून धांवा वाढत होत्या. सनातन्यांचें क्षेत्ररक्षण निकृष्ट दर्जाचें होतें. विशेषतः भालाकार, पांगारकर, भावे व राजवाडे यांच्या हातून चेंडू निसटून सरहद्दीस जात असे. पहिली जोडी चांगली टिकून राहील, असा रंग दिसत होता. इतक्यांत जोशी यांच्या एका गलथान चेंडूला फटका मारण्यासाठीं पुढें गेलेल्या देशपांड्यांना पेंडशांनीं स्टंप केलें. त्या वेळेस त्यांच्या धांवा ३२ झाल्या होत्या. देशपांडे हे आपल्या 'बंधनाच्या पलीकडे' नामक बॅटनें खेळत होते, तर फाटकांच्या हातीं 'रामदासी राजकारणा'ची बॅट होती. देशपांड्यांच्या जागीं नवजवान संघाचे कप्तान कर्वे हे 'समाज-स्वास्थ्या'ची बॅट घेऊन आले. त्या बॅटवरील नग्न स्त्रीचें चित्र पाहून सनातन्यांचे स्कोअरर कृष्णराव मराठे इतके संतापून गेले कीं, स्कोअर मांडून घेण्याचेंही ते कांहीं काळ विसरले व त्या बॅटीकडेच नुसते पाहात (रागानें) राहिले, असें म्हणतात! कर्वे यांची खेळाची पद्धत अतिशय निर्भय व धडाडीची होती. क्रीडांगणाच्या चारही बाजूंस ते सणसणीत टोले हाणीत होते. खेळाला अपूर्व रंग चढला. धांवा भराभर वाढूं लागल्या. शतक पुरें झालें, तेव्हां नवजवानांनी टाळ्या वाजवून आनंद प्रदर्शित केला. पण तो फार काळ टिकला नाहीं. कारण इकडे जोश्यांच्या जागीं आलेल्या सातवळेकरांच्या गोलंदाजीवर फाटक हे एल्. बी. डब्ल्यू. झाले (धांवा ५७). 'हाऊ इज् दॅट'

असा सातवळेकरांनीं ओरडा केला, तेव्हां भालाकार पी. डब्ल्यू. डी. म्हणून गरजले ! तेव्हां प्रेक्षकवर्गांत प्रचंड हंशा पिकला ! ! फाटकांच्या जागीं 'विधवा कुमारी 'ची बॅट घेऊन वरेरकर खेळावयास आले. तेव्हां कित्येक पुणेकर प्रेक्षकांनीं 'शेम शेम' म्हणून ओरडा केला. पण त्या वेळेस गोलंदाजी करणाऱ्या माटयांचे चेंडू निर्भयपणें चोपून वरेरकरांनीं तो बकवा बंद केला. कर्वे-वरेरकर ही मुंबईकर खेळाडूंची जोडी पूर्ण निर्भयतेनें व आत्मविश्वासानें खेळत होती. सातवळेकरांनीं गोलंदाजींत अनेक फेरफार करून पाहिले. पण पुणेकर गोलंदाजांचें तेज पडेना. क्षेत्ररक्षक दमून गेले. कर्वे-वरेरकर यांचे सणसणीत टोले अडविण्याचें सामर्थ्य कोणांतच दिसेना. तेव्हां सनातनी तंबूंत विषण्णतेचें वातावरण पसरलें. अखेर धांवांचें शतक कर्वे यांनीं पुरें केलें. पण त्यानंतर लौकरच जोशी यांच्या गोलंदाजीवर त्यांचा कॅच उडाला तो आहिताग्नींनीं झेलला. टाळयांच्या कडकडाटांत कर्वे पॅव्हेलियन-मध्यें परतले. त्यांची जागा तरुणांचे आवडते 'जादूगार' फडके यांनीं घेतली. त्यांची 'मानसमंदिरा 'ची बॅट दिसायला मोठी मोहक होती. फडक्यांचा खेळ पाहण्यास सारे रसिक तरुण अधीर झाले होते. "बक् अप्, अप्पासाहेब !" या लोकगर्जनेला प्रोफेसरसाहेबांनीं मधुर स्मितपूर्वक मान ऐटीनें लववून उत्तर दिलें. फडक्यांच्या विरुद्ध सातवळेकर गोलंदाजी करीत होते. पण त्यांच्या गोलंदाजीला टोलेबाजीचें उत्तर देण्याऐवजीं फडके त्याची उपेक्षाच करीत. अगदीं अंगावर आल्याखेरीज झोडपायचें नाहीं, या त्यांच्या धोरणा-मुळें त्यांचा खेळ पाहण्यासाठीं जमलेल्या प्रेक्षकांची निराशा झाली. इकडे वरेरकर मात्र सनातन्यांची गोलंदाजी यथेच्छ चोपीत होते. त्यांचा एक फटकारा अडविण्याचा प्रयत्न केल्यामुळें भालाकारांचीं बोटें चिंबलीं व त्यांना तंबूचा रस्ता धरावा लागला. त्यांच्या जागीं आजगांवकर क्षेत्ररक्षणास आले. त्यांनीं येतांच फडके यांचा एक सोपा झेल झेलल्यामुळें सनातन्यांनीं त्यांना शाबासकी दिली. फडके यांच्या अवघ्या २० धांवा झाल्या होत्या. या वेळेस नवजवान संघाचे चार गडी बाद होऊन २६७ धांवा झाल्या होत्या. फडक्यांच्या ऐवजीं दिवेकरशास्त्री आले. तेव्हां सनातन्यांच्या तंबूतून उपरोधिक टाळ्या व 'शेम शेम 'चा गलका ऐकू आला. त्यांच्या हातांतील 'बुवाबाजी 'च्या बॅटनें सुरुवातीस आपलें पाणी दाखवून जोश्यांच्या

चेंडूला हद्दपार केलें. दिवेकर हे जोमानें पण काळजीपूर्वक खेळत होते. त्यांच्या विरुद्ध जोशी, भोपटकर व जावडेकर यांची चेंडूफेंक निष्प्रभ ठरत होती. दिवेकर-वरेरकर ही जोडी टिकन राहील असें वाटत होतें. पण ती आशा सफळ झाली नाहीं. कारण घाईनें एक छोटी धांव घेण्याच्या भरीस पडून वरेरकर हे रनआऊट झाले. शिखरे यांनीं बरोबर स्टंपवर चेंडू फेंकला व वरेरकरांना बाद करण्याचें श्रेय मिळविलें. त्यांच्या ७० धांवा झाल्या होत्या. त्यांच्या जागीं अत्रे आले, तेव्हां तरुण प्रेक्षकांतन ' वरेरकर-अत्रे आतां सोन्याचा कळस करा ' असा इषारा झाला. अत्र्यांचा धिप्पाड देह पाहून ते 'स्टोन बॉलिंग ' करतील असें वाटत होतें. पण ते सेटअप् होण्यापूर्वीच माटे यांच्या गोलंदाजीनें त्यांचा त्रिफळा उडविला. त्यांच्या हातीं ' साष्टांग नमस्कारा 'ची बॅट होती, तीवर ' ब्रँडीच्या बाटली 'चें चित्र होतें. त्यांच्या अवघ्या ७ धांवा झाल्या. त्यांच्या जागीं ' आंधळ्यांच्या शाळे 'ची बॅट घेऊन वर्तक आले. सुरुवातीस सातवळेकरांच्या गोलंदाजीवर एक धांव काढून त्यांनीं आपला भोपळा फोडला. इकडे दिवेकर चांगले सेट झाले होते. यांचें अर्धशतक फळचावर लागलें, तेव्हां ' वेल प्लेड शास्त्रीबुवा ! ' अशी शाबासकी त्यांना मिळाली. वर्तक यांनीं जोश्यांच्या गोलंदाजीवर बाऊंडरी घेण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. जलदगति चेंडू चपलतेनें यष्टिरक्षकाच्या हातीं लपल्यानें हा ' लपंडाव ' वर्तकांच्या अंगलट आला. या वेळेस त्यांच्या धांवा १३ झाल्या होत्या. दिवेकर (नॉटआऊट) यांच्या ५१ व जादा २३ मिळून या वेळेस नवजवान संघाच्या एकूण ३७३ धांवा झाल्या होत्या. येथें सातवा गडी बाद झाल्यावर कर्वे यांनीं आपल्या संघाचा खेळ पुरा झाल्याचें जाहीर केलें व सनातन्यांना खेळास संधि दिली. नवजवान संघाचा खेळ एकूण तीन तास चाळीस मिनिटें चालला होता. त्यांच्यापैकीं बहुतेक जणांनीं हद्दपार फटकारे मारूनच स्कोअर वाढविला होता. कर्वे, वरेरकर, फाटक व दिवेकर यांचा खेळ प्रेक्षणीय व प्रशंसनीय झाला.

सनातन्यांच्या बाजूनें जोशी यांची गोलंदाजी बरीच यशस्वी झाली. पण त्यांना दुसऱ्या गोलंदाजांकडून मिळावें तसें साहाय्य मिळालें नाहीं. त्या संघाचे दुसरे विश्वस्थ गोलंदाज भालाकार यांनीं आयत्या वेळीं नोबॉल्सची सरबत्ती करून अवसानघात केला ! सातवळेकर व जावडेकर यांची गोलं-

दाजी सुलंब व व्यवस्थित पडत होती. पण तींत पुरेसा जोम नव्हता. त्यामुळें खेळाडूंना तिचा दरारा केव्हांच वाटला नाहीं. सनातन्यांच्या संघांत एक-दोन फास्ट बोलरांची उणीव स्पष्टपणें भासत होती.

क्षेत्ररक्षणाच्या दृष्टीनें शिखरे, पेंडसे, माटे व देव यांची कामगिरी डोळ्यांत भरण्यासारखी झाली. पण एकंदरीनें पाहतां क्षेत्ररक्षण सामान्य दर्जाचेंच होतें. बरेचसे झेल सोडण्यांत आले. खेळाडूनें चेंडू फटकारल्यावर पळत्या चेंडूमागून धांवणारे क्षेत्ररक्षक फार ! शिवाय संघभावनेचा सनातन्यांत पूर्ण अभाव दिसत होता. एकमेकाला साहाय्य करण्याच्या वृत्तीपेक्षां आपल्या पायापुरतेंच पाहण्याकडे सर्वांचा कल असल्याचा प्रेक्षकांचा ग्रह होई.

नवजवान संघाचा खेळ संपल्यावर टिफिन् घेण्यांत आली. नवजवान संघांतील 'खरा ब्राह्मण' ठाकरे यांच्याशीं पंगत करण्यास सनातन्यांचा विरोध दिसून आल्यामुळें दोनही संघांच्या उपाहाराची व्यवस्था वेगवेगळी ठेवण्यांत आली होती. या कामीं अधिकारी यांनीं अत्यंत श्रमपूर्वक व्यवस्था केली, याबद्दल सर्वांस त्यांचें कौतुक वाटलें. जरी पंक्ति वेगळ्या केल्या होत्या तरी दोनही संघांच्या उपाहाराचा खर्च नवमतवाद्यांनीं अत्यंत आनंदानें विना 'कुरकूर' सोसला. दोन्हींकडे खाद्यपेयांचे पदार्थ मात्र वेगवेगळे होते. एकीकडे पुरी, प्रसाद, पाटवड्या व बत्तासे हे मुख्य पदार्थ व गोमूत्रमिश्रित आटीव दूध व सदाशिवपेठी हौदाचें पाणी हे पेय-जिन्नस होते; तर दुसरीकडे बनपाव-मस्का, आम्लेट, कांद्याचीं भजीं, शिरा वगैरे पदार्थ, व चहा-कॉफी हे पेय-जिन्नस होते. नवजवान संघाकडे सोडावॉटरच्या गोल बाटल्यांबरोबरच एकदोन चपटया बाटल्याही खपल्या अशी किंवदंति आहे. दिवेकरशास्त्र्यां-साठीं मात्र केळीं व चुरमुरे यांची सोय केली होती. नवजवान संघ सरमिसळीनें एकत्र बसून उपाहाराचा समाचार घेत होता. पण सनातनी संघांत मात्र शिखरे व आजगांवकर यांना काटकोनांत बसविण्यांत आलें होतें असें म्हणतात! खरेंखोटें सर्वसाक्षी 'भास्कर'च जाणे ! क्षेत्ररक्षणांत केलेल्या कुचराईची उणीव भोजनभैरव भालाकार व दूधभात-परायण पांगारकर यांनीं उपाहाराच्या वेळीं चांगलीच भरून काढल्याचें कळतें.

बरोबर दोन वाजतां खेळास उपाहारानंतर पुनः सुरुवात झाली. नव-जवान संघाचे गडी लढाई जिंकण्याच्या ऐन उमेदीनें क्रीडांगणावर आपापल्या

नियुक्त ठिकाणीं सज्ज उभे ठाकले. सनातन्यांची सुरुवातीची जोडी अहिताग्नि राजवाडे व पांगारकर पॅव्हेलियनमधून बाहेर पडतांच सनातन्यांनीं टाळ्या वाजवून त्यांना उमेद देण्याचा यत्न केला. नवजवान संघाचे स्पीड-मर्चंट ठाकरे, यांच्या गोलंदाजीला तोंड देण्याचें बिकट काम राजवाडे यांना करावें लागत असल्यामुळें त्यांनीं संरक्षक पद्धतीचा अवलंब करून आपली "वैदिक धर्मा"ची बॅट ठाकरे यांच्या चेंडूच्या वाटेस न जाईल अशी काळजी घेण्यास सुरुवात केली. त्यामुळें ठाकरे यांच्या पहिल्या कांहीं ओव्हर्स निर्धाव गेल्या. दुसऱ्या बाजूनें 'मुमुक्षू'ची बॅट हातीं घेतलेल्या पांगारकरांवर हल्ला करण्याचें काम मध्यमगति गोलंदाज दिवेकरशास्त्री यांजकडे सोंपविलें होतें. शास्त्रीबुवांचा एकादा गलथान चेंडू लेगला फटकारून पांगारकर मधूनच एकादी धांव 'चोरीत' होते, पण दोन्हींकडचा हल्ला व्यवस्थितपणें होत असल्यानें धांवांचें प्रमाण कमी होतें. फळ्यावर दहा धांवा लागण्यास अर्धा तास लागला. होतां होईल तों चेंडूफळीची गांठ पडूं न देण्याचें खेळाडूंचें धोरण ध्यानीं येतांच नवजवान संघाचे लारवुड ठाकरे यांनीं बॉडीलाइन बोलिंग सुरू केलें. त्याचा तत्काळ परिणाम होऊन राजवाड्यांची मधली स्टंप तीन कोलांट्या खाऊन पडली व डोक्यास बांधलेल्या शालजोडीचा कांठ चांचपीत त्यांना तंबूचा रस्ता धरावा लागला (१७–१–५). त्यांच्या जागीं सातवळेकर आले. धिम्मे व शिस्तशीर खेळण्याचें धोरण पत्करून त्यांनीं सनातनी तंबूंत बरीच आशा उत्पन्न केली. सुमारें तासाच्या खेळानंतर फळ्यावर ३० आंकडा झळकला. तेव्हां सनातन्यांनीं टाळ्या पिटून आनंद प्रकट केला. पण त्या टाळ्यांचा आवाज शांत होण्यापूर्वींच दिवेकरांच्या चेंडूवर पांगारकरांचा उडालेला कॅच फाटकांनीं स्लिपमध्यें सफाईनें झेलला (३३–२–१२). त्यांच्या जागीं जावडेकर आले. सातवळेकरांची 'पुरुषार्थ' बॅट व जावडेकरांची 'प्रबोध' बॅट, जुळले जोडीदार. याच वेळीं नवजवान संघाचे कप्तान कर्वे यांनीं गोलंदाजींत दुहेरी बदल घडवून आणला. छावणी टोंकाकडून स्वतःकडे व दुसरीकडून वरेरकर यांजकडे गोलंदाजी देण्यांत आली. कर्वे यांची गोलंदाजी दोघांही खेळाडूंना बरीच जड जात होती; त्यामुळें धांवा वाढेनात व खेळ रंगहीन झाला. मेडन ओव्हरची संख्या अधिक होती. तेव्हां कर्वे यांनीं एका षटकांत जादा जलद चेंडू टाकून जावडेकरांना परत पाठविलें (४९–३–१४).

त्यांच्या ठिकाणीं आलेल्या देवांना फार वेळ क्रीडांगणावर राहण्याचें भाग्य लाभलें नाहीं. वरेरकरांच्या एका फसव्या चेंडूला आपली 'रामदासी' बॅट लावून त्यांनीं फाटकांच्या हातीं एक सोपा कॅच दिला (५२–४–३). देवांची जागा घेण्यासाठीं भालाकारांची स्वारी आली, तेव्हां कानठळ्या बसण्याइतका मोठा कडकडाट झाला. त्यांतच कोणी एक वात्रट पोरगा ओरडला, "भालाकार बक् अप्! सेंचरी काढा. शिऱ्याची एक प्लेट माझ्याकडे लागली!" या उद्गारांनीं तर सातमजली हंशा पिकला! भालाकारांच्या हातीं मोडक्या बोथट 'भाल्या'ची बॅट असून तिला मागूनपुढून पत्रावळींचे 'पॅचेस्' दिले होते. भालाकार पीचवर येतांच कर्वे यांच्याऐवजीं विभावरीबाई शिरूरकर यांना गोलंदाजी देण्यांत आली; पण आश्चर्य हें कीं, त्यांच्या पहिल्याच 'फुल पीच-डिलिव्हरी'ला भालाकारांचा त्रिफळा उडाला!! सनातन्यांच्या तंबूंतील तोंडें काळीं पडलीं. रेशीमकांठीं उपरण्यानें तोंड झांकीत भालाकार तंबूंत परतले (५२–५–०). त्यांच्या जागीं आलेल्या माटयांनीं वरेरकरांना एकाच षटकांत दोनदां हद्दपार करून ६० वर धांवा नेल्या, तेव्हां गोलंदाजींत पुनः फरक करण्यांत येऊन एकीकडून ठाकरे व दुसरीकडून कर्वे असा दुहेरी जलद मारा सुरू केला. ठाकरे यांच्या 'बंपर्स'पुढें माटे जरा वचकून खेळतांना दिसत होते. पुन: धांवांची संख्या वाढेनाशी झाली. तेव्हां कर्वे यांनीं नेहमीपेक्षां जास्त स्टार्ट घेऊन एक चेंडू फेंकला, तो सातवळेकरांच्या बॅटला निसटता लागून यष्टिरक्षक फडके यांच्या हातीं गेला (७१–६–२३). सातवळेकरांचा खेळ अत्यंत चिकाटीचा व धिम्मेपणाचा झाला. त्यांनीं सुमारें दीड तास खेळून आपल्या बाजूची पडती इमारत बरीचशी सांवरून धरली होती; त्यांच्या जागीं भावे 'खरा देशभक्त' बॅट घेऊन आले. पण भाव्यांचें आगमन माटयांच्या मुळावर आल्यासारखें झालें. कारण भावे आल्यानंतर ठाकरे यांच्या पहिल्याच चेंडूनें माटयांचा सपशेल बळी घेतला! त्यांच्या 'सांवत्सरिक' बॅटनें फक्त दहाच धांवा त्यांच्या पदरांत टाकल्या (७१–७–१०). आतां भावे आणि शिखरे ही केसरी कचेरींतील एकजीव दुक्कल जुटीनें खेळून सनातन्यांची बाजू सांवरील असें कोणी कोणी म्हणूं लागले. शिवाय केळकर अंपायर असल्यानें या जोडीसही थोडा आत्मविश्वास वाटत असल्यास नवल नाहीं. शिखरे यांनीं येतांच आपल्या 'क्रांतिकिरणा'च्या

लालभडक बॅटीनें ठाकऱ्यांच्या गोलंदाजीला दिलेल्या फटकाऱ्यानें चेंडू आकाशांत उंच उडाला. पण अत्रे यांच्या हातून झेल निसटला व "वेल सेव्हड्"च्या आरोळींत शिखऱ्यांना जीवदानाबरोबर दोन धांवांचीही प्राप्ति झाली. इकडे कर्वे यांच्या जागीं गोलंदाजी घेतलेल्या दिवेकर यांच्या पहिल्याच षटकांतील चौथ्या चेंडूवर भावे यांचा उडालेला झेल विभावरीबाईंनीं अत्यंत कौशल्यानें एका हातानें झेलला, तेव्हां त्यांना 'वेल कॉट'ची शाबासकी मिळाली. भावे बाद होतांच (७६–८–२) सनातन्यांची मॅच जिंकण्याची आशा तर नाहींशी झालीच, पण 'फॉलो ऑन'ची नामुष्की त्यांना पत्करावी लागणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. सनातन्यांच्या तंबूंतील बरेचसे लोक या वेळेस घरोघरीं निघून गेले, त्यामुळें तो तंबू बराचसा ओसाड पडला. केसरीच्या माजी संपादकांची जागा केसरीच्या जांवयानें (पेंडसे) घेऊन दिवेकरांना हद्दपार केलें. पेंडसे यांच्या हातीं 'सांस्कृतिक इतिहासा'ची बॅट होती. ते मोठ्या तडफेनें निर्भयपणें खेळत असल्यामुळें खेळास रंग भरला. शिखरे हे केवळ बचावाचा डाव खेळत होते, त्यामुळें पेंडसे यांना स्टँड मिळाला व ही जोडी सुमारें अर्धा तास टिकली. या पार्टनरशिपनें धांवांत बावीस धावांची भर घालून सनातन्यांचें शतक फळ्यावर लावलें, तेव्हां सनातन्यांच्या तंबूतून आनंदाच्या व प्रेक्षकांच्या तंबूतून उपहासाच्या टाळ्या ऐकूं आल्या. पण यानंतर लौकरच ठाकरे यांच्या एका जोरदार बंपरनें शिखऱ्यांना चीत मारलें व आपली भिकवाळी चांचपत त्यांना तंबूत परतावें लागलें (१०२–९–९). आतां गो. म. जोशी व पेंडसे ही शेवटची जोडी खेळत होती. जोशी यांच्या हातची बॅट इंग्रजी असल्याचें स्पष्ट दिसत होतें. यावरून त्यांनीं कोणा तरी इंग्रज ग्रंथकाराची उसनवारी करून बॅट पैदा केली असावी, असा तर्क धांवतो. ती उसनवारी बॅट त्यांना सहजासहजीं पेलवतही नव्हती, त्यामुळें त्यांचा बराच गोंधळ उडे. हवी तशी आडवी बॅट घालून खेळणाऱ्या या अकराव्या गड्याची 'विकेट' ठाकऱ्यांच्या ठिकाणीं गोलंदाजी घेतलेल्या कर्व्यांनीं घेतली. स्वतःच्या गोलंदाजीवर त्यांनीं स्वतःच जोश्यांचा झेल झेलला (११४–१०–७). पेंडसे यांचा स्कोअर २० होता व ते नाबाद राहिले. जादा नऊ धांवा मिळून सनातन्यांचा स्कोअर अवघा ११४ झाला. त्यामुळें नवजवान संघाचे कप्तान कर्वे यांनीं त्यांना 'फॉलो ऑन' दिला.

सनातन्यांच्या दुसऱ्या डावामध्यें त्यांची अधिकच अनुकंपनीय अवस्था

झाली. ठाकरे यांच्या बॉडी-लाइन बोलिंगवर त्यांचे सात गडी पटापट बाद झाले. ठाकऱ्यांच्या गोलंदाजीचें पृथक्करण या वेळेस (२३–१२–३३–७) असें होतें. दुसऱ्या बाजूनें विभावरी शिरूरकर व काणेकर यांचें बोलिंग सुलंब पडून त्यांना अनुक्रमें एक व दोन विकेट्स् मिळाल्या. सातवळेकर हे या डावांत नाबाद राहिले. सबंध संघाचा दुसरा डाव अवघ्या बेचाळीस मिनिटांत खलास होऊन त्यांच्या एकूण धांवा ५३ झाल्या. अशा रीतीनें दोनही डावांत मिळून जीर्णमतवाद्यांच्या अवघ्या एकशेंसदुसष्ट धांवा होऊन त्यांचा एक डाव व २०६ धांवांनीं प्रचंड पराजय झाला !

नवमतवाद्यांचा हल्ला तडफेचा, जलदगति व व्यवस्थित होत होता. ठाकरे व कर्वे या नवमतवादी स्पीड-मर्चटची गोलंदाजी अत्यंत प्रभावी झाली. तिच्यापुढें जीर्णमतवाद्यांच्या पायांना कांपरें भरे. दिवेकर हेही निकराचा हल्ला करीत असल्यामुळें त्यांचें बोलिंग खेळण्यास जड जाई. विभावरीबाईंनीं अवघ्या दोन ओव्हर्सच टाकल्या, पण तेवढ्या देखील जीर्णमतवाद्यांना पचल्या नाहींत. निकराचा हल्ला सतत व सुलंब करण्यांत नवमतवादी गोलंदाज निःसंशय श्रेष्ट ठरले.

क्षेत्ररक्षणही सनातन्यांपेक्षां सरस होतें. फाटक-फडके, दिवेकर-वर्तक यांची कामगिरी सरस ठरली. पांगारकर, देव, माटे, शिखरे वगैरे खेळाडूंच्या वेळेस फाटक क्षेत्ररक्षणाची कमाल करीत. नवमतवाद्यांपैकीं फक्त अत्रे यांचेंच क्षेत्ररक्षण समाधानकारक नव्हतें, ते मधून मधून भोपटकरी पद्धतीचें क्षेत्ररक्षण करीत. त्यामुळें सनातन्यांना धांवांची मदत होई. फडके यांनीं यष्टिरक्षण चांगलें केलें.

शेवटीं विजयी नवजवान संघाची प्रचंड मिरवणूक काढण्यांत आली. बरट्रॅन्ड रसेल, शॉ, इब्सेन वगैरेंच्या जयजयकारांत मिरवणूक गांवांतून जाऊं लागली, तेव्हां आपापल्या घरांचीं दारें-खिडक्या बंद करून फटींतून जीर्ण-मतवादी लोक नवमतवाद्यांचें हें वैभव पाहून ‘आपल्या नशिबीं हें सुख नाहीं’ म्हणून कपाळावर हात मारून घेत होते अशी बातमी सोटचा म्हसोबा भांग्या मारुतीस सांगत असतांना मीं ऐकलें !

# अखिल भारतीय पुण्यपत्तनस्थ देवपरिषद

पेन्शन् घेतल्यापासून आज दहा वर्षें झालीं, माझा 'मॉर्निंग वॉक' कधींच चुकला नाहीं. फर्ग्युसन हिलवरील आम्हां पेन्शनरांच्या मारुतीला पहिला साष्टांग नमस्कार घालण्याचा रोजचा माझा परिपाठ, पण आज त्या मारुतीजवळ जाऊन पाहतों तों काय? माझ्या आधींच तेथें ही गर्दी जमलेली पाहून मला आश्चर्य वाटलें. माझ्या सहकारी पेन्शनर-बंधूंनीं आज माझ्यावर ताण करण्यासाठीं गुप्त कट करून माझ्या आधींच येथें जमण्याचें तर ठरविलें नाहीं ना, अशी शंका मला आली. पण जमलेल्या मंडळींत पेन्शनरांचा पोषाख घातलेला कोणीच दिसेना. शिवाय त्यांचे बोलण्याचे विषयही माझ्या परिचयाचे वाटेनात. तेव्हां डोळ्यांना पांढऱ्या काड्यांचा दोऱ्यांनीं कानाला गुंडाळायचा चष्मा लावून व त्यावर मॅग्निफाइंग ग्लास लावून मी पाहूं लागलों तों काय?—हे तर पुण्यांतले निरनिराळे देव! माझ्या सराईत दृष्टीला त्यांची ओळख लागलीच पटली. हा खुन्या मुरलीधर, हा सोट्या म्हसोबा, तो भांग्या मारुति, पत्र्या मारुति, गवत्या मारुति, भिकारदास मारुति, चिमण्या गणपति, उपाशी विठोबा, ताकपिठ्या विठोबा, उंबऱ्या गणपति, इत्यादि देव तर मीं तेव्हांच ओळखले आणि आमचा पेन्शनरांचा मारुति या साऱ्या देवांचें आगतस्वागत करण्यांत इतका गढून गेला होता कीं, नित्य-नेमाप्रमाणें या भक्ताचा नमस्कार घेण्यासही त्याला आज फुरसत सांपडेना.

ही भानगड आहे तरी काय?

माझी जिज्ञासा जागृत झाली. हळूच साऱ्या देवांची नजर चुकवून मी एका दगडाआड दडून काय काय होतें तें पाहूं लागलों. तेथील एकंदर वातावरणावरून ही कसली तरी सभेची दंगल असावी असा मीं तर्क बांधला—

आणि सभेच्या गुळाला न चिकटेल तो पेन्शनर डोंगळाच नव्हे ! मी 'आत्म्याचे' कान करून ऐकूं लागलों, तों माझ्या कानावर पुढील भाषण पडलें :—

प्रथमत: चिमण्या गणपतीनें आपल्या वांकडया सोंडेनें स्वागतपर पद्य भसाडया स्वरांत म्हणून माझ्या कानाचे पडदे साफ केले ! त्यामुळें पेन्शनर असून मला सभेंतील सारीं भाषणें स्पष्टपणें ऐकूं आलीं. देवांनीं अपकार केला तरीही तो उपकार ठरतो तो असा ! स्वागत-गीतानंतर आमचा 'पेन्शनर्स मारुति' कांठीच्या आधारानें कसाबसा तोल सांवरीत उभा राहून बोलूं लागला :

"मत्प्रिय देवबांधवहो ! आज आपण या येथें कां जमलों आहोंत हें आपणांस माहीतच आहे. वास्तविक पाहतां आपण देव म्हणजे सर्वगुणसंपन्न, कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् सर्व शक्तिमान् असतां आज आपली काय अवस्था झाली आहे याचा विचार मनांत आला कीं, छाती फाटून जाते ! (तसें कांहीं होऊं नये म्हणून उपरण्यानें छाती घट्ट दाबून ठेवतों.) आपणांपैकीं पुष्कळांना कल्पनाही नसेल, पण मला अनुभवानें ठाऊक आहे कीं, देवाबद्दल अनादर बाळगण्याची नास्तिक बुद्धि सध्यां समाजांत सर्वत्र फैलावली आहे. मी ज्या टेकडीवर वास्तव्य करून राहिलों आहें त्या या फर्ग्युसन हिलवर सहल करण्याच्या उद्देशानें आबालवृद्ध लोक नेहमीं येतात. त्यांच्या बोलण्याचालण्यांत आम्हां देवादिकांबद्दल नास्तिक बुद्धि पूर्णपणें दिसून येते. कुणालाही देवाबद्दल कांहीं वाटेनासें झालें आहे ! व त्यामुळें आम्हां देवांचे अतोनात हाल होत आहेत. ही नास्तिक बुद्धि सध्यां तर इतक्या पराकोटीला पोंचली आहे कीं, अस्पृश्यांनीं मंदिरप्रवेश करावा अशीही चळवळ या अभागी देशांत सुरू झाली आहे. आतां मात्र आम्हां देवांची धडगत दिसत नाहीं. इहलोकींचीं आम्हां देवांचीं वसतिस्थानें जीं देवालयें त्या देवालयांच्या पावित्र्याला, देवालयांच्या रखवालदार भूदेवांनीं आपल्या विविध विलासांनीं केव्हांच नख लाविलें आहे. आतां देवळांतून वर्षानुवर्ष न धुतलेल्या मुकटयांचा जो सोंवळेंपणा थोडाबहुत जीव धरून आहे, तोही या अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशानें नाहींसा होणार आहे. आणि मग देवहो ! आपले हाल कुत्राही खाणार नाहीं ! ! आजच आपणांस कोणी विचारीत नाहीं अशी अवस्था झाली आहे. पोरेंसोरेंही देवाबद्दल हवें तें बोलतात व तें आपणांस मिटल्या तोंडानें पण उघडया कानानीं ऐकून घ्यावें लागत आहे. अशा आपल्या दारुण हलाखीच्या स्थितींत आपण जर 'मला काय

त्याचें ?' म्हणून स्वस्थ बसलों तर--! भावी कल्पनेनेंही माझें हृदय दुभंगून जातें. ही दुःस्थिति टाळण्याचा आपण कांहीं प्रयत्न करावयास नको काय ? याच विचारानें मीं आज आपल्या पुण्यांतील साऱ्या देवांची येथें एक परिषद बोलाविली आहे. माझ्या विनंतीस मान देऊन आज आपण या 'अखिल भारतीय पुण्यपत्तनस्थ देवपरिषदे'ला गैरसोय सोसूनही हजर राहिलांत याबद्दल स्वागताध्यक्ष या नात्यानें मी आपले आभार मानतों. आपण पाहातच आहां कीं, मी पेन्शनरांचा मारुति पेन्शनरांसारखाच शरीरानें दुबळा आहें. त्यांतच रात्रंदिवस या टेकडीवर उघड्या हवेंत राहण्याचें माझ्या नशिबीं आल्यानें माझी प्रकृति फार नाजूक झाली आहे. या परिषदेसाठीं केली हीच दगदग मला फार झाली. अधिक कांहीं करीन, तर या जीर्ण शरीरांतून माझा दुर्बल आत्मा पटकन् रामस्वरूपीं लीन व्हायचा ! पुण्यांतील सगळ्या कर्तृत्वशून्य वृद्ध पुढाऱ्यांप्रमाणें माझाही सारा भडिमार, देवा ! या तरुण पिढीवर आहे. तरुण देवांनीं पुढें येऊन आपल्या देवजातीचें श्रेष्ठत्व पुनः प्रस्थापित करण्यासाठीं प्रयत्न केले पाहिजेत. कलियुगांतील आजच्या पिढीला आम्हां देवादिकांबद्दल काडीमात्र दहशत वाटेनाशी झाली आहे. पुण्यांतील हें श्रेष्ठ देवस्थान जें पर्वती तेथील मूर्ति सफाईनें पळवून नेण्यापर्यंत लोकांची मजल गेली तरी, आपण देवांनीं स्वस्थच बसून राहावें काय ? जोगेश्वरीच्या देवालयांतही उचलाउचलीचा प्रकार घडल्याचें कांहीं पेन्शनर आपआपसांत बोलतांना मीं ऐकलें. या गोष्टीचा आपण देवांनीं अवश्य विचार करायला हवा. आज जी स्थिति पर्वतीची, तीच उद्यां आपलीही कशावरून नाहीं होणार ? म्हणून वेळींच जागें होऊन कांहीं तरी संघटित प्रयत्न करणें जरूर आहे असें आपणांस नाहीं का वाटत ?

" काळ तर कठिण येत चालला आहे. या टेकडीवर फिरायला येणाऱ्या लोकांच्या तोंडीं आम्हां देवादिकांबद्दल जी भाषा असते, ती वारंवार कानीं पडून माझा अगदीं थरकांप होतो. हीं कॉलेजचीं कार्टीं तर आम्लेटादि पदार्थांचा मला नैवेद्य दाखविण्यापर्यंत कधीं कधी मजल नेतात. 'मानला तर देव, नाहीं तर दगड' या वचनाचा आधार घेऊन देवांना दगड मानण्याची प्रवृत्ति पुण्यांत सारखी वाढत आहे. तेव्हां अशा स्थितींत आपणांस तगून राहण्यासाठीं कांहीं तरी प्रयत्न केला पाहिजे. हल्लीं कलियुग आहे; आणि

संघशक्ति हीच या युगांत खरी शक्ति आहे. आपल्या पुण्यांत संस्थांना तोटा नाहीं. घरोघर एकादी तरी 'संस्था' आहेच. मग आपणां देवांची एकादी संघटित संस्था कां असूं नये ? या प्रश्नाचा आपण या परिषदेंत अवश्य विचार करावा. त्याचप्रमाणें आपणांपैकीं कोणा देवाच्या ज्या कांहीं अडचणी असतील त्याही मोकळ्या मनानें या परिषदेपुढें मांडाव्या. म्हणजे कांहीं तरी उपाययोजना करण्यास बरें होईल.

"सुदैवानें आपल्या परिषदेस अध्यक्ष म्हणून लाभलेले देव खुन्या मुरलीधर हे अगदीं योग्य असून त्यांच्या नांवांतच दहशत उत्पन्न करण्याचा गुण आहे. शिवाय भक्तगणावर ते कशी तत्काळ कृपादृष्टि वळवतात हें नुकतेंच अनुभवास आलें आहे. मंदिरप्रवेशाची चळवळ करणाऱ्यांवर परवांच पुण्यांत बाँब टाकण्यांत आला, त्या वेळीं सनातन्यांची सभा खुन्या मुरलीधराच्या देवळांतच भरली होती, हें आपल्या लक्षांत असेलच. तेव्हां असा त्वरित फलदायी अध्यक्ष आपणांस लाभला हें आपलें भाग्य होय."

नंतर टाळ्यांच्या प्रचंड गजरांत खुन्या मुरलीधर अध्यक्षस्थानीं विराजमान झाले. परिषदेचे चिटणीस ताकपिठ्या विठोबा यांनीं सहानुभूतीच्या तारा, दुखवटयाचीं पत्रें वगैरे वाचून दाखविल्यावर अध्यक्षांनीं आपल्या भाषणास सुरुवात केली :

"देवबांधवहो ! या अखिल भारतीय पुण्यपत्तनस्थ देवपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान आपण मला देऊन माझा जो गौरव केलांत त्याबद्दल मी फार आभारी आहें. आपले स्वागताध्यक्ष जे पेन्शनरांचे मारुति त्यांनीं उतार वयांत या परिषदेचा जो खटाटोप केला, तो निःसंशय अभिनंदनीय आहे. त्यांच्या पिकल्या पानांतील हा हिरवटपणा आम्हां तरुणांना लाजवील असाच आहे. अशा एकाद्या परिषदेची सध्यां फार तीव्रतेनें उणीव भासत होती यांत शंका नाहीं. पेशवाई पुण्यांत होती, तोंपर्यंत आम्हां देवांची काय नुसती चैन होती ! दागदागिने, कपडेलत्ते, भोजन-भजन यांची आपणांस कधींच उणीव पडली नाहीं. थोरांमोठ्यांच्या बायकाही देवदर्शनाला आल्या-वांचून राहात नसत. पण सध्यां आपला काळ फिरला आहे. आपला आदर-सत्कार होण्याऐवजीं आपली कुचेष्टाच सर्रास ऐकूं येते. आपणांस पूर्वीप्रमाणें देणग्या मिळेनाशा झाल्या आहेत. नैवेद्यही सध्यां फार थोड्या देवांना मिळतो.

पुष्कळ देव उपाशी विठोबाप्रमाणें उपासमारी काढीत आहेत. देवदर्शनाला येण्याचीही प्रवृत्ति समाजांतून नाहींशी होत आहे. मित्रहो ! अनुभवाची गोष्ट सांगतों, म्हणून चेष्टा करूं नका. रांगोळीच्या दिवसांत माझ्या देवळांत जेवढी गर्दी जमते, त्याच्या शतांशही इतर दिवशीं जमत नाहीं. माझ्या नांवावर भलभलत्या कोटया करून माझी कुचेष्टा करण्यांत पोरांनाही धन्यता वाटते ! ही प्रवृत्ति अलीकडेच उत्पन्न झाली आहे. पेशवाईंत हें असें नव्हतें. श्रीपाद कृष्ण नांवाच्या एका टारगट लेखकानें आम्हां पुण्यपत्तनस्थ देवांच्या नांवांची कुचेष्टा करून या प्रवृत्तीस जन्म दिला. बिचाऱ्यानें तें पाप पुण्यांतीलच एका देवाच्या चरणीं देह ठेवून फेडलें, हा भाग वेगळा ! वास्तविक खुन्या मुरलीधर, सोटया म्हसोबा, भांग्या मारुति या नांवांनीं दहशत वाटायची, ती उलट त्या नांवांची चेष्टा होत आहे ! कारण आपण त्या नांवांची सार्थकता या चेष्टेखोरांना पटवीत नाहीं. आपल्या या उपेक्षावृत्तीचा परिणाम काय झाला आहे पहा. मला असें समजलें आहे कीं, एका गृहस्थाच्या घराजवळ लोक लघुशंकेस बसत असत ! 'येथें लघवीस बसूं नये' अशी त्यानें पाटी लावून पाहिली. पण पुणेकरांनीं त्या पाटीवर श्लेश करून आपला क्रम दुप्पट जोरानें सुरूच ठेविला ! तेव्हां त्या गृहस्थानें कंटाळून शेवटीं एका दगडाला शेंदूर फांसून तो तेथें ठेवला व मुत्रीचें त्यानें देवस्थानांत रूपांतर केलें. देवहो ! संतापूं नका. आज या पुण्यांत आपणां देवांची स्थिति ही अशी आहे. ही स्थिति दूर करण्याचा कांहीं तरी उपाय काढण्यासाठींच ही परिषद बोलावण्यांत आली आहे.

"या परिषदेच्या नांवावर माझ्या कांहीं देवमित्रांनीं असा आक्षेप घेतला आहे कीं, ही आम्हां पुण्यांतील देवांची परिषद, तिला 'अखिल भारतीय' म्हणण्याचें कारण काय ? हा आक्षेप घेणाऱ्या पुणेकर देवांच्या बुद्धिमत्तेची मी कींव करतों. अहो, आपण ज्या पुणेकरांच्या गांवीं राहतों त्यांची कोणतीही संस्था घ्या, तिला 'अखिल भारतीय' हें अधिष्ठान असतेंच. पुण्या-पुरती संकुचित चळवळ करणें हें मुळीं पुणेकरांचें ब्रीदच नव्हे. पुण्यांतल्या एकाद्या माणसाची नोकरी गेली, तरी देखील त्याच्या निषेधाच्या चळवळीस जे पुणेकर 'अखिल भारतीय' हें शुक्लकाष्ठ जोडण्यास चुकत नाहींत, त्यांच्या सहवासांत राहून आपण देवांनीं कोरडेंच राहायचें ? शिवाय असें पहा

कीं, हल्लीं कसल्याही परिषदेला अखिल भारतीय म्हणून महत्त्व आणण्याचा शिष्टाचारच पडून गेला आहे. जसें हव्या त्या टोळभैरवाच्या नांवापूर्वी 'रा. रा.' हे शब्द लावण्याचा प्रघात आहे, तद्वत् परिषद म्हटली कीं, अखिल भारतीय ही भानगड आलीच ! तो केवळ एक साधा शिष्टाचार आहे. त्याचा अर्थ करण्याच्या भानगडीत कोणींही पडूं नये हेंच बरें !

"या परिषदेपुढें मुख्य प्रश्न आहे तो हा कीं, सध्यां आम्हा देवांच्या वाजवी हक्कांचा मुलाहिजा न ठेवण्याची जी माजोरी पद्धत मानवांच्या कारट्यांनीं जारी ठेविली आहे, तीबद्दल योग्य विचार करणें. इंग्रजी शिक्षणानें—बाटग्या सुधारकी चळवळीनें—देवांबद्दलचा आदर समाजांतून नाहींसा होत चालला आहे. खुद्द सनातनी म्हणविणारे लोकही आम्हां देवांचे योग्य हक्क कळत न कळत मानीत नाहींत, अशी स्थिति झाली आहे. याचें एकच उदाहरण देतों. हल्लीं या पुण्यांत सनातन्यांच्या सभा रात्रीच्या भीषण काळोखांत तुळशीबागेंत होत असतात हें आपणांला माहीत आहेच. वास्तविक पाहतां रात्रींच्या सभा खुन्या मुरलीधर किंवा भांग्या मारुति यांच्याच देवळांत होणें योग्य असतां 'तुळशी'च्या मोहानें या सभा दुसरीकडे भरत आहेत.

"आम्हां देवांच्या इहलोकींच्या वसतिस्थानांचा उपयोग रात्रींच्या वेळेस कोणकोणत्या कृत्यांकडे केला जातो, तें मीं आपणास सांगण्यास हवें असें नाहीं. भूदेवांनीं देवस्थानें म्हणजे घाणेरड्या कृत्यांचे अड्डेच करून टाकले आहेत. आम्ही देवदेवींनीं जे विलास पुराणकालीं भोगले, ते हे भूदेव आमच्या डोळ्यांसमोर उपभोगित असतां आपणांस मुकाट्यानें पाहात बसण्याची पाळी आली आहे. चाहील तसा अनाचार करण्याचा आम्हां देवांचा पुराणकालीन हक्क या मानवांच्या कारट्यांनीं बळकावावा हा आपला अपमान आपण निमूट सहन करणार काय ? असा माझा आपणांस सवाल आहे. आज देवळांत फक्त ब्राह्मणांचाच वरचष्मा आहे, तर हा सारा भ्रष्टाकार माजला आहे, मग उद्यां अस्पृश्य मंदिरप्रवेश करूं लागले, तर आम्हां पुणेरी देवांचें होणार तरी काय ?

"हल्लीं देवदर्शनासाठीं जाणाऱ्यांची संख्या घटत चालली आहे. जी थोडीफार गर्दी देवळांत होते त्याचीं माझ्या मतें दोन कारणें आहेत. एक असें कीं, भाड्याच्या आशेनें देवालयाच्या मालकांनीं देवळांत दुकानें उघडून

देवळांना मंडईचें स्वरूप आणलेलें असल्यामुळें खरेदी-विक्रीच्या निमित्तानें देवळांत माणसांची गर्दी होते; आणि दुसरें कारण असें कीं, देवळें हीं सध्यां पुष्कळ शोकीन व गरजू लोकांचीं प्रेमसंकेत स्थळें झालीं आहेत. देवापेक्षां देवदर्शनासाठीं येणाऱ्यांकडे पाहण्यासाठींच पुष्कळ छकडे हल्लीं देवळांचे उंबरठे झिजवितांना दिसतात. पण बांधवहो, या प्रकारानें आपली गैरसोय होते याची वाट काय?

"तेव्हां आजच्या या परिषदेंत आपण आपापल्या अडचणींचा मोकळे-पणानें विचार करूं या, म्हणजे कांहीं तरी उपाययोजना खास निघेल. आतां मी माझें लांबलेलें भाषण संपवून आपणांपैकीं ज्या कोणास कांहीं ठराव मांडावयाचे असतील, त्यांना तसें करण्यास परवानगी देतों."

अध्यक्ष भाषणोत्तर गरुडावर स्थानापन्न होतांच टाळयांचा खडखडाट झाला. त्यांत पत्र्या मारुतीनें आपल्या शेंपटीनें पत्रे बडवून केलेला आवाज फारच मोठा होता. हा गडगडाट किंचित् शमल्यावर उपाशी विठोबानें उठून भाषणास सुरुवात केली :

"देशबांधवहो! आजची ही परिषद आपणां देवांच्या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे. माझ्या मनांत आज कित्येक दिवस जो एक प्रश्न घोटाळत आहे, तो आजच्या या परिषदेच्या निमित्तानें मी आपणांपुढें मांडतों. हा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. आज आम्हां देवांच्याबद्दल समाजांत आदरबुद्धि नसल्यामुळें आमचे अतोनात हाल होत आहेत. आम्हांला धड पोटापुरतें अन्नही वेळच्या वेळीं मिळत नाहीं अशी अवस्था आहे. पेशवाई होती तोंपर्यंत आम्हांला अन्नाची उणीव कधींच भासली नाहीं. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत अजीर्ण होईपर्यंत पक्वान्नांवर हात मारणाऱ्या मला आज उपाशी विठोबा होऊन दिवस कंठावे लागत आहेत! पेशवाई-तील तें सव्वाहात केळीचें पान व त्यावरील चमचमीत पंचपक्वान्नें आज कोठें आहेत? (जोराचा हुंदका) त्याऐवजीं आतां टीचभर पत्रावळी व लवंडे द्रोण यांचा हैदोस सुरू आहे. या पुण्यांत इतक्या खाणावळी व हॉटेलें असतांना आम्हां देवांना नैवेद्यही महाग व्हावा काय? एका एका आळींत दुधाच्या दोन दोन डेअऱ्या असूनही पूर्वीप्रमाणें आटीव दूध तर राहोच, पण साधें नीरसें दूधही वाटगाभर आम्हां देवांना मिळत नाहीं.

World-depression चा परिणाम आम्हां देवांच्या नैवेद्यावरही दिसून यावा, ही शरमेची गोष्ट आहे. माझ्या देवळापलीकडे असलेल्या आश्रमांतून दर रविवारी होणाऱ्या 'फीस्टी'च्या पक्वान्नांचा घमघमाट माझ्या नाकांत शिरला कीं, बांधवहो, काय सांगूं? असें तोंडाला पाणी सुटतें म्हणतां! पण मला कोणी त्याचा नैवेद्यही दाखवीत नाहीं. माझी खात्री आहे कीं, आपणांपैकीं पुष्कळांची हीच तक्रार असणार. तेव्हां पुण्यांतील सर्व खाणावळवाल्यांकडे व हॉटेलवाल्यांकडे एक डेप्युटेशन नेऊन पेशवाई पद्धतीनें आम्हांला नैवेद्य दाखविण्याबद्दल या परिषदेतर्फे त्यांना विनंति करण्यांत यावी, अशी माझी आग्रहाची सूचना आहे. हल्लीं पुण्यांतील पुष्कळ विद्यार्थी कांहीं कांहीं खमंग 'जिन्नस' खातात म्हणे! पण आम्ही देव असून त्यांचें दर्शनही आम्हांस होत नाहीं. याबाबत या परिषदेनें योग्य तो विचार करावा अशी माझी सूचना आहे."

हा ठराव एकमतानें पास झाल्यावर भिकारदास मारुतीनें दुसरा ठराव मांडला. तो म्हणाला

"देवहो! आपल्या अन्नाचा प्रश्न उपाशी विठोबानें सोडवलाच आहे. आतां वस्त्रप्रावरणासंबंधीं विचार नको का करायला? मी आज कैक दिवस उघडाबंब थंडीवाऱ्यांत कुडकुडत उभा आहें, याची कोणालाच कशी कींव येत नाहीं? माझ्याप्रमाणें या पुण्यांत आणखीही कित्येक देव बाराही महिने उघड्यावर पडून गारठून जात आहेत. त्यांना उबाऱ्याची कांहीं व्यवस्था व्हायला नको काय? बिचारा पेन्शनरांचा मारुति तर या शीतलतेच्या माऱ्यानें एकाद वेळेस पटकन् राम म्हणायचा अकालींच! तेव्हां ही आपदा टळावी म्हणून आम्हां देवांच्या वस्त्रप्रावरणांचा प्रश्न या परिषदेनें हातीं घ्यावा. पुण्यांत 'रेडीमेड' कपड्यांचीं पुष्कळच दुकानें निघालीं आहेत. त्यांनीं मनावर घेतलें, तर हा प्रश्न चुटकीसरसा सुटेल. प्रत्येक रेडीमेड कापडवाल्यानें आम्हां देवांच्या अंगावर जरी एकेक सूट चढविला, तरी नूर्तास हा प्रश्न सुटण्याच्या मार्गास लागेल. आमच्या अंगावरील कपड्यांमुळें आमची सोय होईल इतकेंच नव्हे, तर या कापडवाल्यांचेंही अनायासें फुकटांत 'ॲड्व्हर्टायझिंग' होईल."

हाही ठराव बहुमतानें पास झाल्यावर भांग्या मारुतीनें पुढील ठराव

मांडतांना मोठ्या आवेशानें 'दणदणीत' भाषण केलें. आधींच स्वारी भांगेच्या तारेंत होती, त्यांत भाषणाच्या आवेशानें त्याचे डोळे लालभडक झाले. तो म्हणाला

"आतां आपण पास केलेल्या दोनही ठरावांपेक्षां अधिक महत्त्वाची एक गोष्ट मी आपल्या नजरेस आणूं इच्छितों. आपणांस ठाऊकच आहे कीं, माझ्या वसतिस्थानापासून अवघ्या पंचवीस पावलांच्या अंतरावर पुण्यांतील सुप्रसिद्ध किर्लोस्कर थिएटर आहे. या थिएटरांत वयोवृद्ध बालगंधर्वापासून तों दणकेबाज दामुअण्णांच्या दणदणीत बालमोहनपर्यंत सर्व प्रकारच्या व दर्जाच्या नाटकमंडळ्या हम्मेष उतरतात. पण देवहो! यांपैकीं एकाही मंडळीनें आजपर्यंत कधीं शेजारीं उभ्या असलेल्या या भांग्या मारुतीची विचार-पूस देखील केली नाहीं. यावरून आपल्या लक्षांत येईल की, देवांबद्दलची अनादरबुद्धि समाजाच्या अगदीं खालच्या थरापर्यंतही कशी जाऊन पोंचली आहे. माझ्या देवळांत संध्याकाळीं जमणाऱ्या भांगबाजांच्या बोलण्यावरून मला एकदां असें समजलें कीं, वरेरकर या नांवाच्या कोणा एका लेखकाला साहित्यपरिषदेचें आमंत्रणही पाठविण्यांत येत नाहीं. या प्रकाराबद्दल चर्चा करण्यांत स्तंभच्या स्तंभ अडविणाऱ्या वर्तमानपत्रांनीं आम्हां देवांच्या बाबतीत नाटककंपन्या जो अन्याय करीत आहेत, त्याविरुद्ध एक अक्षरही लिहूं नये? अहो, काय सांगूं? माझ्या देवळांत जमणाऱ्या कांहीं कांहीं आचाऱ्यांना-देखील या नाटककंपन्या फुकट पास देतात. पण मला—या भांग्या मारुतीला—छे, छे, हा अपमान यापुढें सहन होत नाही. बस्! या अन्यायाविरुद्ध या देवपरिषदेनें कांहीं तरी कडक उपाय योजलेच पाहिजेत."

भांग्या मारुतीच्या या ठरावास पुष्टि देतांना सोटच्या म्हसोबानें पुढील आशयाचें भाषण केलें

"देवलोकहो! माझे सन्मित्र श्री. रा. रा. भांग्या मारुति यांचा ठराव अत्यंत योग्य आहे. त्यांच्याप्रमाणेंच मलाही आजवर नाटकमंडळी-कडूनच काय, पण एकाद्या तमाशाचा देखील पास फुकट आलेला नाहीं. आम्ही देव असलों म्हणून आम्हांला करमणूक नकोच कीं काय? माझ्या कपाळीं तर दर वर्षीं भसाड्या आवाजाच्या गणपति-मेळ्यांचा ससेमिरा लागलाच आहे, तद्वत् आपणांपैकीं कित्येक देवांच्या कानठळ्या टाळकुट्या भजनाच्या

आरडाओरडयानें बसल्या असतील. या बेसुर भजनाऐवजीं जर गंधर्वांचें 'नृपकन्या तव जाया' ऐकायला मिळेल, तर काय बहार होईल! आम्हां देवांच्या देवळांत शृंगारिक तसबिरी मांडलेल्या चालतात, तर आम्हीं शृंगारिक नाटकें तरी कां पाहूं नयेत? तें कांहीं नाहीं. येथून पुढें नाटकवाल्यांनीं आमच्याकडे 'फ्री व कॉम्प्लिमेंटरी पासेस्' पाठविलेच पाहिजेत; मात्र कांहीं शिष्ट लोकांची तमाशाच्या वेळीं जशी आंतल्या बाजूस खास सोय केली जाते, तशी, आम्ही देव असल्यामुळें, आमचीही आंतल्या बाजूस सोय करण्यांत यावी. म्हणजे नाटक कंटाळवाणें होऊं लागल्यास रंगपटांतील स्त्री-पार्टीं-बरोबर दोन गप्पागोष्टी करून तरी वेळ काढतां येईल!"

हा ठराव झाल्यावर एकच ठराव सोमेश्वरानें मांडला. तो म्हणाला:

"परवांच एका पृथ्वीपति विष्णूनें पुण्यास सांगितलें कीं, हल्लींच्या तरुणींची स्थिति 'पुढें सपाट, मागें सपाट' अशी असते. याचें कारण हल्लींच्या बायका देवदर्शनास जात नाहींत हें आहे असें मला वाटतें. पूर्वीच्या बायका पहा, संध्याकाळ झाली कीं, निघाल्या गांवांतील सगळ्या देवांच्या दर्शनाला! त्यामुळें अनायासें व्यायाम होई व धर्मश्रद्धाही मनांत बाणे. ही प्रथा अलीकडे बंद पडत चालली आहे. या कॉलेजमधल्या छबडयांना तर रांगोळीच्या दिवसांतच काय ती देवांची आठवण होते. त्या वेळेस माझ्या देवळांत इतकी सुंदर गर्दी होते कीं, मला वाटतें, हा रांगोळीचा कार्यक्रम वर्षभर असाच चालू राहावा. पण देवांचें सध्यां कुठलें इतकें भाग्य असायला! तेव्हां व्यायामाच्या निमित्तानें तरी या तरुण मुली आपल्या देवळांत येत जातील, अशी आपण तजवीज केली पाहिजे. आणि मुली येऊं लागल्या कीं, सुईमागें दोरा या न्यायानें मुलेंही येणारच. नित्य देवदर्शनानें तरुण पिढी अधिक धर्मप्रवण होईल व मग आपले देवांचे सध्यांचे हालही कमी होतील. तरी या सूचनेचा आपण अवश्य विचार करावा."

या ठरावाला पेन्शनरांच्या मारुतीनें विरोध केला. तो म्हणाला:

"श्रीसोमेश्वर यांनीं आतांच जो ठराव मांडला आहे, त्या ठरावाचें तत्त्व मला कबूल आहे; पण तपशील नाकबूल. तरुण-तरुणींना व्यायाम हवा, आणि त्यासाठीं त्यांनीं संध्याकाळीं फिरायला जावें, हें मला मान्य आहे. पण त्यासाठीं सोमेश्वराच्या देवळासारख्या एका बोळांतील बंद हवेच्या

देवळांत जाऊन काय फायदा होणार? व्यायाम हितावह होण्यास मोकळी हवा अवश्य आहे. माझें निवासस्थान पहा कसें मोकळ्या हवेवर आहे. तेव्हां गांवांतील सर्व तरुणींनीं व तरुणांनीं या टेकडीवर फिरायला यावें अशी माझी ठरावास उपसूचना आहे. पेन्शनरांनीं मात्र फार दगदगीचा व्यायाम त्यांना हितावह नसल्यानें गांवांतल्या देवदर्शनावरच समाधान मानावें..."

पण हें भाषण पुरें होण्यापूर्वीच सोमेश्वरानें आपला बैठकीचा दगड पेन्शनर्स मारुतीवर फेंकला. सभेंत दंगल माजली. या ठरावावर देवांत दोन तट पडले व मोठा कडाक्याचा वाद माजला! दोनही पक्ष हमरी-तुमरीवर आले. एका बाजूस पेन्शनर्स मारुति, पर्वती, चतुःशृंगी वगैरे देव, व दुसऱ्या बाजूस कसब्याचा गणपति, सोमेश्वर, रामेश्वर वगैरे देव होते. या दोनही पक्षांत झालें 'कत्तल गद्य' आणि शेवटीं हे देववीर दगडादगडीवर आले. तेव्हां जीव बचावण्यासाठीं, सभेचा शेवट काय झाला हें कळून घेण्यापूर्वीच मला टेकडीपार व्हावें लागलें! देवांची ही मारामारी पाहून आमच्या पुण्यांतील फेरनाफेरवाल्यांच्या पूर्वीच्या मारामाऱ्या मला आठवल्या आणि स्वार्थासाठीं आपापसांत झगडण्याचा पुणेरी गुण देवादिकांनाही सुटला नाहीं हें पाहून तशा स्थितींतही मला समाधान वाटलें!

# म्युनिसिपल सभांचा अहवाल

हजार खटपटी लटपटी करून व जिल्ह्याच्या कलेक्टरसाहेबांचे सर्व प्रकारचे वशिले लावून अखेरीस तालुके ठणठणपूर या गांवीं लोकनियुक्त म्युनिसिपालिटी तर मिळाली. तेव्हांचा स्थानिक पुढाऱ्यांचा आनंद व लोकांचा उत्साह काय वर्णावा ! जणूं त्या तालुक्याचा प्रत्येक रहिवाशी लोकल बोर्डाच्या खांचखळग्यांच्या अखंड पटा (रस्ता—इति पौरजनाः) वरून तीन फूट उंच अधांत्री चालू लागला, आणि मालकाच्या गैरहजेरींत आपल्या प्रेमपात्राला गाडींत बसवून 'इम्प्रेशन' मारूं पाहणाऱ्या ज्ञानबा ड्रायव्हरप्रमाणें स्थानिक पुढाऱ्यांना स्वर्ग केवळ दोन हातांवर आल्यासारखें वाटूं लागलें ! पेशवाई रमण्याच्या वेळीं जसा 'दक्षिणार्थ भिक्षुकगण पळत सुटल्या' चे देखावे पुण्यनगरींत जिकडे तिकडे दृष्टीस पडत, तद्वत् मायबाप इंग्रज सरकारनें तालुक्याच्या गांवाला म्युनिसिपालिटी देतांच तींत सभासद निवडून येण्यासाठीं पुढाऱ्यांनीं पानिपतची छोटी मोहीमच उठवून दिली असल्याचे देखावे जिकडे तिकडे नजरेस येत ! 'विलेक्षेण'ची विलक्षण धामधूम अखेर पार पडली. कलाल, हॉटेलवाले, सर्व्हिस गाड्यांचे चालक व कर्ज देणारे सावकार यांना वर्षाची प्राप्ति महिन्यांतच झाली. मतदारांनाही कागदाच्या एका चिटोऱ्यावर सही अगर अंगठा उठवण्याबद्दल थोडीफार कमाई करतां आली. आणि ठणठणपूरच्या म्युनिसिपालिटींत बारा सभासद 'नगरपिते' म्हणून मिरवूं लागले. त्यांच्याबरोबर पोलिसपाटील, शाळामास्तर असे कांहीं एक्स-ऑफिशियो म्हणनही घुसले. म्युनिसिपालिटींत कोणी तरी एक जण 'विंग्रजी' जाणणारा हवा, नाहीं तर साहेबाचे हुकम वाचणार कोण ? या व्यावहारिक अड-

चणीमुळें शाळामास्तरांना नगरपिता होण्याचा मान मिळाला. धोंडशेट दगडोजी फत्तर हे सर्वानुमतें अध्यक्ष निवडून आले, आणि म्युनिसिपालिटीच्या पहिल्याच सभेंत सरकारचें व कलेक्टरसाहेबांचें अभिनंदन करणारे ठराव पसार झाले. या पहिल्या सभेनंतर तालुके ठणठणपूर म्युनिसिपालिटीच्या ज्या सभा भरल्या, त्यांत झालेल्या कार्याचा थोडक्यांत अहवाल प्रोसिडिंग-बुकावरून पुढें दिला आहे :—

**सभा २ री :**—परवांच्या 'विलेक्शेण'मध्यें सभासदांना आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रास भरपूर झालेला असल्यामुळें लोकोपयोगी कार्याचा शांतपणें विचार करण्यासारखी त्यांची मनःस्थिति आज नसल्यानें सभेची बैठक तहकूब ठेवावी असा ठराव खुद्द 'खुर्ची'नें (Chair) मांडला. टाळ्यांच्या प्रचंड गजरांत तो सर्वानुमतें पास होऊन सभा तहकूब झाली.

**सभा ३ री :**—म्युनिसिपालिटीचे सभासद ज्या ज्या 'वार्डा'तर्फे निवडून आले आहेत, त्या त्या वॉर्डाची काम करण्याच्या दृष्टीनें त्या त्या सभासदांना माहिती होणें जरूर आहे. यासाठीं सभासदांना कांहीं मुदत मिळावी असा ठराव एका नगरपित्यानें आणला व तोही सर्वानुमतें पसंत ठरला. सबब बैठक तहकूब.

**सभा ४ थी :**—निवडून आलेल्या मेंबरांचें व प्रेसिडेंटसाहेबांचें अभिनंदन करण्यासाठीं तालुक्यांतील जवळच्या एका गांवीं उद्यां भरणाऱ्या सभेला हजर राहण्याची तयारी करण्यास वेळ हवा. सबब आज बैठक तहकूब.

**सभा ५ वी :**—ठणठणपुरास गेलीं अडीच वर्षें असलेले पोस्टमास्तर दुसरीकडे बदलल्याचा हुकूम आज आला, आतां त्यांच्या जागीं नवा येणारा पोस्टमास्तर स्वभावानें कसा काय असेल, तो आपलीं पत्रें वेळेवर देईल कीं नाहीं, ओळखीच्या जोरावर लेट फीशिवाय आमचीं उशिरां टाकलेलीं पत्रं स्वीकारील कीं नाहीं, ही विवंचना प्रेसिडेंटासुद्धां सर्व सभासदांना लागल्यामुळें त्याचा विचार करण्यासाठीं सभा तहकूब.

**सभा ६ वी :**—म. गांधींना अटक करण्यांत आल्याचें कळल्यावरून दुःखप्रदर्शनार्थ बैठक तहकूब.

**सभा ७ वी :**—जिल्ह्याच्या कलेक्टरसाहेबांना बढती झाल्यामुळें सभेला वाटणारा आनंद कामकाजास तहकुबी देऊन व्यक्त करण्यांत आला.

**सभा ८ वी :**—सकाळीं श्रीपति गुरव यांच्या घरास लागलेली आग समक्ष पाहण्यासाठीं मेंबर व प्रेसिडेंट गेल्यामुळें सभा तहकूब.

**सभा ९ वी :**—म्युनिसिपल मेंबर मे. अक्कलशून्य बुद्धिमंद दीडशहाणे यांच्या तृतीय चिरंजिवांच्या लग्नास अत्यंत आग्रहाच्या आमंत्रणावरून व स्पेशल मोटारची त्यांनीं सोय केल्यावरून सर्व मंडळी जिल्ह्याच्या गांवीं गेल्यामुळें सभा तहकूब.

**सभा १० वी :**—शाळामास्तर रजेवर गेल्यामुळें सभेंत ठराव 'लिवण्यास' व वाचून दाखविण्यास कोणी नसल्यानें काम करणें अशक्य झालें.

**सभा ११ वी :**—गेले दोन दिवस सपाटून पाऊस पडून गांवच्या ओढयास खूपच पाणी आल्याची बातमी गांवांत पसरली. तेव्हां तें पाणी समक्ष पाहून येण्यासाठीं सर्व मेंबर्स गेल्यामुळें सभा तहकूब.

**सभा १२ वी :**—म. गांधींनीं प्रायोपवेशन सुरू केल्यानें वाटणाऱ्या काळजीनें मेंबरांचें मनःस्वास्थ्य ठिकाणावर नसल्यानें सभा तहकूब.

**सभा १३ वी :**—मे. प्रेसिडेंटसाहेब यांना पुत्ररत्न लाभलें, सबब सर्व मेंबरांना आज फीस्ट झडणार असल्यानें तिच्या तयारीसाठीं सभा तहकूब.

**सभा १४ वी :**—म. गांधींना सरकारनें बिनशर्त बंधमुक्त केलें, यासाठीं परमदयाळू सरकारचें अभिनंदन करण्यासाठीं सभा तहकूब.

**सभा १५ वी :**—म्युनिसिपल मेंबर मे. पोलिसपाटील हे सरकारी कामानिमित्त बाहेर गांवीं गेले व जातांना आपल्या गैरहजेरींत कसलेंही महत्त्वाचें काम करूं नका असा निरोप ठेवून गेले असल्यामुळें ते परत येईपर्यंत सभा तहकूब.

**सभा १६ वी :**—जिल्ह्याच्या गांवीं चिंगी इस्लामपूरकरीण व गंगी वडूजकरीण यांचा अटीतटीचा सामना पाहण्यासाठीं बऱ्याच मेंबरांना जावयाचें असल्यामुळें सभा तहकूब.

**सभा १७ वी :**—श्रावण सोमवार सोडण्याची मेंबरांना घाई असल्यामुळें व दिवसभरच्या उपवासानें म्युनिसिपालिटींत वादविवाद करण्याइतकी शक्ति मेंबरांना नसल्यामुळें सभा तहकूब.

**सभा १८ वी :**—मे. रा. सा. शिक्षणाधिकारी यांनीं ठणठणपूरच्या

शाळेस भेट दिल्यामुळें सर्व मेंबर त्यांच्याभोंवतीं फिरत होते. त्यामुळें सभेस पुरेसा 'कोरम' नव्हता म्हणून सभा तहकूब.

**सभा १९ वी :**—म्युनिसिपल मेंबर मे. सय्यद हुसेन बागवान यांचे शेतावर हुरडा खाण्यास व त्यांनीं केलेली कोबीची लागवड पाहण्यास प्रेसिडेंट-सह सर्व मेंबर्स गेल्यामुळें सभा भरूं शकली नाहीं.

**सभा २० वी :**—मे. प्रेसिडेंटसाहेब यांनीं जुलाबाचें औषध घेतल्यामुळें सभा तहकूब.

वीस सभा या ना त्या कारणांमुळें तहकूब झाल्यावर एकविसावी सभा भरली, तेव्हां ऐन थंडीचे दिवस होते. मेंबरांना थंडी फार वाजत आहे, सबब आज बैठक तहकूब करून घरीं जाऊन सर्वांनीं रग पांघरून झोपून सोडावें अशी सूचना नेहमींच्या संवयीप्रमाणें एका मे. मेंबरानें आणली. पण आतां-पर्यंतच्या वीस ठरावांप्रमाणें हा एकविसावा ठराव एकमतानें पास झाला नाहीं. कारण, दुसऱ्या एका मे. मेंबरानें या ठरावावर अशी उपसूचना आणली कीं, म्युनिसिपालिटीविरुद्ध शेंकडों तक्रार-अर्ज गांवांतल्या नाठाळ लोकांनीं पाठविले आहेत. तर त्यांचीच गरम गरम शेकोटी करून मे. मेंबरांच्या कडक थंडीचें निवारण करण्यांत यावें.

ही बहारीची उपसूचना तत्काळ पसार होऊन ताबडतोब अंमलांतही आणण्यांत आली !

वीस बैठकी तहकूब केल्यानंतर एकविसाव्या बैठकींत तालुके ठणठणपूर येथील लोकनियुक्त म्युनिसिपालिटीनें जें लोकोपयोगी गरमागरम काम केलें तें हेंच होय !

स्थानिक स्वराज्याचा विजय असो ! !

# साहित्य संमेलनाची सर्कस

दैवाच्या फेऱ्यांत सांपडून 'पोटासाठीं भटकत' जरी आज मी हाजी अहंमद सैफुद्दीन काजी महंमद कबरुद्दीन खांजी रहमत जलालुद्दीन जाफराबादवाले यांच्या खास मालकीच्या 'धी ग्रेट इंडियन टायगर सर्कस'चा बिझिनेस मॅनेजर म्हणून काम करीत असलों, तरी माझी बालपणापासूनची खरी आवड साहित्यसेवेकडेच धांव घेत आहे. मराठी शाळेंत असतांना 'मरणोन्मुख होय आपुली माय' ही हृदयद्रावक कविता वाचल्यापासून आपल्या मायबोलीची कांहीं तरी सेवा करण्याची भीष्मप्रतिज्ञा मीं मनाशी केली होती; आणि भीष्माप्रमाणें माझ्या पाठीमागें ही पोटाची खळगी भरण्याची जबाबदारी नसती, तर मी ती प्रतिज्ञा पारही पाडूं शकलों असतों, असें अजूनही मला प्रामाणिकपणें वाटतें. भीष्म किती भाग्यवान् ! कीं त्याला पोटासाठी कांहींच उद्योग किंवा नोकरी करावी न लागल्यामुळें आपली प्रतिज्ञा पार पाडण्यास त्याला मुबलक वेळ मिळाला ! तसें भाग्य विधात्यानें माझ्या कपाळीं लिहिलें नव्हतें. माझा सकाळचा वेळ आधल्या रात्रींच्या सर्कसच्या जमाखर्चाचा हिशेब लिहिण्यांत खर्चीं पडे, दुपारचा वेळ त्या दिवशींच्या खेळांच्या जाहिराती काढणें, व त्या दिवशीं होणाऱ्या कामांसाठीं लागणारें सामान व लोक तयार ठेवणें, तंबूची व्यवस्था पाहणें, वगैरे कारणीं लागे, आणि संध्याकाळपासून मध्यरात्रींपर्यंतचा वेळ 'खास बदललेल्या कार्यक्रमाचे रोज दोन खेळ' व्यवस्थेशीर पार पाडण्याच्या दगदगींत चुटकीसरसा उडून जाई; अशा स्थितींत मला सुखासमाधानानें दोन घांस खाण्यासही कधीं उसंत मिळत नसे; मग कोठली वाङमयसेवा न् कोठली साहित्य-निर्मिति ? माझी खात्री आहे कीं, माझ्याप्रमाणेंच जर तो भीष्म एकाद्या सर्कसचा

'बिझिनेस मॅनेजर' असता, तर त्याला देखील आपली प्रतिज्ञा पाळण्यास फुरसत मिळाली नसती.

तथापि उत्कट प्रेम असेल, तर तें कोणत्या ना कोणत्या रीतीनें प्रकट झाल्यावाचून राहात नाहीं म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे! मनपसंत साहित्यसेवा करण्याची माझी उमेद जरी माझ्या व्यवसायामुळें आंतल्या आंत जिरून गली होती, तरी माझ्या वाङमयात्मक आवडीचा उपयोग मी माझ्या व्यवसायाकडे करून घेण्याची संधि सहसा दवडीत नसे. आणि या माझ्या 'गुणा'मुळेंच माझ्या जाफराबादी मालकांचा इस्लामी दिल् माझ्यासारख्या 'काफिरा'वर 'बहोत खूष' होता. सर्कसच्या खेळांचीं हातपत्रें व भिंतपत्रें तयार करतांना मी माझी वाङमय-निर्मितीची हौस चांगलीच भागवून घेत असल्यामुळें आमच्या सर्कसच्या जाहिराती लोक फार आवडीनें वाचीत. या माझ्या गुणामुळेंच 'बहोत खूष' होऊन माझे मालक हा. अ. सै. का. म. क. खां. र. ज. जाफराबादवाले यांनीं गेल्या सात वर्षांत एकसारखी मला बढती देऊन माझा पगार पंधरा रुपये होता तो साडेसतरापर्यंत आणून ठेवला आहे.

थोडें विषयांतर करूनही माझ्या मालकांच्या स्वभावांतील एक जाफराबादी गोम सांगितल्याखेरीज या माझ्या बैठकीचें रहस्य वाचकांच्या नीटसें ध्यानीं येणार नाहीं, अशी मला भीति वाटते. आमचे मालक मधून मधून एकाद्या नोकरावर 'बहोत खूष' होत आणि त्या खुषीच्या भरांत आपल्या लंब्याचवड्या दाढीवरून हात फिरवीत त्या नोकराला आणा अर्धाआणा एकदम बढतीचा 'हुकूम' देत; परंतु खुषीच्या स्वर्गसाम्राज्यांतून आपल्या मालकी मृत्युलोकांत स्वारी परत आली कीं, दिलेल्या बढतीबद्दल त्यांचा 'अ-फाट दिल' फाटूं लागे. परंतु हा 'इस्लामका बच्चा' वचनाचा सच्चा असल्यामुळें दिलेला हुकूम परत घेण्याचें पाप कधींच करीत नसे. त्याऐवजीं त्या नोकराच्या कामांत नाहीं त्या चुका काढून त्याला भराभर दंड करण्याचा जाफराबादवाले धडाका सुरू करीत व अशा मार्गानें चुकून दिलेल्या बढतीमुळें होणारें आपलें आर्थिक नुकसान मोठ्या हिकमतीनें भरपाई करून घेत! मालकाच्या असल्या स्वभावामुळें मला सात वर्षांत अडीच रुपये बढती मिळविण्यास कोण कौशल्य खर्च करावें लागलें असेल तें वाचकांनीं कल्पनेनेंच जाणावें!

वाचकांच्या माहितीसाठीं जाहिरातींतील माझ्या वाङमयबाजीची कांहीं उदाहरणें देणें गैरवाजवी होणार नाहीं. सगळ्याच सर्कशींत वाघ, बकरी आणि कोंबडी एका थाळींत पाणी पितात असा एक कार्यक्रम असतो, तसा तो आमच्याही सर्कशींत होता. या प्रकारचें वर्णन करतांना मीं एका जाहिरातींत लिहिलें होतें :—

### " श्वा, युवा, मघवा

कुत्र्याची, तरुणाची व इंद्राची एकत्र दावण बांधणाऱ्या पाणिनीची करामत आमच्या सर्कशींतील पितळेच्या थाळींतील पाण्यांत पाडणार !

कोण ?—आमचे पशुमोहक (ही पदवी मीं खास तयार केली होती.) मारुतराव.

केव्हां ?—आज रात्रौ.

कशी ?—सर्कशींत पाहाल तशी. "

पुण्यांत म्हैसूर आणणाऱ्या जाहिरातवाल्याप्रमाणें दुसऱ्या एका खेपेस मी भौगोलिक उलथापालथ करून लिहिलें होतें :—

### " ठणठणपुरांत आफ्रिका आली !

आफ्रिकेंतील जंगली जनावरें पाहण्यास आतां परदेशीं जायला नको. आमच्या सर्कसमध्यें वाघ, सिंह, हत्ती, घोडे, शिंगरूं, माकडें, पोपट, मैना, वगैरे जनावरें पाहावयास या. वैदू लोक हे जसे नेहमीं हिमालयांतील साधु-पुरुषांकडून दिव्यौषधी पैदा करतात, तद्वत् आम्हींही नेहमीं जंगली जनावरें आफ्रिकेंतील रानटी लोकांपासूनच आणतों. "

विनोदी वाङमय निर्माण करण्यास या जाहिरातबाजीत भरपूर वाव होता. हल्लीं सर्वत्र बोकाळलेल्या बक्षिसबाजीची कल्पना उचलून मीं एकदां 'विनोद' केला

### " न हंसणाऱ्यास बक्षीस !

आमच्या सर्कसमधील त्रयाणाम् विदूषकाणाम् यांची प्रचंड हास्यास्पद कामें पाहून जो जिवंत प्रेक्षक हंसणार नाहीं, त्याला आमचा सीनियर विदूषक

लंबकर्णभूषण सदारडे याची कानटोपी बक्षीस देऊं; न हंसणाऱ्या प्राण्यांना ती ' फिट् ' बसते ! "

असो. याप्रमाणें साहित्यसेवेच्या दुधाची तहान जरी मी जाहिरात-बाजीच्या ताकावर भागवून घेत होतों, तरी वाङ्मयसेवा करण्याची माझी लहानपणची आवड कांहीं समाधान पावेना. कांहीं भरीव कामगिरी माझ्या हातून घडावी अशी मला तळमळ लागून राहिली होती आणि ती शांत होण्याचा योग एकदां मोठ्या विलक्षण योगायोगानें आला.

त्या वेळेस आमच्या सर्कसचा मुक्काम ठणठणपुरास होता. एके दिवशीं सर्कसची जाहिरात तयार करून ती छापखान्यांत देण्यासाठीं मी जात असतां रस्त्यांत माझी व माझा बाळमित्र धूळफेके याची गांठ पडली. नमस्कार चमत्कारादि प्रथमोपचार झाल्यावर मीं म्हटलें :—

" तूं सध्यां येथें काय करतो आहेस ? "

" तूर्त येथें एक साहित्य संमेलन भरविण्याच्या धांदलींत मी आहें. या कामीं तूं मला मदत करशील ? "

" हो, हो, जरूर. पण एका अटीवर. "

" कोणती अट ? "

" संमेलनाच्या प्रसिद्धिखात्याचा चिटणीस मी होणार. आहे मान्य ? "

" तुझी अट मी एका अटीवर कबूल करतों. "

" कोणत्या ? "

" मीं तुला संमेलनचा चिटणीस नेमलें तर त्यामोबदला मला तुझी सर्कस पाहण्यास तीन दिवस फुकट सोडलें पाहिजे. कबूल ? "

" कबूल. पण एकच सर्कस तीन दिवस काय पाहणार तूं ? "

" अरे, तसें नव्हे. माझ्यासाठीं नाहीं ही योजना. मला दोन बायका नि एक आहे ' भानगड ' ! त्या तिघींना एकदम कसें घेऊन येतां येईल ! म्हणजे तुझी सर्कस पाहण्याऐवजीं त्या तिघी आपलाच तमाशा लोकांना दाखवतील फुकटांत. "

" बरें तर. ठरलें. "

" पण हें तुझ्या हातांत काय आहे ? "

" आजच्या सर्कसची जाहिरात. "

"पाहूं. पाहूं दे."

माझ्या हातून जाहिरात हिसकावून घेऊन ती तो मोठ्यानें वाचूं लागला :—

"जाफराबादी म्हशीप्रमाणच जाफराबादवाल्यांची थी ग्रेट इंडियन टायगर सर्कस सर्वत्र मशहूर आहे.

या सर्कसचे रिंगमास्टर पी. चाबुकस्वार आपल्या कलेंत नाणावलेले आहेत.

## अजब पशुखाना !

वीस शिकविलेले हिंस्र पशु ! आठ वाघ ! चाळीस घोडे ! असंख्य माकडें ! तीन हत्ती ! साळुंकी आणि मैना ! हंसून मुरकुंडी वळविणाऱ्या विदूषकांच्या नकला !

नवीन कार्यक्रम सुरू झाला !

नवीन कामें पाहून तुम्हांस मजा वाटेल !

नवीन प्रयोग पाहून तुम्ही थक्क व्हाल !

पांच वर्षांच्या आंतील मुलांना फुकट !"

जाहिरात वाचून झाल्यावर खूष होऊन धूळफेके म्हणाला, "अगदीं याच सुरावर आमच्या संमेलनाची एक चटकदार जाहिरात तयार करून दे पाहुं आज संध्याकाळपर्यंत."

"बरें आहे. देतों."

संध्याकाळपर्यंत डोकें खाजवून अखेर मीं जाहिरात तर तयार केलीच. या जाहिरातीवर मला संमेलनाचा चिटणीस निवडावयाचें कीं नाहीं तें अवलंबून होतें. त्यामुळें जाहिरात तयार झाल्यावर माझी मींच ती एकदां काळजीपूर्वक वाचून पाहिली :—

"याल तर हंसाल ! न याल तर फसाल ! !

## ठणठणपूर तालुक्यांतील साहित्यिकांचें दणदणीत संमेलन !

या संमेलनांत दृष्टीस पडणारी ठणठणपूरच्या म्युनिसिपालिटींतील लोककार्यदक्षतेची वाचाळ पुनरावृत्ति पाहून तुम्ही आश्चर्यचकित व्हाल !

सर्व प्रकारच्या मानवी स्वरूपांचा अजब जमाना ! वर्तमानपत्रांचे

शिवराळ संपादक ! कलमकुठार टीकाकार ! साहित्यशिशु लघुकथाकार ! अगणित कविवर्य ! लेखिका आणि कवयित्री !

या साऱ्यांचा प्रेक्षणीय जमाव तुमच्या डोळ्यांचें पारणें फेडील. विनोदी वावदुकांचीं भाषणें तुमच्या हंसून मुरकुंडया वळवतील. सर्कसचा रिंग-मास्टर जसा सर्व पशखाना काबूंत ठेवतो तसें संमेलनाचे अध्यक्ष या सर्व निरंकुश अहंमन्यांना व्यासपीठावर सांभाळून घेण्याची विलक्षण करामत करून दाखवितील !

सकाळीं एकाच ठरावावर परस्परविरुद्ध अकलेच्या कोल्हांट उड्या टाकणाऱ्या वाग्वीरांना, 'कोंवडहृदयी' नाजूक कवींना आणि व्याघ्रवृत्ति उग्र टीकाकारांना, इतिहाससंशोधकांना आणि प्रणयी लघुकथाकारांना, ब्रह्मचारी लेखकांना आणि लेंकुरवाळ्या लेखिकांना एकाच पंक्तीस बसवून दाखविण्याचें कौशल्य भोजनभैरव या संमेलनांत प्रकट करतील !

संमेलनांतील वाद तुमचें डोकें उठवतील !

पण काव्यगायन तुमची भरपूर करमणूक करील !

वर्तमानपत्रांच्या बातमीदारांना फुकट !

बाकींच्याकडून लायकी पाहून तिकिट घेतलें जाईल.

सर्कस संपल्यावर जसें तींत पाहिलेले खेळ स्वत: करून दाखविण्याचा आग्रह कोणी कोणाला करीत नाहीं, तद्वत् या ठणठणपूरच्या संमेलनांत जेंकां ही होईल, ठरेल, तें प्रत्यक्ष अंमलांत आणण्याबद्दल कोणासही सांगितलें जाणार नाहीं.

संमेलनाचा मुक्काम फक्त चार दिवस !

त्वरा करा !! घाई करा !! धांवा नि पळा !!

**अशी न मिळे मौज पुन्हां पाहण्या नरा !"**

बस्स.....!

ठणठणपूर तालुका साहित्य संमेलनाचा चिटणीस म्हणून एक मतानें निवडला गेलों व अशा रीतीनें माझी साहित्यसेवेची तळमळ 'याचि देही, याचि डोळां' भागली, हें चाणाक्ष वाचकांना ही जाहिरात वाचल्यावर वेगळें सांगणें जरूर आहे काय ?

# टिनमेकरची साहित्यसेवा

तालुके ठणठणपूरचे सुप्रसिद्ध हेन्री फोर्ड मारुति बल्लव तांबट हे अलीकडे रात्रींच्या शाळेंत जाऊन श्यान 'इची भन' लिवनं-वाचणं शिकूं लागले होते. अंकलिपि वाचून होतांच त्यांना आपण आतां सुशिक्षित झालों असा आत्मविश्वास वाटूं लागला, आणि आपला हा स्वसंपादित पराक्रम सगळ्या जगाला जाहीर करण्याच्या प्रबळ लालसेच्या आहारीं जाऊन ते केसरी पत्राचे वर्गणीदार झाले, आणि नंतर ठणठणपूर येथील तांबटगल्लींतील एका बट्ट्याबोळांतील आपल्या एकखणी भांड्यांच्या जंगी कारखान्यांत बसून व डोळ्याला सुतळीचा मोडका चष्मा लावून मारुतराव केसरी पत्र वाचण्यांत दिवसच्या दिवस अगदीं मशगूल झालेले दिसत. एक केसरी वाचण्यास त्यांना कमींत कमी तीन दिवस लागत; कारण प्रत्येक शब्द न् शब्द विचारपूर्वक वाचण्याकडे त्यांचा कटाक्ष असल्यामुळें र, ट, फ, असा विसांवा घेत घेत ते केसरी वाचीत. त्यांच्या या अपूर्व वाचनाच्या वेळीं त्यांचा नऊ वर्षांचा नातू तेवढा एक श्रोता त्यांना हक्काचा मिळे. पण त्या पोराचें लक्ष आजोबांच्या वाचनाकडे जास्त होतें कीं खिशांतील बैदुलाशीं चाळा करण्यांत जास्त वेधे, हें सांगणें कठिण.

केसरीसारख्या भारदस्त पत्राच्या वाचनाचा नाहीं म्हटलें तरी वाचकाच्या मनावर कांहीं तरी परिणाम होणारच कीं! निदान मारुति बल्लव तांबट यांच्या मनावर तरी तो खास झाला. त्या गंभीर पत्राच्या नित्य वाचनानें आपल्या मरणोन्मुख मराठी भाषेबद्दल जेहेत्ते मारुतरावांच्या मनांत दया उत्पन्न झाली आणि आपल्या मातृभाषेच्या उन्नतीस कांहीं तरी हातभार लावण्याची उत्कट महत्त्वाकांक्षा त्यांच्या म्हाताऱ्या मनांत उत्पन्न झाली. मारुतरावांनीं मनाशीं तत्काळ ठरवून टाकलें कीं, आपणही मराठी

साहित्याची थोडीफार सेवा करून त्याबरोबरच आपलें नांवही 'मासिकांत' छापून आणूं; पण हें ठरविणें जितकें सोपें होतें, तितकें कृतींत आणणें नव्हतें, हें लौकरच त्यांच्या ध्यानीं आलें. मशारनिल्हे निश्चय मनाशीं केल्यापासून रात्रंदिवस मारुतरावांच्या मानसचक्षूंसमोर :—

लेखक :—**मारुति बल्लब तांबट**

लेखक :—श्रीयुत **मा. ब. तांबट**

लेखक :—रा. रा. **मारुतिराव बल्लवपंत तांबट**

असे त्यांच्या नांवाचे वेगवेगळे लेखनप्रकार एकसारखे घोळूं लागले. त्यांना अगदीं चैन पडेनासें झालें. हे लेखनप्रकार केव्हां एकदां प्रत्यक्ष छापून आलेले पाहीन अशी त्यांच्या मनाला मोठी तळमळ लागून राहिली. पण त्यांनीं स्वतःच्या हातांनीं कांहीं तरी लेखनकर्म केल्याखेरीज हें स्वप्न सत्य कसें ठरावें ?

मारुतिरावांनीं आपल्या जीर्ण देहाकडून खूप धडपड केली. पिकले केस गळून पडेपर्यंत डोकें खाजवून पाहिलें. पण त्यांना 'लिवन्यास' विषयच सुचेना, आणि अंतरींची तळमळ तर थांबेना. तेव्हां त्यांनीं ठरविलें कीं, हे सुप्रसिद्ध लेखक म्हणविणारे लोक लेख कसे काय लिहितात हें त्यांनाच पत्रें पाठवून विचारावें व त्यांच्याप्रमाणें आपणही करावें म्हणजे आपणास भराभर विषय सुचतील.

ही कल्पना येतांच तब्बल पंधरा दिवस खपून व चौदा शेर तंबाखूचा फडशा पाडून सुप्रसिद्ध लेखकांना विचारावयाची एक प्रश्नावलि त्यांनीं तयार केली व तिच्या आरंभीं थोडी माहितीवजा प्रस्तावना जोडून तें पत्र त्यांनीं ठिकठिकाणच्या साहित्यसेवकांकडे पाठवून दिलें. तें पत्र येणेंप्रमाणें होतें :—

"तांबट गल्ली,<br>पांचवा बट्ट्याबोळ<br>ता०—आपणांस ज्या दिवशीं पत्र<br>पोंचेल त्याच्या आदले दिवसाची.

सुप्रसिद्ध लेखक रा. रा. श्री.

अमुक बिन तमुक निसबत आडनांवें यांशी :—

तांबट गल्लीहून भावी सुप्रसिद्ध लेखक श्री. रा. रा. मारुतराव बल्लवपंत तांबट यांचा सप्रेम रामराम.

आपणास पत्र पाठविण्यास कारण कीं, आपल्याप्रमाणेंच मीही एक सुप्रसिद्ध लेखक होऊं इच्छितों. या कारणासाठीं आपण मला मदत करणें आपलें कर्तव्य आहे. मला लिहिण्यास कांहीं सुचत नाहीं. आपणांस तें कसें सुचतें तें कळवा. म्हणजे मीही त्याप्रमाणें करीन.

मी कोण आहें हें आपणांस ठाऊक नसेल, म्हणून कळवितों कीं, ठणठणपूर तालुक्यांत मीं एक टिनचीं भांडीं करण्याचा "कारखाना" काढलेला असून आज या कारखान्यांत माझ्यासुद्धां दोन(शें) माणसें कामावर आहेत. माझ्या कांहीं दोस्तांना कांहीं कांहीं टिनपॉट्स् फुकट पुरवून त्यांच्या मोबदल्यांत मी स्वतःस ठणठणपूरचे "हेन्री फोर्ड" म्हणवून घेतों. धंदा म्हटला कीं, अशा गोष्टी कराव्याच लागतात. आपणांस माहीतच आहे कीं, इंडियन माणूस कितीही कर्तबगार झाला, तरी कोणा तरी साहेबाच्या नांवाचा टिळा त्याच्या कपाळीं लागल्याखेरीज कांहीं त्याचा मोठेपणा आमच्या लोकांच्या ध्यानीं येत नाहीं. यामुळेंच तर बिचाऱ्या फोर्ड साहेबाची अशी बेअब्रू मला करावी लागत आहे.

माझें वय आज सत्तेचाळीस वर्षांचें आहे. शेजारचा म्हादबा सुतार व मी एकदम जन्मलों. माझा हल्लींचा कार्यक्रम म्हणजे सूर्योदयानंतर उठून तंबाखूचा बार दाबून भरून अंगणांत दोन तास गप्पा मारीत बसतों. माझ्या गप्पांचे विषय म्हणजे माझ्या व्यवसायबंधूंच्या चुका. नंतर एकादें गिऱ्हाईक आल्यास थोडें काम करतों, कोणी न आल्यास तेवढा वेळ हाताखालच्या पोऱ्यास शिक्षण (शिव्या) देण्यांत घालवितों. "श्रीमहाकाळी परसण्ण"-मध्यें चहा व भजीं खातों. नंतर गांवांत भटकून येतों. घरचे तांदूळ, जोंधळे लौकर संपविल्याबद्दल कारभारणीस जरा समज (हातानें) देतों. जेवण झाल्यावर सूर्य मावळेपर्यंत झोंप काढतों. नंतर पुनः चिलीम व चहा. मारुतीचें दर्शन घेऊन गुत्त्यांत जाऊन 'पितों'! घरीं येऊन अस्तुरीस मर्दाचा हात दावतों व नंतर पुनः झोंप, ती उजाडेपर्यंत!

गेल्या दोन वर्षांपर्यंत माझा हा कार्यक्रम होता. पण हल्लीं मराठी वाङ्मयाची सेवा करण्याची इच्छा झाल्यापासून मला दुसरें तिसरें कांहीं सुचत नाहीं! पण ही सेवा कशी करावी तें मला कळत नाहीं. म्हणून आपणांस मी कांहीं प्रश्न विचारतों. त्यांचीं उत्तरें आपण जरूर जरूर

पाठवावींत. कारण तींच आपलीं पत्रें माझ्या नांवावर छापून मी सुप्रसिद्ध लेखक बनण्याचा यत्न करणार आहें.

एका गोष्टीकडे मात्र आपण लक्ष द्यावें. हें पत्र व प्रश्न सुप्रसिद्ध लेखकांसाठीं आहेत. पण सुप्रसिद्ध व अप्रसिद्ध लेखक कोणाला म्हणायचें हें ठरविण्यास निश्चित साधन नाहीं, म्हणून मी हें पत्र सर्वांच्याकडे पाठविणार आहें. आपण सुप्रसिद्ध लेखक असाल, तर याचें उत्तर पाठवा. नसाल तर पत्र फाडून टाका. अप्रसिद्ध लेखकांचें उत्तर मला नको.

आतां माझे प्रश्न देतों :—

(१) माझ्याप्रमाणेंच आपण सूर्यवंशी आहांत काय? जागें झाल्यावर आपण किती वेळ अंथरुणांत लोळत पडतां? व अशा लोळण्यापासून आपल्या साहित्यसेवेस कितपत साहाय्य होतें?

(२) आपण चष्मा लावतां का? साध्या दृष्टीला न दिसणारें 'काव्य' दिसण्यास त्याचा काय उपयोग होतो?

(३) दिवसांतून किती वेळ चहा पितां? चहाचा व स्फूर्तीचा संबंध कितपत आहे? लिप्टनच्या ऐवजीं अंबर टिप्स् चहा प्याल्यानें प्रतिभा कमी जास्त होते काय?

(४) आपण लेखन कोणत्या वेळीं करतां? सकाळीं, दुपारीं, कीं रात्रीं? कोठें करतां? घरीं, आगगाडींत कीं टांग्यांत बसले असतांना आपणांस जास्त लिहावयास सुचतें?

(५) लेखनाची पूर्वतयारी म्हणून आपण दाढी करतां का? सफा कट केल्यानें चेहऱ्याप्रमाणेंच लेखनालाही कितपत सौंदर्य चढतें?

(६) खुर्चीवर ऐटींत बसून एकाद्या ऑफिसरप्रमाणें आपण लेखन करतां का भिकार कारकुनाप्रमाणें डेस्कवर लिहितां? विद्यार्थ्याप्रमाणें आसनमांडी ठोकून पुस्तीपत्रावर लेखन केल्यास परिणामकारकता वाढते कीं कमी होते?

(७) लिहितांना आपण उघडे-बोडके बसतां कीं, सुटाबुटांत बसतां? साहेबी पोषाख घालून बसल्यानें साहेबासारखें फर्डे लिहितां येतें काय?

(८) लेखनास आपण आंखीव कागद वापरतां कीं साधे? आंखीव कागदावर लेख अधिक उठावदार होतो काय? आपण मार्जिन किती सोडतां?

अर्धे पान मार्जिन सोडून लेख लिहीत असतांही एका अरसिक संपादकानें कळविलें कीं, अर्ध्या पानाऐवजीं सबंध पान मार्जिन सोडूनच आपण वाङ्मय-सेवा अधिक चांगली करूं शकाल ! असा मोफत सल्ला देण्याची मेहेरबानी कोण्या संपादकानें आपणांवर कधीं केली आहे काय ?

(९) आपणास हिरवी शाई चालते कीं काळी ? कळवाल का ? म्हणजे मीही तसलीच शाई आणीन. आपण हेंडल् व टोंक कसलें वापरतां ? लेडीपेननें लिहिलेल्या लेखांत लालित्य अधिक येतें काय ? फाउंटनपेनचा मेक बदलल्यानें आपल्या लेखनगुणांत कांहीं फरक पडतो काय ?

(१०) जुन्या वृत्तपत्रांचा व मासिकांचा संग्रह आपण कितपत केला आहे ? व त्यांपासून आपण किती टक्के स्फूर्ति घेतां ?

(११) आपणांस प्रसिद्धिलालसा कितपत आहे व ती कशी भागवितां ?

(१२) आपण सुप्रसिद्ध लेखक होण्यासाठीं कोणाकोणाला फीस्ट चारली ? व किती संपादकांना चहापार्टी दिली ?

(१३) आत्मप्रौढीचें आपलें प्रमाण व पद्धत काय आहे ?

(१४) कोणकोणत्या साहित्यिकांबद्दल आपणांस व्यावसायिक मत्सर वाटतो ?

(१५) आपलें लग्न व आपल्या लिखाणांतील समरप्रसंग यांचा संबंध कसा व काय आहे ?

(१६) चुंबन-आलिंगनादि जे प्रसंग आपण हम्मेष लेखनांत रंगवितां तसे प्रत्यक्ष कृतींत आणण्याची हिंमत आपणास कधीं होते काय ?

(१७) मराठीखेरीज आपणांस दुसरी कोणती भाषा येते ? व त्या भाषेंतील वाङ्मयांतील कल्पना आपल्या लिखाणांत बेमालुम मिसळून देण्याची आपली खुबी काय ?

(१८) आपल्या लिखाणांत आपण नेहमीं सद्‌गुणांचा जय होऊन दुर्गुणांचा पूर्ण पाडाव झाल्याचें रंगवितां. आपण नेहमीं सद्‌गुणांची तरफदारी करतां त्यावरून आपण स्वतः सद्‌गुणी आहांत असें वाटतें. पण शंका इतकीच येते कीं, जर आपणही खरोखरीच तसे असाल तर आपल्या गोष्टींतील सद्‌गुणी पात्रांप्रमाणें आपलें आयुष्य यशस्वी झाल्याचें कां दिसत नाहीं ?

(१९) आपल्या कपाटांत प्रसिद्ध वाङमयापेक्षां अप्रसिद्ध व संकल्पित वाङमयाचीं बाडें किती पटीनें भरलीं आहेत ?

(२०) जमो न जमो, पण वाङमयाच्या सर्व शाखांत आपली लेखणी बेधडक व बेफाट चालविण्याचा अत्याचार आपण कसा करतां ? व वाचकाचा सूड घेण्याखेरीज आपणांस त्यापासून काय फलप्राप्ति होते ?

तूर्त एवढे वीस प्रश्न पुरे आहेत. या प्रश्नांचीं उत्तरें आपण निःसंकोच मनानें पाठवावींत. कारण तीं मी माझ्या नांवावर छापणार आहें. याखेरीज स्वतःचें नांव छापून आणून वाङमयसेवा करण्याची हौस भागविण्याचा दुसरा उपाय मला सुचत नाहीं, याला मी तरी काय करूं ?

कळावें लो. अ. हे. विनंति

आपला नम्र साहित्यिक

**मा. ब. तांबट "**

# नोकरीची लायकी

## [ एकांकी एक प्रवेशी प्रहसनिका ]

### प्रहसनिकेंतील पात्रें

**श्रीमंत** :—ठणठणपूर येथील एक इनामदार, वय वर्षें ४५.
**विसाजीपंत** :—श्रीमंतांचे खाजगी कारभारी, वय वर्षें ५५.
**गुंडम्भट** :—श्रीमंतांचे उपाध्ये, वय वर्षें ४७, महिने सात.
**गजाननराव** :—गुंडम्भटांचा भाचा, वय वर्षें २१.
**पुंड्या** :—विसाजीपंतांचा पुतण्या, वय वर्षें २७.
**जयाबाई** :—श्रीमंतांची पूर्वींची मोलकरीण व सध्यांची 'मालकीण,' वय ??

### अंक पहिला व शेवटला
### प्रवेश पहिला व अखेरचा

[स्थळ :—श्रीमंतांच्या जुनाट पडिक चौसोपी वाड्यांतील एक दालन; दालनांत पावलागणिक खांब आहेत. पैकीं एका खांबाला टेकून एका मळक्या सतरंजीवर एक गादी व लोड आहे. श्रीमंत लोडाला टेकून पडले आहेत. त्यांचा पोषाख म्हणजे तलम धोतर, मलमलीचा शर्ट, त्याला सोन्याचीं बटणें, त्यावर तांबड्या मखमलीचें भरजरी जाकीट, शेजारीं पान-सुपारीचें चांदीचें तबक व पिकदाणी आहे. श्रीमंतांना अगदीं खेटून जयाबाई बसली आहे. तिचें संपूर्ण गौरांग स्पष्ट दिसेल इतकें झिरझिरित गुलाबी वस्त्र तिनें पेहेरलेलें आहे. खांद्यापर्यंत ष्ट दंड उघडा टाकणारा हिरवा जरीचा पोलका तिच्या अंगांत आहे. ा चेहरा पावडरीनें व तोंड विड्यानें

रंगलें आहे. श्रीमंतांसाठीं ती आपल्या नाजक हातांनीं सुरेखशी पट्टी करून देण्यांत गर्क आहे असा पडदा उघडतो.]

**जयाबाई** :—घ्यावी ही पट्टी.

**श्रीमंत** :—नको ग. (तोंड आंवट करून पोट दोन्ही हातांनीं दाबतात.)

**जया** :—कां ? पोट का वरं नाहीं ? मग चोळू का जरा ? (तसें करते.)

**श्रीमंत** :—आज सकाळीं शौचाला साफ नाहीं झालं. अलीकडे असं होतं नेहमीं. तरी दोनदां एनिमा घेतला आज.

**जया** :—मग डॉक्टरला बोलवावं ना एकदां ?

**श्रीमंत** :—हो. आतां एकाद्या साहेबडॉक्टरांना दाखवावं म्हणतों. आमच्या गांवठी डॉक्टरांना कांहीं कळत नाहीं. पण हा इंग्रज डॉक्टर आणायचा म्हणजे त्याच्याबरोबर इंग्रजींत बोललं पाहिजे ना ? तें कुणाला येतंय् इथं ? म्हणून एकादा इंग्रजी जाणणारा कारकून नेमून घ्यावा म्हणून विसाजीपंतांना हुकूम दिला आहे. पाहूं कोण मिळतो तो.

[इतक्यांत गुंडम्भट उपाध्ये व गजानन प्रवेश करून श्रीमंतांना नम्रतापूर्वक नमस्कार करतात. औपचारिक प्रश्नोत्तरें झाल्यावर—]

**श्रीमंत** :—काय भटजी, हे कोण बरोबर आणलेत ?

**गुंड** :—हा माझा भाचा गजानन. यंदाच बी.ए. झाला. म्हटलं, आपल्या सेवेला लावावा. आम्ही आपले उपाध्ये. आपल्यावाचून दुसऱ्याची सेवा नाहीं करणार कोणी आमच्या घराण्यांतलं. आपल्यासारखा यजमान तीन जन्म तपश्चर्या करूनही नाहीं मिळणार ! अनुभव आहे माझा....

**श्रीमंत** :—(खूष होऊन) हो, हो, हो, हो ना ! हो ना, हो ना !

[इतक्यांत विसाजीपंत आपल्या गलेलठ्ठ तालिमबाज पुतण्यासह प्रवेश करतात. नमस्कार-चमत्कारानंतर—]

**श्रीमंत** :—का पंत, कोण हे ?

**पंत** :—हा माझा पुतण्या पुंडोपंत शागिर्दे. आपल्या चरणांवर घालण्यासाठीं आणला आहे. इंग्रजी येतें त्याला चांगलं. आपलं सारं इंग्रजी काम करील तो चोख.

**श्रीमंत** :—अरे वा, काय शिकलाय् तुमचा पुतण्या ?

**पुंड्या** :—(एकदम मध्येंच) पांच वेळा मॅट्रिकला बसलोंय् मी.

**श्रीमंत** :—काय पांच वेळ मॅट्रिकला ? ....मॅट्रिकला पांच वेळ बसलांत ?

**पंत** :—(श्रीमंतांचा नूर ओळखून अभिमानानें) हो हो, पांच वेळ ! तसा हुषार आहे सरकार माझा पुंड्या !

**जया** :—(गजाननाकडे पाहून) आणि तुम्ही हो काय शिकलांत ?

**गजानन** :—बी. ए. ऑनर्स आहें मी.

**श्रीमंत** :—पण मॅट्रिक पास आहांत का ?

**गजानन** :—(येणारें हंसू दाबीत) मॅट्रिक झाल्याशिवाय बी. ए. होतां येत नाहीं सरकार.

**पंत** :—तुम्ही मॅट्रिकला कितीदां बसलांत ?

**गजानन** :—(अभिमानानें) एकदांच !

**श्रीमंत** :—(एकदम ओरडून) काय एकदांच ? अवघे एकदांच बसून सोडून दिलंत तुम्हीं ? ...

**पंत** :—(गजाननाला बोलूं न देतां मध्येंच) आमचा पुंड्या सरकार पांच वेळ बसला मॅट्रिकला. यांच्यासारखें एकदांच बसून सोडून दिलं नाहीं त्यानं.

**गुंड** :—पण पहिल्याच वर्षी गजानन पास झाला.

**पुंड्या** :—(एकदम) वास्वानीच्या नोट्स् पाठ करून झाला असेल. आय से, दे आर फूल्स्. हू पास मॅट्रिक फर्स्ट इअर ? बिग फूल्स् !

**श्रीमंत** :—(या जोरदार आवेशानें थक्क होऊन) काय हो पुंडोपंत, तुम्ही साहेबाबरोबर बोलाल का असं इंग्रजी ?

**पंत** :—सरकार, पुंड्या तर आपल्या आईबरोबरसुद्धां इंग्रजी बोलतो.

**जया** :—(गजाननास) आणि तुम्ही हो ?

**गजानन** :—माझ्या आईला नाहीं समजत इंग्रजी !

**श्रीमंत** :—काय ? तुम्ही आईबरोबर इंग्रजी बोलत नाहीं ? मग साहेबाबरोबर कसं बोलणार ?

**पंत** :—बरं पण तुम्ही एनिमा घेतां का ?

**गजानन** :—छे, माझी प्रकृति निकोप आहे.

**श्रीमंत** :—(अंगावर निखारा पडल्याप्रमाणें किंचळून) काय? तुम्ही एनिमा घेत नाहीं? मग तुमची प्रकृति कशी धड असणार? मी वीस वर्षांच्या अनुभवानं सांगतों कीं, प्रत्येक माणसानं एनिमा घेतलाच पाहिजे.

**पंत** :—होय, सरकार. आपलं म्हणणं अगदीं खरं आहे. म्हणून तर पुंड्याला मी अगदीं लहानपणापासून ती संवय लावली आहे. सरकार, आपलं उदाहरण पाहून मी वागतों म्हणून तर आज साठीच्या सुमारास माझी काठी अशी बळकट आहे. आणि आपला तरी काय हा धिप्पाड देह (स्वगत) हाडं मोजून घ्या लेकाचीं.

**पुंड्या** :—(पंतास एकीकडे) काका, एनिमा म्हणजे काय हो?

**पंत** :—(पुंड्यास एकीकडे) गप्प बैस गाढवा, नाहीं तर हातची नोकरी घालवशील. श्रीमंतांना एनिमा न घेणारीं माणसं आवडत नाहींत.

**श्रीमंत** :—मग पंत, आमच्या नोकरीला या. गजाननरावापेक्षां हे पुंडोपंतच सर्वतोपरी लायक आहेत—

**पुंड्या** :—(मध्येंच) होय सरकार, आपण योग्य पारख केलीत. अगदीं गाजरपारख्या—

**पंत** :—(एकदम मध्येंच) अगदीं गाजरासारख्या लालबुंद रत्नांची पारख करावी आमच्या श्रीमंत सरकारनींच. तुका म्हणे येथें पाहिजे जातिचे (स्वगत—नंदीबैलाच्या) येरा गबाळाचें काम नोहे.—(भजनाच्या सुरावर)

जय जय पुंडलीक हारि विठ्ठल !
ज्ञानदेव-तुकाराम ।
जय जय आमचे श्रीमंत सरकार ।
हेंचि दान दे गा देवा । श्रीमंतासारखा धनी व्हावा ॥

[पडदा]

# माझें हस्तलिखित मासिक

कोणत्याही मोठ्या माणसाचें चरित्र उघडून पहा, त्यांत तुम्हांला आढळून येईल की, त्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचें बीज तिच्या आयुष्यांत लहानपणीं घडलेल्या कोणत्या तरी अपमानकारक गोष्टींत लपलेलें आहे. इंग्रज लोक बोलून चालून आपणांला परके म्हणून त्यांच्याकडचीं असलीं उदाहरणें मी देत नाहीं. (खरें बोलायचें म्हणजे इंग्रजी तिसरींत असतांनाच मीं शाळेवर 'बहिष्कार' घातला आहे; आणि मॅकमिलन् कंपनीच्या तीन क्रमिक पुस्तकांपलीकडे कोणत्याही इंग्रजी बुकास मीं हातही लाविलेला नाहीं. त्यामुळें कोणीं दे म्हटलें तरी असलीं उदाहरणें मला देतां येणार नाहींत हा भाग वेगळा.) पण आपल्याकडे देखील असल्या उदाहरणांना तोटा नाहीं. राम्या शागीर्दाचा रामशास्त्री प्रभुणे होण्यास कारण काय? यजमानांच्या पायावर पाणी ओततांना झालेल्या दुर्लक्षा-बद्दल मिळालेला 'वाक्प्रसाद'च ना? केशवसुतांच्या चेहऱ्याबद्दल किंवा आगरकरांच्या अभ्यासाबद्दल त्या त्या शिक्षकांनीं त्यांचा अपमान भर वर्गांत केला नसता तर माझी खात्री आहे कीं हे दोघेही थोर पुरुष 'कोठें आणि कधीं तरी जगतिं या होऊन जाते बरें.' गडकऱ्यांना नाटक कंपनीच्या दारावर उभें रहावयाचा प्रसंग न येतां तर ते इतके तेजस्वी नाटककार कधींच झाले नसते!

पण मी म्हणतों हीं दुसऱ्यांचीं उदाहरणें तरी हवींत कशाला! प्रत्यक्ष माझ्या चरित्राचें सार व शिकवणूक तरी हीच नाहीं काय?

मी जो आज एवढा 'प्रतिथयश साहित्यिक' (वाचकांनो, शब्द चुकला असला तर दुरुस्त करण्यास माझी परवानगी आहे. मला याचा नक्की

अर्थ नाहीं माहीत. पण बहुतेक लेखक हा शब्द हल्लीं सर्रास वापरीत आहेत त्यामुळें मलाही माझ्या इभ्रतीसाठीं तो वापरणें भाग आहे.) झालों आहे. आणि 'वडगांव-समाचार' पत्रासारख्या या भागांतील एकमेव व वजनदार वर्तमानपत्राच्या 'स्टाफ'वर 'न्यूज एडिटर' या मानास्पद जागीं आरूढ झालों आहें त्याचें मूळ कारण तरी दुसरें काय आहे?

अपमान!—भयंकर अपमान!!

वस्स्!!!

अजून त्या भयंकर अपमानाची आठवण झाली कीं, अंगावर शहारे येतात. १९१९ च्या डिसेंबर मधली गोष्ट. मी त्या वेळेस एका प्रायव्हेट स्कूलमध्यें इंग्रजी तिसरीचा अभ्यास करीत होतों. खरोखर तो अभ्यास मला एम्.ए. च्या अभ्यासापेक्षांही विकट वाटे. कोणीं तरी मला सांगितलें आहे, कीं एम्.ए. ला अभ्यासासाठीं फक्त एकच आणि तो सुद्धां आपल्या इच्छेस येईल तो विषय असतो. माझ्या वेळीं इंग्रजी तिसरीला इंग्रजी, मराठी, गणित, इतिहास, भूगोल वगैरे विषयांची फलटणच्या फलटण होती. जीव कसा हैराण होई त्या संगीन माऱ्यापुढें! पण करणार काय? वडिलांच्या धाकानें मला त्या तरवारीखालीं निमूट मान वांकवावी लागे. अर्थातच पुढें मीं 'वडगांव-समाचार' पत्राचा सहसंपादक झाल्यावर या अन्यायाविरुद्ध एक 'दणदणीत' लेख लिहून लहानपणीं मला सोसाव्या लागलेल्या त्रासांचें अल्प प्रमाणांत परिमार्जन करण्याचा यत्न केला. इंग्रजी तिसरी चौथींत मुलें येतात तेव्हां तीं कोवळ्या वयाचीं असतात. त्या वेळीं त्यांच्या शिरावर पांच सहा विषयांच्या अभ्यासाचा बोजा लादायचा न् तोच एम्.ए. त आल्यावर बुद्धीनें व वयानें प्रौढ झाल्यावर मात्र त्याला अभ्यासाला एकच विषय ठेवायचा ह्या जुलुमाकडे अद्याप कोणाही 'साहित्यिका'चें लक्ष गेलेलें नाहीं. प्रथमतः मींच या विषयावर लेखणी उचलून एका मोठ्या समाजकार्याला हात घातला होता. पण दुर्दैवानें 'वडगांव-समाचार'चे संपादक स्वतः एम्.ए. असल्यामुळें म्हणा किंवा मला त्या लेखानें मिळवून दिली असती त्या कीर्तीचें वैषम्य वाटल्यामुळें म्हणा त्यांनीं माझा तो लेख केराच्या टोपलींत टाकला. टोपली रिकामी करतांना तो लेख बॉयच्या हातीं लागला. त्याला

मात्र त्यांतील मुद्दे एकदम मान्य झाल्याचें त्यानें मला सांगितलें. एक तरी 'समानधर्मा' मिळाला याचा मला आनंद झाला !

मी संपादक असल्यामुळें विषयांतर करणें हा माझा स्वभाव पडला. पण मुद्द्याची गोष्ट अशी कीं, अस्मादिकांची स्वारी इंग्रजी तिसरींत असतांना एकदां शाळेला बुट्टी देऊन वाभळीच्या तालमींत पत्ते खेळत बसली होती. तेव्हांच व तेथेंच माझ्या आयुष्याचें ध्येय माझ्या हातीं प्रथम गवसलें. माझा मित्र बंडया कुलकर्णी मला म्हणाला :

"अरे टिल्ल्या, तुला एक गम्मत सांगायची आहे. तो आमच्या घरापलीकडे शिखरे राहतो ना ? तो व मी मिळून एक मासिक काढणार आहोंत."

"काय मासिक ?" हत्ती अंगावर चालून आल्यासारखा मी किंचाळलों. "अरे बंडया, नीट शुद्धीवर आहेस ना ? वर्गांत मास्तरांनीं पांच ओळी शुद्धलेखन घातलें तर सत्तावीस चुका करणारा तूं—तूं काय मासिक काढणार ?"

"अरे लेका, शुद्धलेखनांत चुका होतात" बंडया शांतपणें म्हणाला, "त्या मी तुझी कॉपी करतों म्हणून होतात. आणि शिवाय शिखरे सांगत होता कीं, संपादक झाल्यावर स्वतःला कांहींच लिहावें लागत नाहीं. दुसऱ्याचेच लेख आपल्या नांवावर दडपायचे म्हणजे झालें. अरे, म्हणून तर मी कबूल केलें संपादक व्हायचें."

"मग मी काय तुझा दुय्यम संपादक होऊं ?"

"तूं आमचा मुख्य लेखक हो. पहिल्या अंकासाठीं एकादा फक्कडसा लेख लिहिला पाहिजेस तूं. आठ दिवसांत दे लिहून."

"अरे पण मला लेख कुठं लिहायला येतात ?"

"यायचं काय त्यांत ? शिखरे म्हणाला कीं, तुझ्या वडलांच्या जवळ फार पुस्तकं आहेत. त्या प्रत्येक पुस्तकांतलीं दहा दहा वाक्यें उतरून तयार कर एक लेख."

गुरुदेवांच्या या उपदेशानुसार सतत आठ दिवस राबून अक्षरशः रात्रीचा दिवस करून मीं एक लेख तयार केला. बाबांचीं सारीं पुस्तकं कुलपांत असल्या-मुळें त्यांचा नाद सोडून मी स्वावलंबनाचाच पंथ पतकरला. माझ्या जुन्या

शालोपयोगी फाटक्या पुस्तकांचे अवशेष गोळा करून मी माझ्या लेखनाची तयारी करूं लागलों.

अखेर एका पुस्तकांतील लेख पसंत करून व त्यांत बरीचशी फिरवा-फिरव करून मीं 'नेमस्तपणाचें महत्त्व' या नांवाचा लेख 'लिहिला'. हा लेख मला 'झाला' त्या वेळेस पहिलटकरणीच्या यातनांचा मला अनुभव आला. इकडून वडील कोठें चुकून येतील कीं काय, तिकडून आई हांक मारील कीं काय, एकादा शाळूसोबती इतक्यांतच आला तर आपलें 'रहस्य' बाहेर फुटेल कीं काय, अशा त्रिविध तापांत मी त्या वेळेस सांपडलों होतों. चौफेर नजर फिरवून कोणी नाहीं अशी खात्री करून घेऊन मग हळूच गादी-खालीं लपविलेल्या पुस्तकांतलें एक एक वाक्य वाचायचें न् मग आठवेल तसें तें वेगळ्या कागदावर उतरायचें ! खरोखर मला त्या वेळीं जें कांहीं वाटलें तें वाटलें ! आपण कांहीं तरी 'अचाट' गोष्ट करीत आहोंत असा अंतस्थ अभिमान मला वाटून रक्त कसें चैतन्यानें सळसळत होतें. तर उलट आपली 'चोरी' उघडकीस येऊन आपली फजीति होईल कीं काय या भीतीनें रक्त गोठूनही जात होतें. लेख मासिकांत 'प्रसिद्ध' झाल्यावर माझे वर्गबंधू माझ्याकडे कसे कौतुकानें पाहूं लागतील या कल्पनेनें अंगावर रोमांच उभे राहात, तर उलट लेख लिहिल्याचें बाबांना कळलें तर मिळणाऱ्या शिक्षेच्या कल्पनेनें अंगाला कापरें सुटे ! मन बावरलें होतें, हात थरथर कांपत होते आणि पोटांत कसला तरी गोळा उठल्यासारखें वाटत होतें. हीं कशाचीं लक्षणें आहेत हें त्या वेळेस मला कळलें नाहीं, पण आतां 'प्रतिथयश' (वाच-कांनो ! ओठावर आलेल्या शिव्या आवरून धरा. सध्यांच्या वाङमयांतील हें एक 'लेखक प्रिय' चलनी नाणें आहे.) लेखक झाल्यावर माझ्या ध्यानीं येऊन चुकलें आहे, कीं 'प्रतिभा' 'प्रतिभा' म्हणतात ती हीच. अद्यापही मी लेख लिहूं लागलों, कीं माझ्या पोटांत तसलाच गोळा उठतो, आणि माझ्या प्रतिभाशक्तीची खूण मनाला पटते. पोटांत प्रतिभा 'गोळा' झाल्याखेरीज लेखकाला 'लेख' (हे जुळारी महाशय, ख बरें, क नव्हे) तरी कसा होणार ?

दुसरे दिवशीं मधल्या सुटीत बंड्याला मुतारीच्या बाजूस नेऊन हळूच मीं तो लेख त्याच्या हवालीं केला. वर्षभर राबून तयार केलेल्या शेताचा

खंड एक-रकमी खंडकऱ्याच्या पदरांत टाकतांना शेतकऱ्यास काय वाटत असेल याची तेव्हां मला जाणीव झाली !

नवीन हॉटेलवाला पहिल्या गिऱ्हाइकाची ज्या उत्सुकतेनें वाट पाहतो त्या उत्सुकतेनें मी बंड्याच्या हस्तलिखित 'भृंग' मासिकाची वाट पाहात होतों. आणि हातीं अंक येतांच समोर संस्कृत शिकविणाऱ्या खरे मास्तरांच्या हातांतील छडीचाही धाक न मानतां मीं तो वर्गातच उघडून पाहिला. पण व्हिस्कीच्या बाटलींतून गांवठी दारू बाहेर पडावी तद्वत् माझ्या सुंदर लेखाचें करण्यांत आलेलें विकृत रूप पाहून मला झालें.

माझ्या लेखांतील बराचसा भाग संपादक शिखऱ्यांनीं मला न कळवतां गाळून टाकला होता ! !

हा अपमान मला सहन होण्यासारखा नव्हता. त्या क्षणीं तेथल्या तेथें मीं घनघोर भीष्मप्रतिज्ञा केली कीं माझे लेख जसेच्या तसे छापण्यासाठीं मी स्वतःचेंच एक मासिक सुरू करणार आणि या शिखऱ्यांची खोड मोडणार ! बस्स्. . . . ठरलें !

आणि तावडतोब कंबर बांधून मीं कामास सुरुवातही केली. माझे जानी दोस्त रघु देशपांडे, बाबू राजापुरे व दत्तु विनु नाटु या त्रिवर्गाच्या सक्रीय साहाय्याच्या जोरावर मी पुढें त्याच महिन्यांत एका हस्तलिखित मासिकाचा एकदांचा संपादक तर झालों !

# बालप्रकाश

—सपादक—

**टिल्लोबा भणगोबा भडभुंजे,**

व्ह. फा., एस. पी. इ. एस.

असें माझें नांव लिहिलेलें मलपृष्ठ पाहात मी किती तरी वेळ एका प्रकारच्या 'सविकल्प समाधी'चा आस्वाद घेत होतों. इतक्यांत माझा मित्र दत्तु विनु नाटु माझ्या खोलींत आला. गायीच्या आचळाला लागलेल्या पाडसाला हुसकून दूर करणाऱ्या लोभी गवळ्याप्रमाणें दत्तूनें

माझ्या हातांतून अंक हिसकावून घेतला आणि भराभर मोठ्यानें वाचण्यास सुरुवात केली.

"ए माझी आई," मी घाबरून ओरडलों. "हळू वाच. हळू वाच. बाबांनीं ऐकलं तर माझं कंबरडं मोडतील."

पण गयावया करणाऱ्या विद्यार्थ्याला अधिकच छळणाऱ्या शाळा-मास्तराप्रमाणें नाटूनें माझ्या काकुळतीकडे पूर्ण दुर्लक्ष करून म्हटलें ––

"अरे टिल्ल्या, हें काय लेका? तुझ्या नांवापुढें हे व्ह. फा., एस.पी.इ. एस. हें काय प्रकरण?"

"हत् गाढवा," मी किंचित् आत्मप्रौढीनें म्हणालों, "एवढें देखील नाहीं न कळू? अरे, त्या माझ्या पदव्या आहेत पदव्या. खोवलेल्या फुला-खेरीज जशी अंबाडयाला शोभा नाहीं तशी पदवीखेरीज संपादकाची शोभा होत नाहीं आजकाल."

"तें खरें. पण कधीं मिळाल्या पदव्या या?"

"मिळाल्या नाहींत मीं मिळविल्या आहेत. पदव्या मी स्वतः संपादन केल्या आहेत. व्ह. फा. म्हणजे व्हर्नाक्युलर फायनल. इंग्रजी तिसरी म्हणजे व्हर्नाक्युलर फायनलचा वर्ग ना? आणि एस्. पी. इ. एस्. म्हणजेच स्टूडण्ट प्रायव्हेट इंग्लिश स्कूल. समजलं?"

"पण या पदव्या तुला दिल्या कोणीं?"

"संपादकाला शिव्यांखेरीज कोणी कांहीं देत नाहींत, लक्षांत धर. पण संपादकाला मात्र बादशहाप्रमाणें लोकांना पदव्या अर्पण करण्याचा अधिकार जन्मसिद्ध आहे."

"बरं बाबा" म्हणून नाटु अंकाचीं पानें चाळू लागला. नवें झालेलें मूल कौतुकानें पाहावयास आलेल्या बायाबापडया आतां त्याजविषयीं काय अभिप्राय देतात तो ऐकण्यास आतुरलेल्या आईसारखी माझी अवस्था कांहींशी भ्यालेली व कांहींशी आनंदलेली अशी झाली होती. मी अधीर डोळ्यांनी नाटूच्या तोंडावरचे भाव वाचण्याची धडपड करीत होतों.

मासिकाचीं एकदोन पानें वाचल्यावर नाटू ओरडला:

"अरे, हें रे काय? हें शिवाजीचरित्र तर सारें पुस्तकांतून उतरून दिलेलें दिसतें."

"मग त्यांत बिघडलं कुठं? शिवाजीचें चरित्र कोणीही लिहिलं तरी एकच येणार. म्हणून तर ऐतिहासिक लेख लिहिणं सगळ्यांत सोपं काम! एकानें जें लिहिलं असेल तेंच बरोबर दुसऱ्यानं लिहायचं. आणि दोघेही बडे साहित्यिक म्हणून मिरवायला मोकळे. कारण असले लेख बहुधा कोणी वाचीत नाहींत."

"आणि भूगोलपत्रकांतील हें 'इंग्लंडवर्णन' या लेखांत उतरून दिलेंस त्याचेंही तुझें कारण तेंच असणार! कारण कोणी झाला तरी काय लंडनला कांहीं तो पॅरिस अगर न्यू यॉर्क म्हणत नाहीं."

"विद्यार्थ्यांची इतिहास-भूगोल या परीक्षेंत चांगली तयारी व्हावी म्हणून मुद्दाम हे विषय मासिकांत सुरू केले आहेत." मीं गंभीरपणें खुलासा केला.

"हं हें काय? प्रवासवर्णन का? ठीक. मासिक म्हटलें कीं प्रवास-वर्णन हवेंच. एरवीं पानें कशीं भरून निघणार? 'माझा वडगांवचा प्रवास' लेखक—'जगत्प्रवासी.' भले शाबास. कमाल आहे. इथून दीड मैलावरचा प्रवास करण्याला एवढा जगत्प्रवासी कशाला? बरं, काय म्हणतात हे जगत्प्रवासी? —

"बुधवारीं सकाळीं आठ वाजतां घरून चहा वगैरे घेऊन निघालों. प्रवासास जावयाचें असल्यामुळें नेहमींचे कपडे काढून त्याऐवजीं धुतलेले कपडे घातले होते. धोतराचा काचा कसून घातला. सायकलीवरूनचा हा दोन मैलांचा प्रवास करावयाचा होता. तेव्हां दोन्ही पायांना काळ्या क्लिप्स् (सायकल व क्लिप्स् शेजारच्या खंडू गवंड्याकडून मागून आणल्या होत्या.) लावल्या व सायकलवर टांग मारली. घर सोडून निघतांना रीतसर कंठ व नेत्र भरून आले होते हें वाचकांना नेहमींच्या संवयीनें कळलेंच असेल. रस्ता खांचखळग्यांचा असल्यामुळें सायकलला हदरे बसत व वेगही कमी ठेवावा लागे... वाटेंत मधून मधून एकादें झाड लागे. ती वनश्री पाहून मोठा आनंद होई... रस्त्यानें जाणारा कोणी इसम भेटल्यास 'परक्या' मुलखांत आपला 'देशबंधु' भेटल्याचा आनंद होई... मनांत अनेक प्रकारचे विचार येत. या विचारांच्या भरांत पूर्वेकडे वळायचें तें चुकून पश्चिमेस वळलों व त्यामुळें चार मैलांचा हिसका बसला. वाटेंत दोन

हॉटेल्स्‌मध्यें चहा व मिसळ खाल्ली...वडगांवांत बरीचशीं घरें असून लोकवस्ती बरीच आहे. त्यांच्यांत व आपल्याकडल्या लोकांत आचार-विचार, रीतीभाती वगैरेंत फारसा फरक नाहीं...मला एका ब्राह्मणाच्या घरीं जागा व जेवण मोफत मिळालें. यावरून लोक अगत्याचे दिसतात. संध्याकाळीं परत आलों."

"वा रे जगत्प्रवासी व त्याचें हें प्रवासवर्णन!"

नाटूच्या या उपहासानें मला थोडें शरमल्यासारखें झालें. पण संपादक असल्यामुळें मीं लागलीच बाजू सांवरून म्हटलें:

"उगाच चेष्टा करूं नकोस. मराठी मासिकांत हम्मेश येणाऱ्या प्रवासवर्णनांचा आराखडा पहा. अगदीं असाच स्टिरियोटाइप असतो. फक्त लेखकाचें नांव तेवढें वेगळें. संपादकापुढें मासिकाचीं ठराविक पानें भरून काढणें हें एकच ध्येय असल्यामुळें असा प्रकार हा चालायचाच."

"बरं मग आपण मासिकाचीं पानें भरून काढण्यासाठीं आणखी काय काय युक्त्या केल्या आहेत, पाहूं हं."

असें म्हणून नाटूनें अंक पुढें चाळण्यास सुरुवात केली. अंक अवघा चोवीस पानांचा होता. त्यांतला निमा भाग शिवाजीचरित्र, इंग्लंडवर्णन, वडगांवचा प्रवास या तीन लेखांनीं खाल्ला होता. उरलेल्या निम्या भागांत मासिकाचा उद्देश या संपादकीय अग्रलेखाचें स्थान फार महत्त्वाचें होतें. इंग्रजी तिसरींतील माझ्यासारख्या एका व्ह. फा. एस्. पी. इ. एस्. नें काढलेल्या या छोटेखानी मासिकाचा उद्देश मीं पुढीलप्रमाणें दिला होता —

"..... आपल्या मातृभाषेची यथाशक्ति सेवा करून आमच्या प्रिय वाचकवर्गाला ज्ञानांजनाचा डोस नित्य पाजणें हा आमचा उद्देश आहे... आपल्या समाजांत अज्ञानामुळें जे दोष राहिले आहेत ते काढून हें मासिक समाजसुधारणेला जोराची चालना देईल. त्याबरोबरच सर्व जगांत (वाचक, घाबरूं नका. मोठमोठे शब्द वापरून छोटा छोटा अर्थ व्यक्त करण्याचें अजब 'कौशल्य' मराठी संपादकांना पूर्णपणें साधलेलें आहे हें अनुभवानें तुम्हांस माहीत नाहीं? या ठिकाणच्या 'जगांत' या मोठ्या शब्दाचा शाळेच्या चिमण्या 'जगांत' असा चिमणा अर्थ घ्यावा.) बंधुभाव व समता प्रस्थापित करण्यासाठींही आमचें मासिक झटेल..."

आतां मला नक्की नांवें नाहीं आठवत, पण मराठींतील कांहीं मासिकांच्या व वर्तमानपत्रांच्या संपादकांनीं लिहिलेल्या आपापल्या उद्देशपत्रकांच्या अभ्यासानंतर मीं माझा हा संपादकीय लेख तयार केला होता, त्यामुळें त्यांतील बराचसा भाग माझ्या लेखांत उतरला असल्यास नवल नाहीं. उलट आज मला त्याबद्दल एक प्रकारचा अभिमान वाटत आहे. कारण कीं, सध्यां मराठी वाङमयांत 'वाङमयचौर्य' या नांवाचा जो नवा वाङमयप्रकार जारीनें रूढ होऊं पाहात आहे, त्याची सुरुवात मीं इतक्या लहानपणीं केली हें माझ्या अभिजात प्रतिभाशालीत्वाचें लक्षण नव्हे काय?

याखेरीज नवीं कोडीं व कोड्यांचीं उत्तरें, लेखकांना सूचना, वर्गणीचे व जाहिरातींचे दर, वर्गणीदारांची यादी, पुढील अंकाच्या प्रसिद्धीची तारीख व त्यांत यावयाच्या लेखांची अनुक्रमणिका, पोंच व अभिप्राय, विनोदी चुटके इत्यादि विषयांना प्रत्येकीं एकेक पान जागा देऊन मीं मासिकाचीं उरलेलीं पानें भरून काढलीं होतीं.

सारा अंक चाळून झाल्यावर नाटु तो बाजूस ठेवीत म्हणाला:

"टिल्ल्या, मला कल्पना नव्हती हं. तूं जन्मजात संपादक आहेस. मासिकाचे संपादक शिलकी जागा भरून काढण्यासाठीं वेळोवेळीं ज्या युक्त्या वर्षभर अंमलांत आणीत असतात, त्या तर तूं एकाच अंकांत खर्चीं घातल्यास. तुझें धाडस कमालीचें खरें. हा अंक पाहिल्यावर माझी खात्री झाली कीं, तुझें मासिक खात्रीनें यशस्वी होणार."

आणि कळविण्यास मला आनंद वाटतो कीं, नाटूचा हा आशीर्वाद खरा झाला. आमच्या वर्गाचा मॉनिटर रघू देशपांडे हा मासिकाचा सहसंपादक असल्यामुळें वर्गांतील पोरांना वर्गणीदार व्हावयाला लावणें अगदीं सोपें झालें. दरमहा दोन पैसे वर्गणी ठेविली होती. वर्गांतील सत्तावीस मुलांच्या गळ्यांत आम्हीं मासिक जवळ जवळ सक्तीनेंच बांधलें. त्यामुळें आम्हांला दरमहा बारातेरा आण्यांची प्राप्ति होई. मासिकाला खर्च असा नव्हताच. कारण लागणारा कागद व शाई रघू देशपांडे मॉनिटर असल्यामुळें शाळेंतील मिळत असे (म्हणजे रघू मास्तरना न कळत लंबे करीत असे). तेव्हां वर्गणीचे जमणारे पैसे मी, रघू व नाटु 'श्रीकांत भुवनां'त मधल्या सुटींत खर्च करीत असूं. जमलेल्या वर्गणीपेक्षां भुवनाचें बिल जास्त झालें

तर त्याच्या मोबदला आमच्या मासिकांत 'श्रीकांत भुवना'ची जाहिरात मजकुरांत एक सबंध पानावर घालण्यांत येई व त्याला 'बालप्रकाशक मासिकाच्या वर्गणीदारांना या भुवनांत खास सवलत मिळेल.' असेंही एक मघाचें बोट शेवटीं लावण्यांत येई. मात्र ही 'खास सवलत' कोणती हें अखेरपर्यंत कोणासही कळलें नाहीं हा भाग वेगळा ! !

एक वर्षभर आम्हीं मासिक मोठ्या उमेदीनें व जोमानें काढलें. विद्यार्थ्यांना ज्ञानांजनाचा डोस पाजण्याचें आमचें ध्येय असल्यामुळें इंग्रजी तिसरीतील छोट्या विद्यार्थ्यांसाठीं निघणाऱ्या या चिमण्या हस्तलिखित मासिकांतही गंभीर विषयांवरील लेखांचें प्रमाण सहजच अधिक पडलें. धर्माची आवश्यकता, ब्रह्मचर्य व त्याचे फायदे, राष्ट्रीय ऐक्याची आवश्यकता, वक्तृत्व, मित्रत्वाविषयीं सॉक्रेटिसचे विचार, अमेरिकेंतील व्यायामपद्धति, मूर्तिपूजा वगैरे जाड जाड विषयांवर या छोट्या मासिकांत लेखमाला आलेल्या आहेत. अर्थातच वाङ्मयचौर्य या मीं स्वत: मराठी वाङ्मयांत सुरू केलेल्या नव्या वाङ्मयप्रकाराला जोराची चालना देण्यासाठींच या विषयांचा अंतर्भाव हस्तलिखित मासिकांत करण्यांत आला होता हें वेगळें सांगणें नकोच !

मासिकाचीं पानें भरून काढण्यासाठीं मी दर अंकांत 'सिंहावलोकन', 'संपादकीय निवेदन', 'सूचना', 'संपादकाचे बोल' अशांसारखे सदर देत होतों. या सदरांत वेळोवेळीं जे उल्लेख आले आहेत त्यांपैकीं कांहीं उतारे येथें दिले असतां वाचकांना मासिकाच्या वार्षिक घडामोडीची थोडीशी कल्पना येईल या समजुतीनें कांहीं निवडक उतारे खालीं देतों :

"आमच्या या मासिकाला आज दुसरा महिना लागला. या मासिकाला बऱ्याच उत्तम मंडळींनीं आश्रय दिला याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों. मागचा अंक उत्तम निघाला होता. पण तो कांहीं कारणामुळें रा. रा. चिकटे यांनीं फाडला व त्यांनीं तो अशुद्ध रीतीनें लिहून दिला व त्यामुळें बऱ्याच चुका वाचकांना दिसल्या. या चुकीबद्दल वाचकवर्ग आम्हांस क्षमा करील अशी आशा आहे."

❖ ❖ ❖

हा अंक उशिरां काढण्याचें कारण ह्या महिन्यांत परीक्षा असल्याकारणानें वर्गणीदारांना लेख आमचेकडे देण्यास व ते आम्हांस छापून (?)

प्रसिद्ध करण्यास वेळ मिळाला नाहीं हें होय. तरी पण सर्व मंडळी आम्हांस क्षमा करतील अशी आशा आहे.

वाचक वर्गास आम्ही अशी विनंति करतों कीं, त्यांनीं मेहेरबानी करून अंकावर खोडाखोड अगर शब्दांच्या खालीं रेघा न मारण्याची खबरदारी घ्यावी.

ह्या अंकापासून कोणत्याही अंकास घडी किंवा पानें न चुरडण्याची खबरदारी घ्यावी. ह्या सूचना पुन्हां देण्यांत येणार नाहींत.

आम्ही आमचा मागचा अंक वर्गणीदारांकडे दिला असतां आमच्याच एका वर्गणीदारानें कूट प्रश्न नं. ३ ह्यावर त्या कोड्याचें उत्तर खोडसाळ-पणानें मांडलें आहे तरी ह्यापुढें जर कोणीं अंकांत कांहीं लिहिलें अगर कोणत्याही कारणानें घाण केली, अगर कोणीं फाडला तर त्यांजकडून तो सबंध अंक भरून घेतला जाईल व त्यास पुनरपि वर्गणीदारांत घेतलें जाणार नाहीं.

विशेष माहिती पुढील अंकीं देऊं.

गेल्या अंकांत छापलेल्या 'धर्माची आवश्यकता' हा लेख आमच्या गैरहजेरींत आमच्या कंपॉझिटरकडून चुकून 'अपूर्ण' प्रसिद्ध केला गेला, व तो लेख लेखक काळे यांनीं अद्याप पूर्ण करून दिला नाही व आतां 'देत नाहीं' म्हणतात ह्याबद्दल आहांस दिलगिरी वाटते.

मागच्या अंकापासून मासिकांत दर खेपेस एक उतारा देण्याची पद्धत सुरू केली आहे. ही पद्धत उष्टी उचलली असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण तें खोटें आहे असें अगदीं सिद्ध करून देऊं ! !

आम्ही जुलई महिन्यापासून सुरू केलेली 'रत्नहार' ही गोष्ट उतारा आहे असें समजतें. तो लेख पाठविणाऱ्या लेखकाला लेखनाची जबाबदारी काय माहीत ? पण हें सर्व मागाहून झालें त्याबद्दल वाचकवर्ग क्षमा करीलच. तरी असला मूर्खपणा पुढें कोणत्याही लेखकानें करूं नये.

आमच्या मासिकाचें बालपण—पहिलें वर्ष—फारसें ऐषआरामांत जरी नव्हे तरी पण सुखांत गेलें. परंतु त्याचें पुढील आयुष्य असेंच सुखांत जाऊं दिल्यास त्याचे अंगीं जोम येणार नाहीं म्हणून त्यास थोडीशी संकटाची जाणीव दिली पाहिजे. सन १९१४ सालीं युरोपांत महायुद्धाचा वणवा पेटल्यापासून इकडे हिंदुस्थानांत कागदाची हळुहळू महागाई होत चालली, तरीही एक वर्षपर्यंत त्यानें स्वत: झीज सोसून आपल्या संकटाची ओळख त्यानें आपल्या बालमित्रांस बिलकूल होऊं दिली नाहीं. पण लढाई संपली आहे तरी कागद जास्तच महाग होत चालले आहेत. म्हणून बालप्रकाश आपल्या बालमित्रांस आपणास मदत करण्यास सांगत आहे. सर्व बाबतींत महागाई झाल्यामुळें मासिक प्रसिद्ध करण्यास खर्च जास्त लागूं लागला आहे. अशीं कांहीं चोहों-बाजूंनीं संकटें उत्पन्न झालीं आहेत.

तथापि बालप्रकाश धीर सोडणार नाहीं. परमेश्वराचे कृपेनें व बालमित्रांच्या साहृयानें याही संकटास तोंड देऊन तो पुढें चालणार आहे. मात्र संकट मोठें असल्यामुळें बालमित्रांच्या साहृयाची जास्त मदत या वेळीं पाहिजे आहे. ती ते देतील अशीही पण त्याला खात्री आहे. म्हणून पुढील अंकापासून मासिकाची वर्गणी दुप्पट केली आहे. म्हणजे दरमहा अवघी चार पैसे व वर्षाला बारा आणे. म्हणजे वर्गणी फक्त दोनच पैसे वाढविली आहे.

मासिकांतही जास्त सुधारणा करून पानें वाढविण्याचा आमचा विचार आहे हें येथेंच कळवून ठेवतों.

हा शेवटचा उतारा वर्षाच्या शेवटच्या अंकांतला आहे हें आनुभविक वाचकांनीं ओळखलेंच असेल. वास्तविक पाहतां आमचें मासिक निघालें त्यापूर्वींच महायुद्ध बंद पडलें होतें. व मासिकास लागणारी कागद-शाई ही सामग्री रघू देशपांडे वर्गाचा मॉनिटर असल्यामुळें तो शाळेच्या सादिल-वारांतूनच पळवीत असे. असें असतां कागद महागाईच्या सबबीवर वर्गणी कां वाढवावी असा प्रश्न कांहीं सरळबुद्धे वाचक विचारतील तर त्यांना मी स्पष्टच सांगतों कीं, वर्गणी वाढविण्याचीं खरीं कारणें फार नाजूक असतात तीं एक संपादकच जाणे! युरोपांतील महायुद्धामुळें वर्गणी वाढविली हें भोळ्या वाचकांना दाखवायचे दांत आहेत. अंदरकी बात अशी कीं, मी,

रघू व नाटु यांच्या वाढत्या उपाहारामुळें फुगणारें श्रीकांत भुवनाचें बिल जमणाऱ्या वर्गणींत भागेनासें झालें व त्यामुळें एकदां आमचें व भुवनाचा मालक वक्रतुंड नष्टे याचें तोंडीं 'महायुद्ध' झालें आणि खरें बोलायचें म्हणजे याच 'महायुद्धा'मुळें मला मासिकाची वर्गणी वाढविणें भाग पडलें. पण हें 'नाजूक' कारण संपादकीय समालोचनसारख्या 'गंभीर' लेखांत थोडेंच सांगतां येतें !

दुसऱ्या वर्षाचा पहिला अंक (हाय ! माझ्या मासिकाचा हाच शेवटचा अंक ठरला ! दुर्दैव माझ्या वर्गणीदारांचें कीं ते अशा ज्ञानलाभास कायमचे मुकले.) जोमांत निघाला. त्या अंकांत आमच्या मासिकाचे उद्देश सुधारून वाढविलेले पुढीलप्रमाणें दिले होते :

१. हल्लीं होत असलेली विद्यार्थीवर्गाची अवक्रांति घालवून त्यांची उन्नति करणें.

२. सनदशीर व हितावह मार्गानीं विद्यार्थ्यांस बाहेरील जगाची माहिती देणें.

३. विद्यार्थ्यांची करमणूक करून त्यांना ज्ञानरूपी दूध पाजणें व सत्कर्मास लावणें.

आमच्या मासिकाचें हें ध्येय होतें आणि 'ध्येय' हें अंमलांत आणण्यासाठीं असत नाहीं हें सर्वांस माहीतच आहे. ध्येय हें लाइट-हाऊससारखें असतें. लाइट-हाऊसपासून बोट दूर पळण्याचाच प्रयत्न करते तसेंच मासिकाचेंही.

नव्या वर्षापासून मासिकांत कांहीं पानें इंग्रजी मजकूर देण्याचा स्तुत्य उपक्रम मीं सुरू केला होता. व दुर्दैवानें तोच मासिकाच्या मुळावर आला असें म्हटलें पाहिजे. सुरुवातीच्याच अंकांत मीं जें संपादकीय निवेदन इंग्रजींत लिहिलें होतें तें येणेंप्रमाणें :

" Our intention, to publish a English magazine that, to give knowledge to the boys And make thair English well; And the read English books most merily; And they wishes to study of English In our intention god will give succeed us; The kindness of our god and

our Contibutors our magazine will be bigger and bigger every time than before.

" We got friends to help us in our object which is known by you; And some friends give articles in this magazine and some promised to do such; so we are humble rejoice in, for there kindness; and wished that, god will give them succeed to do help to our Magazine,

" Now I take leave to my Readers and prayering the god for our magazine's " Derghaush."

तें कसें झालें मला माहीत नाहीं, पण वडिलांची हांक ऐकून मी त्या दिवशीं नेहमींप्रमाणेंच भीत भीत त्यांच्या खोलींत गेलों तों वडील माझ्या हस्तलिखित मासिकाचा अंक वाचीत असल्याचें पाहून मी मटकन् खालींच बसलों. माझ्या डोळ्यांपुढें अंधेरी आली. एक वर्षाच्या तपश्चर्येचें फळ काय मिळणार तें मला स्पष्ट समजून चुकलें आणि त्यासाठीं मी माझ्या मनाची तयारी करूं लागलों.

माझ्याकडे पांढऱ्या काड्याच्या चष्म्यांतून तीव्रपणें रोखून पाहात वडील किंचित् कठोर स्वरांत म्हणाले :

" मला कल्पनाही नव्हती तूं इतका अफाट विद्वान् निपजला असशील म्हणून. शाळेंत अभ्यासाऐवजीं हेच धंदे करतोस वाटतं ? इंग्रजी तिसरींतला मुलगा तूं पण मराठी पत्राच्या तोंडांत मारणारें फर्डा इंग्रजी तूं इतक्यांतच लिहूं लागलास ! आतां तुझ्यासारख्या महाविद्वान् पुरुषाला शाळेंत उगीच कुचमत ठेवणें बरोबर नाहीं. उद्यांपासून तूं त्या 'श्रीबलभीम प्रसन्न' छापखान्यांत कंपोझिंग शिकायला जात जा. शाळा आतां पुरे झाली. जा."

जिवावर बेतलेलें बोटावर निभावलेलें पाहून शाहिस्तेखानाला झाला नसेल इतका आनंद पाठीचें धिरडें होण्याचें शाळा सोडण्यावरच भागलें म्हणून मला झाला. बाकी मला तरी कुठें मनापासून शाळा हवी होती म्हणा ! केवळ वडिलांच्या धाकामुळेंच मी शाळेंत जात होतों. आतां त्यांनींच शाळा सोडायला सांगितलें हें माझ्या इच्छेप्रमाणेंच झालें. शिवाय आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन. केवळ शाळा चुकली एवढेंच नव्हे तर

'वडगांव-समाचार' पत्राच्या छापखान्यांतच वडिलांनीं मला चिकटवून दिलें. बालप्रकाश मासिक सुरू केल्यापासून 'वडगांव-समाचार' पत्राचा संपादक होण्याची जबर महत्त्वाकांक्षा मीं माझ्या चिमण्या हृदयांत सांठविली होती. त्या छापखान्यांत आज मी कंपॉझिटर म्हणून जात आहें खरा, पण 'किर्लोस्कर' मासिकांतील चरित्रांचा मी नियमित वाचक असल्यामुळें माझी खात्री होती कीं, आज ना उद्यां 'वडगांव-समाचार' चा संपादक होणार. आज कंपोझ करून होणाऱ्या काळ्या हातांचें उट्टें उद्यां संपादक झाल्यावर पांढऱ्यावर यथेच्च काळें करून फेडून घेण्याचें मीं ठरविलें. आतां बालप्रकाशचा संपादक कंपॉझिटर व्हावा हें—पण जाऊं द्या. एवढे मोठे लोकमान्य टिळक! पण त्यांनीं नाहीं का सुरुवातीस 'केसरी'च्या केसीस खांद्यावरून नेल्या? म्हटलेंच आहे :

जया अंगीं मोठेंपण । तया यातना कठीण ॥

माझ्या अंगीं हें मोठेपण खास आहे म्हणूनच मला 'यातना कठिण' सोसाव्या लागत आहेत असें मीं मनाचें समाधान करून घेतलें!

आणि पुढें माझें हें सुखस्वप्न खरेंही झालेलें मीं पाहिलें. आज मी 'वडगांव-समाचार' पत्रांत वर्तमानसार व नोटिसा लिहिण्याचें महत्त्वाचें काम करीत आहें. बातम्या देण्यांत मी माझ्या स्वतंत्र बुद्धीचें व कल्पनाशक्तीचें इतकें अपूर्व प्रदर्शन करीत आलों आहें कीं, माझे मुख्य संपादक वरचेवर मला म्हणतात कीं, "टिल्ल्या, तूं या खेड्यांत पडल्यामुळें तुझी कर्तबगारी फुकट जात आहे. वास्तविक 'नवाकाळ'च्या संपादकवर्गांत बिनदिक्कत नेमणूक करण्याच्या लायकीचा इसम आहेस."

संपादकांना असे उद्गार वारंवार काढावयास लावण्यास माझी जी कर्तबगारी कारणीभूत झाली, ती मी हस्तलिखित मासिकाच्या संपादनाच्या कालावधींत पैदा केलेली असली तरी तिचें वर्णन येथें देणें बरोबर होणार नसल्यानें येथेंच लेखणीस विराम देतों.

# मुलाखती

ब्रह्मचर्य तेथें सावळागोंधळ, वाङ्मयसेवक तेथें शिवराळपणा, राजकारण तेथें स्वार्थसाधन, आणि पुणेरी पगडी तेथें ती फिरविण्याची कला हीं द्वंद्वें हटकून आढळावयाचीं हा जसा चालू काळचा अनुभव आहे तद्वतच वर्तमानपत्र म्हटलें कीं, मुलाखतींची भानगड आलीच. संपादकांच्या बुरणुस बुद्धीला काडीचाही त्रास न पडतां वर्तमानपत्राच्या वाचकांना विविध विषयांवर अनेक 'तज्ज्ञां'चीं नाना मतें वाचावयास मिळण्याची सोय करणारें मुलाखती-सारखें दुसरें सदर नाहीं. सोम्याच्या मृत्यूपासून तों गोम्याच्या हीरक-ज्युबिली-उत्सवापर्यंत कसलीही लहानमोठी, महत्त्वाची, बिगर महत्त्वाची गोष्ट घडून येवो, वर्तमानपत्राच्या संपादकाचें काम एवढेंच कीं, आपला 'खास बातमीदार' (पुष्कळ वेळां अंकासाठीं 'मॅटर' मागावयास आलेल्या कंपॉझिटरांच्या फोरमनलाच हा मान मिळतो!) एखाद्या पितळी दरवाज्या-कडे पाठवून त्याची मुलाखत आणायची. बस्स्....कंपॉझिटरला 'मॅटर' मिळते, आणि संपादकाच्या विद्वत्तेची झांकली मूठ सव्वा लाखाची राहते! संपादकाच्या फाउंटनपेनमधील शाई यत्किंचितही खर्च न होतां वर्तमानपत्राचा सारा अंक आपोआप 'भरून' निघतो. ज्या गृहस्थानें मूळ ही कल्पना शोधून काढली असेल तो शिकंदर डोक्याचाच होता खास!

कोणाची तरी कोणच्या तरी विषयावर कांहीं तरी मुलाखत छापली कीं, संपादकाची जबाबदारी संपते हें खरें असलें तरी मुलाखती संपादण्याची कला वाचकांना सकृद्दर्शनीं वाटते तितकी मात्र सोपी नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. घेतलेली मुलाखत छापतांना जशी हिकमती संपादकाला आपल्या जवळ नसलेली अक्कल खर्च घालावी लागते तद्वत् कोणत्या विषयावर कोणाची मुलाखत घ्यायची हें ठरविणें हें येरा गबाळाचें काम नोहे! त्यासाठीं परदेशी

पत्र-पंडितांची पैदास झाली पाहिजे; उडदामाजी काळेगोरे निवडणें जसें जवळ जवळ अशक्य असतें त्याप्रमाणेंच गांवांत पसरलेल्या अफाट तज्ज्ञांच्या गर्दीतून मुलाखतीसाठीं योग्य 'सत्पुरुष' निवडणें महा कर्मकठिण, आणि ही कला ज्याला साध्य झाली त्याचें वर्तमानपत्र हटकून शंभर टक्के यशस्वी होणार हें नक्की.

माझ्या वाचकांसाठीं मुलाखती-संपादनाचीं एकदोन 'रहस्यें' येथें सांगितल्यास या पासष्टाव्या कलेची कांहींशी कल्पना त्यांना येण्यासारखी आहे. यासंबंधांत मुलाखत घेऊं इच्छिणाऱ्या होतकरू बातमीदारानें मुख्य लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, आपणांस ज्या विषयासंबंधीं मुलाखत हवी असेल त्या विषयाची काडीचीही माहिती ज्याला नसेल अशाच महापुरुषाला नेहमीं मुलाखतीचा पहिला मान द्यावा! कारण आपणांस मुलाखत लोक-रंजनासाठीं छापावयाची असते ही गोष्ट पत्रकारानें विसरून कधींच चालणार नाहीं. आणि जनमनोरंजनाच्या दृष्टीनें विषयांच्या मुलाखतीपेक्षां स्वयं-तज्ज्ञांच्या मुलाखतीच नेहमीं अधिक प्रभावी व चटकदार उमटत असल्याचा अनुभव आहे.

येथें कोणास अशी शंका येईल कीं, ज्या विषयावर आपणाला कांहीं कळत नाहीं त्या विषयावर मुलाखत देण्यास कोण तयार होईल? पण ही शंका अगदींच वेडेपणाची आहे. हल्लींच्या प्रसिद्धिलोलुप काळांत मुला-खतीच्या स्वरूपांत फोटोसह वर्तमानपत्रांत नांव छापून येण्याचा संभव दिसेल तर द्विपादच काय चतुष्पाद 'प्राण्या'ची सुद्धां मुलाखत देण्यास एका पायावर तयारी असते! आणि तें अस्वाभाविक आहे असें कोणीं कां म्हणावें? स्वतःच्या घराची शाकारणी करण्यापेक्षां दुसऱ्याच्या घरावर दगड फेंकणें हें नेहमींच सोपें नसतें काय? त्याप्रमाणेंच स्वतःच्या विषयावर मुलाखत देऊन स्वतःचेंच 'तोंड' फोडून घेण्यापेक्षां दुसऱ्याच्या विषयावर 'तोंडसुख' घेऊन वर्तमानपत्री वादाला 'तोंड' फोडणें हें सद्यःफलदायी असतें!

आणि वर्तमानपत्रकाराला तरी दुसरें काय हवें असतें? निष्फळ (आणि बाष्कळही) वादविवादासाठीं जर वर्तमानपत्राचे स्तंभ खर्ची घालायचे नाहींत तर काय ते 'संसारसुखासाठीं म्होतूर' लावूं पाहणाऱ्या प्रेमीजनांच्या नोटिशींनीं भरून काढावेत? मुलाखतींतून वादाचें पिल्लूं

उत्पन्न झालें (आणि तें नेहमींच होतें ! ) कीं, पत्राचा खप वाढतो हें मुलाखतीचें अर्थशास्त्र संपादकाला पुरें ठाऊक असतें. तेव्हां वाददृष्टच्या 'वांझोट्या' ठरणाऱ्या विषयज्ञ जनांच्या मुलाखती छापून हल्लींच्या आर्थिक हलाखीच्या दिवसांत कोणत्याच संपादकाचा निभाव लागणार नाहीं.

स्वयंतज्ज्ञ महापुरुषाची मुलाखत घेतल्यावर सुद्धां ती जशीच्या तशी कधींच छापूं नये. कारण त्यांत संपादकाचा 'बोज' राहात नाहीं. भरमसाट मुलाखत देणाऱ्या स्वयंतज्ज्ञालाही आपल्या मोटेपणाची व सर्वज्ञपणाची जाणीव करून देण्यासाठीं संपादकानें त्या मुलाखतींत शक्य तितके फेरफार केल्याखेरीज राहूं नये. या फरकानें मूळ मुलाखतीचें स्वरूप इतकें बदललेलें असावें कीं, छापील मुलाखत जेव्हां तो स्वयंतज्ज्ञ मोठ्या उत्सुकतेनें वाचून पाहील तेव्हां त्याला 'गोदीचा सपशेल गोविंदा' झाल्याचें दृष्टीस पडावें ! तरच ती खरी मुलाखत.

असें केल्यापासून एक फायदा होतो तो दृष्टिआड करून चालणार नाहीं. आपल्या मुलाखतीचें हें विकृत स्वरूप पाहून वकरीच्या पोटीं ओरँग ओटँग आल्याचा देखावा स्वयंतज्ज्ञास दिसतो. तो लागलीच त्या वर्तमानपत्राकडे खुलाशाचें पत्र पाठवितो. या खुलाशावर आपल्या बातमीदाराचा प्रतिखुलासा व त्यावर संपादकीय मल्लीनाथीसह रंगत जाणारी उभयपक्षीय 'लेखालेखी' (जसें तोंडातोंडी, मारामारी, जोडाजोडी) यामुळें मूळ मुलाखतींतून सुरू होणाऱ्या वादाला या खुलाशांतून निघालेली वावटळ मिळते व वाचकांच्या डोळ्यांत चांगलीच धूळ फेंकतां येते !

आणि या साऱ्या भानगडींत संपादकाच्या अंगावर शेकेल असें कांहींच असत नाहीं. कोंबडीं झुंजायला लावून आपण गच्चीवरून मौज पाहणाऱ्या गुलहौशी श्रीमंताप्रमाणेंच संपादकाची कांतडी सुरक्षित असते. छोट्या वॉशिंग्टनच्या हातांतील कुऱ्हाडीप्रमाणें संपादकाच्या हातांत वर्तमानपत्राचें अमोघ अस्त्र सत्तेचें असतें. (व जो त्याचा स्वच्छंदानें उपयोगही करतो त्याचें वाट्यास सहसा कोणी जात नाहीं.) वरें इतकेंही करून निघालाच एकादा खवीससोट्या म्हसोबा तर "आमच्या बातमीदाराच्या चुकी"ची ढाल संपादकाच्या अब्रूचें रक्षण करण्यास सदैव सज्ज असतेच !

असा सुरक्षित मामला असल्यावर वर्तमानपत्रांतून मुलाखतींना ऊत

आल्यास नवल काय ? बारशापासून बाराव्यापर्यंत असा कोणताच विषय नाहीं कीं, ज्यावर हीं वृत्तपत्रें कोणाची ना कोणाची तरी मुलाखत छापीत नाहींत. पण इतक्या शाईकागदांचा खर्च करून वर्तमानपत्रांतून खंडोगणती येणाऱ्या या मुलाखतींपासून बिचाऱ्या सामान्य वाचकाला ज्ञानलाभ काय व किती झाला या विषयावर मात्र अद्याप कोणींच कोणाची कशी मुलाखत घेतली नाहीं हा प्रश्न आहे.

मुलाखती वर्तमानपत्रांत छापतांना मुख्य मोठ्या मथळ्याखालीं छोट्या कंसामध्यें जरी नेहमीं 'आमच्या बातमीदाराकडून' अगर 'आमच्या खास प्रतिनिधीकडून' असा मजकूर दर्शनींच छापलेला असतो तरी तो हम्मेश खराच असतो असें कोणींही समजण्याचें कारण नाहीं. कांहीं कांहीं वेळेला तर संपादक महाशयांची व एकाद्या इसमाची रस्त्यांत सहज भेट होऊन उभ्या उभ्या कांहीं बोलणें चालणें (बोलाचाली नव्हे) झालेलें असेल तर तीच मुलाखत म्हणून 'दडपून' छापण्यांत येते. साहसाशिवाय संपत्ति नाहीं तद्वत् 'दडपेगिरी' खेरीज संपादकशाही शोभत नाहीं. पण संपादकाला नेहमींच या जालीम मात्रेचा उपयोग करावा लागतोच असें नाहीं. प्रसिद्धि-लोलुप स्वयंतज्ज्ञ हल्लीं इतके स्वस्त झाले आहेत कीं, त्यांपैकीं कित्येक जण स्वतःच स्वतःची मुलाखत घेऊन स्वतः हून पत्रांत छापण्यासाठीं पदरच्या खर्चानें संपादकास सुपूर्त करतात. नवीं निघणारीं पुस्तकें स्वतःच्या पैशानें विकत घेऊन त्यावर स्वतःच्या नांवें 'ग्रंथकर्त्याकडून सप्रेम भेट' म्हणून स्वतःच लिहून लोकांच्या नजरेस पडेल अशा प्रकारें टेबलावर 'पाडून' ठेवणाऱ्या कित्येक लोकांप्रमाणें स्वयंतज्ज्ञांना फाजील मोठेपणाची अधीर हांव सुटलेली असते.

पण मुलाखत घेण्यासाठीं बातमीदार म्हणून एकादे वेळीं कोणाकडे जाण्याचा प्रसंग आला तरी त्यांत आपलें कांहीं नुकसान असत नाहीं. बातमी-दार हा मुलाखत देणाऱ्याला प्रसिद्धि देणारा उपकारकर्ताच वाटत असल्यामुळें त्याची सरबराई ठेवण्यांत स्वयंतज्ज्ञ आपलें सारें औदार्य खर्चीं घालतो. एकदा तर एका स्वयंतज्ज्ञानें अशाच प्रसंगीं एका बातमीदाराचा इतका आदरसत्कार केला कीं, त्या बिचाऱ्याला आपण मुलाखत घ्यावयास आलों, कीं या गृहस्थाच्या उपवर मुलीची वधूपरीक्षा करण्यास आलों हेंच कळेना ! नाटक कंपन्या,

सिनेमा कंपन्या यांच्या चालकांच्या मुलाखती घेण्याच्या मिषानें कित्येकांनीं नाटक-सिनेमांचे खेळ फुकटांत सहकुटुंब पदरांत पाडून घेतले आहेत. सगळयाच बातमीदारांच्या नशिबीं जरी असा अमृतसिद्धीयोग होराभूषणांनीं लिहिलेला नसला तरी कोठेंही गेलें असतां ऱ्हाच्या कपाला मरण नाहीं खास. आणि एकाद्यानें एवढाही साधा गृहस्थधर्म दाखविला नाहीं तर बातमीदारानें त्यांच्या मुलाखतींत 'मुद्राराक्षसा' चा धुडगूस घालून त्याला प्रायश्चित्त देण्यास हरकत नाहीं! गोमयमूत्रभूषण भालाकार यांच्या गोमूत्रमिश्रित आटीव दुधाच्या प्रायश्चित्तापेक्षां हें प्रायश्चित्त जालीम असल्यामुळें त्याचा—

एकदम गुण!
हटकून गुण!
तीन दिवसांत गुण!
गुण न आल्यास मुलाखतींतील सर्व विधानें परत!
संपादकीय दिलगिरी सोबत!

मुलाखतीच्या तंत्रशास्त्राचा अधिक विस्तार मुलाखतीनंतरच्या वादाइतकाच वाचकांना कंटाळवाणा वाटण्याचा संभव असल्यामुळें आतां फक्त दोनच गोष्टी सांगून हें प्रकरण आवरतें घेऊं. खऱ्या व जिवंत माणसांची तेवढीच मुलाखत घेऊन संपादकानें समाधान मानूं नये तर काल्पनिक व मृत माणसांच्या मुलाखतींसाठीं आपल्या पत्राचे रकाने मधून मधून खर्च टाकावेत. मृतांच्या मुलाखतींसाठीं प्लँचेटचें साधन जसें रामबाण तसें काल्पनिक व्यक्तींच्या मुलाखतींचें सुलभ साधन म्हणजे भांगेचा बार!

ब्लाऊजला जशी लेसशिवाय शोभा नाही, तद्वत् उदाहरणांखेरीज विवेचनाची शोभा होणार नाहीं. शाळेंत धडा शिकवितांना वस्तुपाठाचें जें महत्त्व तेंच प्रतिपादनांत प्रत्यक्ष उल्लेखांचें असल्यामुळें वर सांगितलेल्या तंत्रनियमानुसार घेतलेल्या कांहीं मुलाखतींचा वृत्तांत दिल्याखेरीज लेख पुरा होणार नाहीं. नाहीं तर चुंबनाशिवाय सिनेमाचा शेवट केल्याप्रमाणें लेख मिळमिळीत वाटेल.

समजा कीं तुम्हांला ओटावा कॉन्फरन्सबद्दल मुलाखत घ्यायची आहे, तर बेधडक उठा नि डोळे झांकून नटसम्राट् बालगंधर्वांना गांठा नि विचारा कीं,

प्रश्न :—आपणांस ओटावा कॉन्फरन्सविषयीं काय वाटतें ?

या प्रश्नावर खालील उत्तर तुम्हांला मिळण्याचा संभव आहे :

उत्तर :—वा देवा, ती ओटावा कॉन्फरन्स हल्लीं अगदीं नेसेसरी आहे. आम्ही लहान होतों तेव्हां आमच्या घराच्या ओटयावर आई वाती करीत बसे, अन् देवा, आळींतल्या सगळ्या बायका तिच्याभोंवतीं तिथें ओटयावर जमून 'ओटावा परिषद' भरवीत नि एकेक जणी छान छान गाणीं म्हणत. तींच गाणीं ऐकून ऐकून मी बालगंधर्व झालों. या आमच्या बापूरावला विचारा. देवा, तशा ओटावा कॉन्फरन्स आतां भरल्या तर माझ्या नाटकी वेषाचें तरुण मुली हल्लीं जें अनुकरण करीत आहेत तसें होणार नाहीं. त्या तसल्या बायकांच्या ओटावा कॉन्फरन्सनीं स्त्रिया बहुश्रुत व शीलवान् होतात असें आपलें देवा, मला वाटतें हो.

त्यानंतर भोजनभैरव भालाकार भोपटकर यांजकडे जाऊन विचारा कीं—

प्रश्न :—आधुनिक कवितेविषयीं आपणांस काय वाटतें ?

उत्तर :—आधुनिक कवींपैकीं एक जणही माझ्या लोकमान्य भोजनाला दोन रुपये वर्गणी देऊन अद्याप हजर राहिलेला नाहीं. इंग्रजी वाङ्मय वाचून हे कवी साऱ्या प्रेमकविता लिहितात तें मला आवडत नाहीं. भोजनासारखा महत्त्वाचा विषय हे कवी कां घेत नाहींत हें कवितेला कळत नाहीं. पेशव्यांच्या वेळेस सव्वा हात केळीचें पान दुतर्फा खाद्यपदार्थांनीं तुडुंब भरलेलें असे, तसें आतां कोठेंच दिसत नाहीं. या करुणरसप्रधान घटनेवर एक हृदयस्पर्शी खंडकाव्य होण्यासारखें असतां हे सारे कवी शिवाजी, बाजी, तानाजी यांच्यावर काव्यें रचतात हें आश्चर्य होय. आधुनिक कवींपैकीं ज्यांनीं भोजनविषयक कविता केल्या असतील त्यांच्या त्या कवितांचा संग्रह काढल्यास स्वराज्य जवळ येईल व वर्णाश्रमधर्म जोमाला लागेल असें आम्हांस वाटतें.

चालू राजकारणावर मुलाखत घ्यायची असेल तर नुकताच कुस्त्यांचा फड जिंकलेल्या एकाद्या पैलवानास गांठा व विचारा—

प्रश्न :—सध्यांच्या राजकारणांत कांहीं जोम नाहीं म्हणतात याचें कारण काय असेल असें आपणांस वाटतें ?

उत्तर :—असें होण्याचें माझ्या मतें एकच कारण आहे. टिळकांच्या

वेळेस जसा खारीक, बदाम, पिस्ते वगैरे पैलवानी खुराक पुणेरी पुढाऱ्यांना नेहमीं यथेच्च खावयास मिळत होता तसा आतां मिळत नाहीं. गांधी तर शेळीचें दूध पितात व वरचेवर उपास करतात. मग अंगांत जवानी राहील कशी? पैलवान तयार नसला तर कुस्तीला मजा कसा येणार? तेव्हां माझ्या मतें राजकारण करूं इच्छिणाऱ्या पुढाऱ्यांना सांजसकाळ छटाक छटाक जिलेबी व सुका मेवा चारण्यांत यावा. यासाठीं कॉंग्रेसनें एक स्वतंत्र मुदपाकखाना उघडून त्यावर भोजनभैरवांची नेमणूक केल्यास लवंडच्या द्रोणांतील मठ्ठ्याप्रमाणें हल्लींच्या राजकारणांतला जोम सांडू पाहात आहे तो बसक्या वाटींतील खिरीसारखा एकत्र सांठेल!

शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें पाहतां आतां हात आखडतां घेणेंच योग्य, नाहीं तर उदाहरणेंच द्यायचीं म्हटलीं तर गोखल्यांच्या अंकगणिताइतकीं उदाहरणें देणेंही कठिण नाहीं. अर्थशास्त्रज्ञ वा. गो. काळे यांची मल्लविद्या या विषयावर, वा. कृ. भावे यांची चित्रकलेवर, सिनेमानट चंद्रमोहन यांची सोळा–अठरा पेन्स वादावर, शांता आपटेची ज्ञानेश्वरीच्या व्याकरणावर, प्रो. पोतदार यांची बोलपटांतील ध्वनिलेखनावर, समर्थभक्त देवांची टेनिसबद्दल आणि महंमद निसार यांची संस्कृत वाङ्मयावर घ्यावयाच्या मुलाखतींचीं उदाहरणें कोणासही सहज सुचण्यासारखीं आहेत.

# खुलासे

वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या मुलाखतींना कोटाची उपमा दिली, तर वृत्तपत्रीय खुलाशांना जाकीट म्हणतां येईल. वर्तमानपत्ररूपी घराचीं मुलाखती हीं दारें मानलीं, तर खुलासे या खिडक्या गणता येतील. वर्तमानपत्राच्या जमिनींत उगवणाऱ्या मुलाखती हे नवलकोंदाचे गड्डे म्हटलें, तर खुलाशांना अकलेच्या कांद्यांची उपमा शोभेल !

वृत्तपत्र आहे तेथें चुका या होणारच, आणि चुका झाल्या कीं, खुलासे प्रतिखुलासे हे कीचकअनुकीचक न्यायानें त्या मागोमाग आलेच. फार आचारी झाले कीं, स्वयंपाक हटकून विघडतो अशा आशयाची जी एक इंग्रजी म्हण आहे ती अर्थवादानें आणि लक्षणेनें सुद्धां खरी आहे. वृत्तपत्राच्या संपादकीय खुर्चीवर तर सर्वत्र व सर्वच स्वयंतज्ज्ञ व सर्वज्ञ यांचें संमेलन साधलेलें असतें. तेव्हां अशा फाजील शहाण्यांच्या हातीं एकादा मजकूर गेला असतां त्याचे काय काय वाभाडे निघतील ते थोडेच ! कारण शहाण्यांनीं मूर्खपणा करायचा नाहीं तर तो करायचा तरी कुणीं ? तेव्हां धड मजकुरावर संपादकीय अकलेच्या हातसफाईची शस्त्रक्रिया घडली कीं, त्याचें मूळ रूप पालटून पॅरिसची आफ्रिका बनल्यास नवल नाही. आणि या रूपपालटानें वाचकांचा गैर-समज झाला कीं, त्यांच्या खऱ्या माहितीसाठीं मूळ स्वरूपाबद्दल खुलासा करण्याची जरूर आपोआपच उत्पन्न होते. आधीं जाणून बुजून लाथ मारून नंतर क्षमायाचना करण्यापैकींच कांहींसा हा प्रकार आहे.

खुलासा हें अपत्य वृत्तपत्रसृष्टींत जन्मास आलें तें विकृत बातमीची चूक निस्तरण्यासाठीं. परंतु लौकरच हें बाळ इतकें लाडावलें कीं, झालेले गैरसमज दूर करण्याऐवजीं ते अधिकाधिक दृढ व गुंतागुंतीचे करण्याकडेच

त्याची सारी करामत खर्च होऊं लागली. प्रथमतः औषधासाठीं म्हणून दारू पिऊं लागलेल्या एकच प्याल्यांतील तळीरामाला शेवटीं दारूसाठीं औषध पिण्याची पाळी आली, तसाच कांहींसा प्रकार होऊन प्रथमतः झालेल्या चुकांसाठीं खुलासा करण्यांत येऊं लागला तेथें हल्लीं खुलाशासाठीं चुका करण्याची प्रथा पडली आहे !

वास्तविक पाहतां मूळ मजकूर व खुलासा यांचें नातें धनी व चाकर अशा स्वरूपाचें असलें पाहिजे. मुळापेक्षां खुलाशाचाच बडेजाव माजविणें म्हणजे नवरदेवाऐवजीं ताशेवाल्याचीच वरात काढण्यासारखें आहे. पण वृत्तपत्रसृष्टींत याबाबत नेहमींच मालकाचें नांव गण्या व चाकराचें नांव रुद्राजीराव असा उफराटा जमाना दृष्टीस पडतो. खुलासे व प्रतिखुलासे यांचें भीम-जरासंधी द्वंद एकदां कां सुरू झालें कीं, त्या रणधुमाळींत मूळ हुकुमाचें पान कोणतें याचा वाचकांना मुळींच उमज पडत नाहींसें होतें. आणि असें होण्यांतच खुलाशांची खरी लज्जत असते. कारण वाचकांना संभ्रम उत्पन्न झाला नाहीं, तर खुलाशांचें-प्रयोजनच उरणार नाहीं मुळीं ! मग वर्तमानपत्र वाचतो तरी कोण आणि कशाला ?

मुलाखतीप्रमाणेंच खुलाशांनाही काळ, वेळ आणि कारण हीं लागत नाहींत. आपलें नांव वृत्तपत्रांत छापून आणण्याची लहर उठली कीं, कोणाही सोम्या बीन गोम्यानें उठावें आणि कोणत्याही वर्तमानपत्रांतील कसल्याही मजकुराबद्दल कांहींही खुलासा लिहून वृत्तपत्रांकडे धाडावा, कीं काम सत्रा आणे फत्ते ! संपादकाला कसें झालें तरी आपल्या पत्राचे ठराविक रकाने 'कशानें' तरी भरून काढावेच लागत असल्यामुळें बाहेरून ऐत्या चालून आलेल्या मजकुराला तो अत्यंत तत्परतेनें जागा देतो. कारण तेवढाच मजकूर खरडण्याचे त्याचे स्वतःचे श्रम त्यामुळें वांचतात !

गांवांत उंदीर पडणें हें जसें आगामी प्लेगचें लक्षण मानतात तद्वत् वृत्तपत्रांत खुलासे प्रसिद्ध होणें हें आगामी वाग्युद्धाचें दर्शक समजावें. एकाद्या शेंबड्या पोराला परक्यानें 'शेंबडें' म्हटलें कीं, लगेच त्याच्या आईला प्रेमाचा पान्हा फुटून ती मुलाचा कड घेऊन भांडणाला उठते, हा अनुभव सार्वत्रिक आहे. तसेंच आपण लिहिलेल्या मजकुरांत कोणीं खोडी काढली कीं, मूळ

लेखकाला अपत्यवात्सल्याची उसळी उठून तो त्या चुकीच्या मजकुराचें समर्थन करूं लागतो. आणि मग 'होते कत्तल गद्य.'

सुदाम्याच्या पोह्यांतील बंडुनानांनीं एका साध्या अंकलिपीला तेरा चुक्यांचीं शुद्धिपत्रकें जोडलीं त्या प्रकाराची पुनरावृत्ति होऊन एक चूक सुधारण्यासाठीं करण्यांत येणाऱ्या खुलाशामधून अखेर चुकांचा 'ग्रंथसाहेब' तयार होऊन सामान्य वाचकाला भेडसावून टाकतो.

बरें, इतकी खुलाशांची झुंबड उठवून देण्याइतकें महत्त्व, औचित्य आणि जारुर्य काय हें पाहूं गेलें असतां हातीं वर्तमानपत्री रद्दीखेरीज कांहींच लागत नाहीं. पुष्कळ वेळां तर करण्यांत आलेले खुलासे इतके रटाळ व गचाळ असतात कीं, ते कां करण्यांत आले हें कळणें वेदोनारायणांचा ब्रह्मपाठ आकलन होण्याइतकेंच कठिण असतें! एकदां एका गृहस्थानें वर्तमानपत्रांत खुलासा केला कीं, 'एका क्ष बोलपटांतील पदें मीं केलीं असें प्रसिद्ध झालें आहे; पण तें सर्वस्वीं खरें नाहीं. मला पदांच्या चाली संगीत चिवडाभजीं × × यांनीं दिल्या व पदांच्या कल्पना माझे मित्र × × यांनीं दिल्या व पदांच्या कल्पना माझे मित्र × × यांनीं सांगितल्या व त्याबरहुकूम मीं पद्यरचना केली आहे. तरी, कोणीही गैरसमज करून घेऊं नये.' (!)

आतां इतकें आर्जवून खुलासा करण्याइतकें यांत काय आहे? आपल्या-बरोबर आपल्या आणखी दोघां दोस्तांची जाहिरात करण्यापलीकडे या 'खुलाशका'नें काय साधलें?

दुसऱ्या एका गृहस्थानें खुलासा छापला कीं, "× × पत्रांत × × या टोपण नांवानें आलेल्या लेखांपैकीं तीन लेख मीं लिहिले होते, पण पुढच्या लेखांतील मतें मला पास नसल्यानें ती माझी असें कोणींही समजूं नये. यापुढें मीं खऱ्या नांवानेंच लेखन करणार आहें." हा खुलासा करण्याचें कारण उपयोग खुद्द लेखकाखेरीज इतरांना कळणें दुरापास्त आहे!

एकदां एका बातमीदारानें खुलासा केला कीं," गेल्या अंकांत × × साहेबांची जी मुलाखत छापली आहे ती घेण्यासाठीं मी गेलों तेव्हां × × साहेब हे एक इंग्रजी पुस्तक वाचीत पडले होते असा मजकूर छापला गेला आहे. पण अधिक चौकशीअंतीं आतां असें कळतें कीं, × × साहेब वाचीत

असलेलें पुस्तक इंग्रजी नसून मराठी होतें. तरी कोणीही आपला गैरसमज करून घेऊं नये ! "

या खुलाशाला हंसावें कीं रडावें याचा कोणी खुलासा करील तर फार उपकार होतील !

मराठी वृत्तपत्रांतून येणाऱ्या खुलाशांच्या भाताचीं नमुन्यादाखल दोनतीन शितें दिलीं आहेत. साराच भात उकरून या लेखाच्या पानावर मांडण्याचें कारण नाहीं. फक्त या खुलाशांचें भावी स्वरूप कसें काय होईल याबद्दल थोडा विचार करूं.

हल्लीं हरहम्मेश वर्तमानपत्रांतून जे शेंकडों निरर्थक (व आचरटही) खुलासे कांहींही कारण नसतां दडपून प्रसिद्ध केले जात आहेत त्या लाटेवरून पाहतां या सांथीनें बरेच लोक कायमचे 'लागले' आहेत असें दिसतें. त्यांना बरें करण्यास केवळ एक 'काळ' च समर्थ आहे. लोकशाही स्वराज्यपक्षाप्रमाणें या खुलाशावाद्यांचा लौकरच एक स्वतंत्र पक्षही स्थापन होईल अशीं चिन्हें दिसत आहेत. मिळेल तें पदरांत पाडून अधिकासाठीं हात पसरीत राहणें हें जसें लोकशाही स्वराज्य पक्षाचें ध्येय आहे तद्वत् या खुलाशावाद्यांच्या पक्षाचें ध्येय हेंच कीं,—वाचण्यांत येईल त्या बातमीबद्दल खुलासा प्रसिद्ध करून खुलाशासाठीं आणखी कंड्या पिकविणें ! !

या खुलाशावाद्यांचें एक मुखपत्र 'खुलासा' या नांवानें चालविण्यांत येऊन त्यांत फक्त खोट्या कंड्या व त्याचे विकृत खुलासे एवढेंच छापण्याची व्यवस्था करण्यांत येईल. या पत्रांत खालील स्वरूपाचे खुलासे वाचकांना वाचावयास मिळत जातील असा भरंवसा वाटतो.—

**खुलासा नं० १** :—तमाम लोकांच्या माहितीसाठीं जाहीर खुलासा करण्यांत येत आहे कीं, तीन वर्षांपूर्वी मी शिवलेला तांबड्या रंगाचा कोट आतां फाटून गेला असल्यामुळें मी नुकताच नवा जांभळ्या ब्लेझरचा कोट वापरूं लागलो आहें. तरी या कोटाच्या बदलानें कोणीही मजसंबंधीं कसलाही गैरसमज करून घेऊं नये. मी तो मीच आहें.

**—बंडो खंडो धोंडमारे**

**खुलासा नं० २** :—"कालपासून मी येथील रेणुकाश्रमांत जेवावयास

जाऊं लागल्यामुळें माझ्या कांहीं मित्रांचा भलताच गैरसमज झाल्याचें माझ्या नजरेस आणण्यांत आलें आहे. म्हणून खुलासा करतों कीं, माझा व माझ्या पत्नीचा कोणत्याही प्रकारें बेबनाव झाला नसून ती मजवर रागावून माहेरींही गेलेली नाहीं. आमचें उभयतांचें प्रेम पूर्ववत् कायम आहे. सध्यां तिच्या मासिक रजेमुळें मीं खाणावळीचा आश्रय घेतला आहे. तरी कोणींही आपला गैरसमज करून घेऊं नये."

—**हरिहरराव बाईलबुद्धे**

**खुलासा नं० ३:**—"नुकत्याच येथें झालेल्या ॲमेच्युअर क्लबच्या संशयकल्लोळांत मजकडे रेवतीची भूमिका असल्यामुळें मी माझ्या गुलमिशांना सफा कट दिला आहे. तरी त्यामुळें कोणीं आपला गैरसमज करून घेऊं नये. सुदैवानें आईबापसुद्धां माझे सर्व आप्तेष्ट सुखरूप हयात असून त्यांपैकीं कोणी इतक्यांत दगावेल असेंही दिसत नाहीं."

—**आत्माराम शृंगारपुरे**

आणि यानंतर खुलाशाचा कळस म्हणजे रोज सकाळीं प्रत्येक व्यक्तीनें उठल्याबरोबर तमाम लोकांच्या माहितीसाठीं आपण पूर्ण सुखरूप असल्याचें "बुलेटिन" काढावयाचें !

अशा स्वरूपाचे खुलासे मराठी वर्तमानपत्रांतून लौकरच फडकूं लागतील असा, हल्लींच्या खुलाशांच्या तांडवनृत्याकडे पाहतां, माझा होरा वाहात आहे अशी वाचकांना धोक्याची सूचना देऊन खुलाशावरचा हा खुलासेवार लेख आवरता घेतों. नाहीं तर हा लेख मारुतीच्या शेंपटासारखा लांबत कां गेला याबद्दल विस्तृत खुलासा करण्याची पाळी मजवर यायची !

# "अपरिहार्य कारण"

सध्यां सुरू असलेल्या माझ्या पत्र-पांडित्य-प्रदर्शन या लेखमालेचा चौथा स्टॉल "**अपरिहार्य कारण**" वास्तविक येथें प्रसिद्ध व्हावयास हवा होता. परंतु कांहीं "**अपरिहार्य कारणा**"मुळें तो येथें देतां आला नाहीं, याबद्दल मी दिलगीर आहें. पुढील पृष्ठावर हा स्टॉल वाचकांना खास पाहावयास मिळेल आणि त्याबरोबरच या "**अपरिहार्य कारणा**"चाही वाचकांना आपोआप उलगडा होईल.

—लेखक

# अपरिहार्य कारण

वास्तविक पाहतां प्रस्तुत लेखमालेचा हा हप्ता गेल्या अंकींच द्यावयास हवा होता. आणि त्याप्रमाणें सर्व तयारीही केली होती. पण नंतर वाटलें कीं," अपरिहार्य कारण " या वृत्तपत्राच्या बाजारांतील तेजीच्या चलनी नाण्याचें स्वरूप वर्णन करून सांगण्यापूर्वी वाचकांना त्याचें प्रत्यक्ष " डेमॉन्स्ट्रेशन " (वस्तुपाठ) च द्यावें, म्हणजे या नाण्याचें त्यांना प्रत्यक्षच यथायोग्य दर्शन होईल. आणि या विचारानेंच गेल्या अंकांत लेख न देतां " अपरिहार्य कारणा "ची हुकमी अपरिहार्य सबब सांगून मी मोकळा झालों !

यावरून वाचकांना कळून चुकलेंच असेल कीं, पत्रव्यवसायांत स्वैर पिंगा घालणारें " अपरिहार्य कारण " म्हणजे संपादकवर्गाची शुद्ध झब्बुशाही असते. एकाद्या झाडाचें नांव सांगतां येत नसलें कीं, आपण त्याला विलायती म्हणतों, तद्वत् संपादकाला आपल्या एकाद्या कृत्याचें योग्य व वाचकांच्या विचारी बुद्धीस पटेल असें कारण सांगतां येईनासें झालें कीं, तो " अपरिहार्य कारणा "च्या सबबीचें सर्वव्यापी चिलखत चढवतो व आश्रयदात्याच्या टीकेपासून आपल्या नाजूक कांतडीचें संरक्षण सफाईनें करतो. रुपेरी पड्यावर सावित्रीची पतिभक्तिपरायण भूमिका हृदयंगम अभिनयानें करणाऱ्या गांवगंगा साळूचें चरित्र व अंतरंग हीं जशीं प्रेक्षकांपासून नेहमींच चोरून राहतात त्याप्रमाणेंच वरकरणीं " अपरिहार्य कारणा "ची भरजरी झूल पांघरणाऱ्या संपादकाच्या कृतीच्या बुडाशीं असलेलें खरें कारण व त्याचें स्वरूपही भोळ्या बिचाऱ्या वाचकांना सदैव अज्ञातच राहतात !

वेताळाच्या हातांत कोलीत सांपडावें त्याप्रमाणें मराठी पत्र-पंडितांच्या हातांत ही " अपरिहार्य कारणा "ची सर्वंकश सबब सांपडली आहे. आणि

छोटा जॉर्ज वॉशिंग्टन् जसा दिसेल त्या वस्तूवर आपली नवी कुऱ्हाड बेशक चालवीत होता तद्वत् मराठी वृत्तपत्रांचे संपादकही या "अपरिहार्य कारणा"चा मारा वाटेल तेव्हां आणि हवा तसा वाचकांच्या माथीं मारीत असल्याचें दिसतें. ईश्वर जसा विश्वांतील अणूरेणू व्यापून पुन्हां दशांगुलें उरल्याचें सांगतात, तद्वत् हें संपादकीय "अपरिहार्य कारण" वृत्तपत्रसृष्टींतील सारे व्यवहार व्यापून पुन्हां संपादकाचें डोकें भरून राहिलें आहे. मृत्यु ज्याप्रमाणें राव, रंक कधीं पाहात नाहीं, तद्वत् अपरिहार्य कारण सांगतांना संपादकही योग्या-योग्य विचार कधीं मनांत आणीत नाहीं. बाकी एवढें मात्र खरें कीं, संपादकाचें "अपरिहार्य कारण" म्हणजे बिचाऱ्या वर्गणीदाराचें "अनिवार्य मरण"च तें !

वर्गणीदारांनीं संपादक महाशयांना आधींच वर्षाची वर्गणी आगाऊ देऊन ठेविलेली असते, त्यामुळें 'आधीं गुंतू नये नि मग कुंथू नये' या न्यायानें त्यांना संपादकाचे सारे अत्याचार उघडचा डोळ्यांनीं निमूटपणें पाहात बसण्या खेरीज कांहींच करतां येण्यासारखें नसतें. फरासखान्यांत जाणें मात्र कुणा-च्याही हातीं नव्हे पायीं असतें. पण तेथून बाहेर येणें मात्र परस्वाधीन; तसें कोणत्याही पत्राचे वर्गणीदार होणें मात्र वाचकांच्या इच्छेवर असतें. पण घेतलेल्या वर्गणींत आश्वासन दिल्याबरहुकूम वृत्तपत्र वाचकांना द्यायला संपादकाला भाग पाडण्याचा कांहींच दंडक बिचाऱ्यांच्या हातीं नसतो. त्यामुळें संपादक करील तो "अपरिहार्य कारणां"चा छळ हिंदूच्या एकत्र कुटुंबपद्धतीं-तील अनाथ विधवेप्रमाणें मुकाट्यानें सहन करण्याखेरीज त्यांना कांहींच गत्यंतर नसतें.

संपादकाचें कोठेंही, केव्हांही, कशानेंही अडूं द्यायचें नाहीं हें या "अपरिहार्य कारणा"चें प्रयोजन आहे. मानापमानांतला लक्ष्मीधर जसा "प्रसंग पडला तर एक, दोन, तीन, चार काय पण साऱ्याच वहिणींशीं एकटाच लग्न लावीन पण अडूं म्हणून द्यायचा नाहीं" या उदात्त बाण्यानें प्रेरित झालेला आहे तसें हें संपादकीय "अपरिहार्य कारणा"चें अमोघ अस्त्र "प्रसंग पडलाच तर एक, दोन, तीन, चार काय पण हजारों अडचणींतून अब्रूनिशीं पार पडण्याचे कामीं संपादकाचें जरासुद्धां अडूं म्हणून द्यायचें नाहीं" अशा थोर वृत्तीनें वागत असल्याचें दिसतें.

वर्गणीचे दर वाढविण्याचा प्रसंग असो अगर नियतकालिकांतील मजकुराचीं पानें कमी करण्याचा प्रसंग असो, कारणावांचून अंक बंद ठेवण्याचा प्रसंग असो अगर गाजावाजा केलेलें एकादें सदर अंकांतून अचूक गाळण्याची पाळी येवो, सारांश कसलीही अडचणीची व आपत्तीची वेळ येवो संपादक "अपरिहार्य कारणा"च्या खिडींत लपून वाचकांना सपशेल तोंडघशी पाडण्यास कधींच कचरत नाहीं. आपल्या वर्तमानपत्रास अमुक तमुक, अपूर्व व अद्‌भूत प्रकार अगर प्रकरण सुरू होणार अशा भपकेबाज जाहिराती आगाऊ फडकावून त्या आमिषाच्या साहाय्यानें वाचकरूपी मासे वृत्तपत्राच्या गळाला लावावयाचे आणि एकदां का ते तसे लागले कीं, "अपरिहार्य कारणा"चीं कोरडीं पानें त्यांच्या तोंडाला राजरोसपणें पुसावयाचीं अशी ही संपादकीय सोदेशाही सभ्यपणानें व उजळ माथ्यानें वृत्तपत्रसृष्टींत तांडवनृत्य करीत आहे. दिलेलीं अभिवचनें दिलेल्या स्वरूपांत पाळलीं गेल्याचें उदाहरण मराठी वृत्तपत्रसृष्टींत तरी अपवादादाखलच दाखवितां येईल. "अपरिहार्य कारणा"चें कवच आणि "दिलगिरी"चीं कुंडलें संपादकाच्या साजिऱ्या शरिरावर सदैव सज्ज असतांना वाचकांच्या वल्गनांना त्यानें तरी भीक काय म्हणून घालावी?

"आम्हीं अमुक अमुक गोष्ट करण्याचें कबूल केलें होतें, पण कांहीं अपरिहार्य कारणामुळें ती आम्हांस आतां करतां येत नाहीं याबद्दल दिलगीर आहोंत." अशा मासल्याचे संपादकीय खुलासे वाचण्याची पाळी मराठी वृत्तपत्रांच्या वाचकांवर नेहमींच येते. याचें खरें कारण असें असतें कीं, अर्धवट इंग्रजी जाणणाऱ्या आपल्या "विद्वान्" संपादकमजकुरांना एकाद्या इंग्रजी वृत्तपत्रानें अंमलांत आणलेली एकादी नवलाईची गोष्ट पाहून आपणही तसेंच कांहीं तरी "अचाट कर्म" करावें अशी बेफाम घाडशी कल्पना मोह घालते आणि त्या आवेशांत गडी तसें कांहीं तरी करण्याचें जाहीरही करून टाकतो. पण हा पहिला उमाळा जिरल्यावर बिचाऱ्याला आपल्या अकलेची व अल्पज्ञतेची जाणीव होऊं लागते. आणि मग कोठें त्याला समजून येतें कीं, अमेरिकन पत्र-पांडित्याची नक्कल आपण करूं पाहणें म्हणजे किंग कॉंगची कामगिरी डोंबाऱ्याच्या माकडानें करूं पाहण्यापैकींच प्रकार! अर्थातच रामाच्या स्पर्धेनें शिवधनुर्भंग करूं पाहणाऱ्या रावणाप्रमाणें फजीत पावलेला आमचा हा दोस्त पत्रपंडित मग आपलें काळतोंड लपविण्यासाठीं

"अपरिहार्य कारणा"चे दांत वाचकांना विचकून दाखवूं लागतो. कारण त्याला अनुभवानें पक्कें कळून चुकलेलें असतें कीं, हे आपले "दाखवावयाचे दांत" पाडण्यास समर्थ असलेला दंतवैद्य अद्याप निपजलेला नाहीं.

वर्तमानपत्रांतून नाना तऱ्हेचीं चित्रविचित्र कोडीं देण्याची प्रथा रूढ झाली आहे. पण अद्याप कोणीं हें संपादकीय "अपरिहार्य कारण" अचूक ओळखून काढण्याचा कूट प्रश्न आपल्या वाचकांना घातलेला नाहीं याचें आश्चर्य वाटतें. कारण कीं, हा कूट प्रश्नच असा मजेदार आहे कीं, वृत्तपत्रांतीलच काय, पण साऱ्या जगांतील कूट प्रश्न एक वेळ सोडवितां येतील, फार काय सांगावें, या विश्वाचें गूढ कोडेंही एक वेळ उलगडतां येईल पण संपादकाच्या "अपरिहार्य कारणाचें" कोडें चित्रगुप्ताच्या चुलत्यालाही बिनचूक सोडवितां येणार नाहीं. माझ्या वाचकांपैकीं जो कोणी ह्या अपरिहार्य कारणाचा बरोबर सुगावा सांगेल त्याला मी हजार रुपयांच्या (खिलापती) नोटा बक्षिस देईन ! *

संपादकीय शिष्टपणाची सारी सभ्यता या "अपरिहार्य कारणा"च्या कांचेच्या घरांत लपून राहिलेली असते. हें नाजूक कांचेचें रुबाबदार आवरण फोडून आंत पाहणाऱ्यास शुद्ध सोदेगिरीखेरीज प्राय: दुसरें कांहींच आढळणार नाहीं. अपरिहार्य कारण हा संपादकाच्या हातांतील हुकुमाचा एक्का किंवा प्रिव्ही कौन्सिलचा शिक्का आहे. त्याच्यावर तुमचें कांहींही चालणार नाहीं. नाटक कंपन्यांना जशी नाटकांतील चाहील तो भाग वाटेल तेव्हां गाळून प्रेक्षकांना चुरमुरे खात बसविण्याची पूर्ण मुभा असते तशी संपादकाला आपल्या पत्रांत हवा तेव्हा हवा तो हैदोसघुल्ला घालून वाचकांना खडे चारण्याचा सदर परवानाच दिलेला असतो जणूं. "अपरिहार्य कारण" हा परवलचा शब्द त्यानें उच्चारला कीं, त्याला सर्वत्र मुक्तद्वार ! !

---

* माझ्या बेकार वाचका ! जिभेला पाणी सुटूं देऊं नकोस. यदाकदाचित् एकाद्या पत्र-पंडिताचें विलायती कल्पनांनीं भडकलेलें माथें शेकून तूं या कूट प्रश्नाच उत्तर बाहेर काढलेंस तरीही हें बक्षिस तुला मिळणार नाहीं ही खात्री बाळग. कारण कींहीं "अपरिहार्य कारणा"च्या सबबीवर हें बक्षिस देण्याचें नाकारण्याचा संपादकीय सनातन हक्क मीं शाबूत राखून ठेवला आहे.

—लेखक

संपादकाचे सारे 'लांडे' कारभार सावरून घेणारी ही "अपरिहार्य कारणा"ची कुबडी त्याला प्रातःस्मरणीय वाटत असल्यास नवल नाहीं. आणि म्हणूनच तो तिचा जप वारंवार वेळी अवेळींही करीत असतो असें दिसतें. हिंदूंच्या देवतांत विघ्नहर्त्या गणपतीचें जें महत्त्व तेंच पत्र-पांडित्यांत अडचण-निवार्त्या "अपरिहार्य कारणाचें." आणि म्हणूनच कोणत्याही मंगल कार्यांत जसें गणपति-पूजन अवश्य असतें तद्वत् वृत्तपत्रसृष्टींत पूजेचें पहिलें पुष्प संपादक महाशय मोठ्या भक्तिभावानें "अपरिहार्य कारणा"ला वाहतात हें योग्यच होय.

श्रावण शुक्रवारची गोष्ट

# पुरणांत मीठ !

## एक संपूर्ण छोटी प्रहसनिका

[ स्थळ :—वेताळगल्ली. काळ :—प्रत्यक्ष प्रहसनिकेचा काळ एक दिवसाचा. पण तिचे परिणाम पुढल्या शुक्रवारपर्यंत राहतात.
पहिल्या व दुसऱ्या अंकांतील अंतर अर्धा तास.
दुसऱ्या व तिसऱ्या अंकांतील अंतर तीन तास.
तिसऱ्या व चौथ्या अंकांतील अंतर एक आठवडा.
चौथ्या व पांचव्या अंकांतील अंतर तीन तास. ]

## अंक पहिला

### प्रवेश पहिला व शेवटचा ( या अंकापुरता )

[ स्थळ :—वेताळगल्लींतील वकील विठ्ठल विनायक वांकडे यांच्या घरांतील स्वयंपाकघर; लांबी सहा फूट. उत्तरेकडील भिंतीस सौ. वारूबाई वांकडे, वकिलीणबाई बसल्या आहेत. त्यांच्यासभोंवार सगळीकडे अन्नाच्या राशी पडल्या आहेत. भाताचें तपेलें, कटाच्या आमटीचें पातेलें, दोनचार भाजांचीं घमेलीं, चटण्या-कोशिंबिरींच्या दगड्या, दुधातुपाच्या बरण्या वगैरे वस्तू सर्वत्र विखुरलेल्या आहेत. वारूबाईच्या समोर एका मोठ्या परातींत पुरणाचा लादा असून हातांतील लाटण्यानें पोळ्या लाटण्याचें काम त्या झराझर करीत आहेत. समोर कांहीं अंतरावर सौ. काशीताई फाकडे

सवाष्ण म्हणून जेवावयास बसल्या आहेत. त्यांच्या अंगावर नथेसुद्धां सारे ठळक दागिने झळकत आहेत. ठेवणीचें लुगडें नेसावयास काढलेलें असल्यामुळें त्यांना बरेंचसें अवघडल्यासारखें वाटत आहे. त्यांचें जेवण मध्यावर आलें असतां पडदा उघडतो व त्यानंतर कांहीं वेळानें—]

**वारूबाई** :—(तव्यावरच्या पोळीची हां हूं करीत घडी करून काशीबाईंच्या पानांत टाकीत असतां) ही पहा चांगली ऊन ऊन आहे. घ्या !

**काशीबाई** :—(पानावर हात धरून) अहो, नको हो, खरंच नको मला. पोट कसं अगदीं गच्च भरलं आहे.

**वारूबाई** :—हं. इतक्यांत पोट भरायला काय झालं ? नेहमीं तर तुम्ही किती जेवतां ! घ्या एवढी एक (पानांत टाकते). तूप घालूं का दूध ?

**काशीबाई** :—तूपच घाला. (पोळी खात) खरंच वारूबाई, पुरणाच्या पोळ्या कराव्यात तुम्हींच हं. तुमच्यासारख्या कांहीं आम्हांला जमत नाहींत आमच्या इथं तर नेहमीं म्हणायचं असतं कीं, त्या वारूबाईंसारख्या पुरणाच्या पोळ्या एक दिवस तरी करून दाखीव ... ... खरंच, काय हो करतां तुम्ही वारूबाई, जादू ?

**वारूबाई** :—(झालेल्या स्तुतीनें तव्यावरच्या पोळीसारखी फुगून) इश्श, जादू कसली त्यांत ? तुमच्यासारखंच मीही पुरण शिजवतें.

**काशीबाई** :—पण तुम्ही पुरणांत काय काय घालतां ?

**वारूताई** :—अहो, आणखीन् काय घालायचं ? डाळ, गूळ, वेलदोड्यांची पूड, आणि चवीसाठीं थोडं मीठ.....

**काशीबाई** :—(वारूळाचा पाहतां पाहतां पिरॅमिड झालेला पाहून जसें वाटेल तसा आश्चर्यानें) काय ? मीठ घालतां तुम्ही पुरणांत ? अहो, गोड पुरणांत खारं मीठ—?

**वारूबाई** :—हो बाई, चवीसाठीं गुळाबरोबर थोडं मीठही पुरणांत घालायला आम्हांला आईनं शिकवलं आहे. आमच्या माहेरची ती रीतच आहे......

(दोन राष्ट्रांत झालेला गुप्त तहनामा एकाद्या वर्तमानपत्राच्या बातमीदाराच्या हातीं अचानक लागावा, तशी वारूबाईंच्या या भाषणानें काशी-

बाईची अवस्था होते! मोठेंच रहस्य आज कळलें या आनंदांत निमग्न झाल्यामुळें वारूबाईंच्या माहेरघरच्या बडबडीकडे काशीबाईचें लक्षच नसतें. त्या मनांत पुढील स्वगत भाषण घोळवीत आहेत—)

"अस्सं काय? वारूबाईंच्या पोळ्या इतक्या चांगल्या होण्याचं कारण हें तर! आतां मीही पुरणांत मीठ टाकून घरच्यांना दाखवितें माझा सुग्रणपणा. मग पाहतें कशी पुन्हां वारूबाईच्या पुरणपोळीची स्तुति करतात माझ्या देखत ती...."

(पडदा)

# अंक दुसरा

[**स्थळ** :—रस्ता. वारूबाईच्या घरून भोजनोत्तर काशीबाई आपल्या घरीं निघाल्या आहेत. वाटेंत त्यांना साळूबाई साकडे उष्ट्या पत्रावळी उकिरड्यावर टाकण्यासाठीं जात असतांना भेटतात व तदनंतर—]

**साळूबाई** :—कां? आज कुणीकडे पंगत होती?

**काशीबाई** :—वारूबाईकडे सवाष्ण गेलें होतें.

**साळूबाई** :—काय बेत होता भोजनाचा?

**काशीबाई** :—पुरणपोळी.

**साळूबाई** :—हो, खरंच. वारूबाईकडे पुरणपोळीच असायची. त्यांच्या-सारखी सुरेख पुरणपोळी आमच्या आळींत कुणाला नाहीं करतां येत! आमच्या इथं तर नेहमीं म्हणायचं असतं —

**काशीबाई** :—(मध्येंच एकदम) अहो, आज मोठ्या खुबीनं वारू-बाईंची युक्ति काढून घेतली. ती बया म्हणे गुळाच्या बरोबर मीठही घालते पुरणांत म्हणून तर तिच्या पोळ्या—

**साळूबाई** :—(आश्चर्यानं) काय? गुळाच्या बरोबरीनं मीठ?—???

**काशीबाई** :—हो बाई. अहो, म्हणून तिच्या पोळ्या.....हो बाई पुरणांत मीठ घातलं तर आमच्यासुद्धां पोळ्या....

**साळूबाई** :—हो, हो तर काय! त्याच मेलीच्या हाताला काय सोनं लागलंय् थोडंच? आपणसुद्धां....

[दोघी जणी मनाशीं कांहीं एक निश्चय करून दोन वाटांनीं निघून जातात. रंगभूमीवर कोणीच पात्र शिल्लक नसल्यानें पडदा पडतो.]

## अंक तिसरा

[**स्थळ** :—दत्तमंदिर. **वेळ** :—पुराणाची; भटजीबुवा पुराण सांगत आहेत, आणि वाती करतां करतां साळूबाई सांकडे उमाबाई उकाडे यांच्याशीं गुजगोष्टी करीत आहेत असा देखावा दृष्टीस पडतो.]

**साळूबाई** :—ऐकलंत का, उमाबाई ? ती काळुंद्री काशी म्हणे आज वकिलीणबाईकडे सवाष्ण गेली होती. ती मेली आज मला सांगत होती, वारूबाईच्या पोळचा इतक्या चांगल्या कां होतात ! ती सटवी म्हणे पुरणांत मीठ घालते—

**उमाबाई** :—(एकदम मोठ्यानें) काय ? मीठ ?—

**साळूबाई** :—अहो, हळू जरा. किती ओरडतां मोठ्यानं ? पुरणाला चव यावी म्हणून ती त्यांत मीठ घालते म्हणे.

**उमाबाई** :—काय बाई, ऐकावं तें नवलच ! गोड पुरणांत ही बया मीठ घालते. कधीं ऐकलं नव्हतं बाई !

**साळूबाई** :—अहो, म्हणून तर तिच्या पोळचा चांगल्या चविष्ट होतात. आमच्या इथं तर नेहमीं त्या मेलीच्या पोळचांची तोंड फाटेपर्यंत स्तुति चालत असते —

**उमाबाई** :—हो बाई, आमच्या इथंसुद्धां तोच नमुना. आतां आपणही करून दाखवूं त्या वकिलीणबाईसारख्या सुरेख पोळचा. पण काय हो, ती बया किती मीठ घालते पुरणांत ?

**साळूबाई** :—गुळाच्या बरोबरीनं घालते म्हणे.

**उमाबाई** :—काय ? गुळाच्या बरोबरीनं मीठ ?

**साळूबाई** :—हो तर. प्रत्यक्ष त्या मेल्या काशीनंच पाहून सांगितलंन् मला. आतां आपणही तसं करून या मेल्या चोंबडचा पुरुषांना दाखवूं आमचा सुगरणपणा !

[इतक्यांत पुराण संपतें व सर्व बायका जातात. पडदा पडतो.]

## अंक चौथा

[ **स्थळ** :—मंडई. भाजी खरेदीसाठीं केशवराव फाकडे, सदाशिवराव साकडे आणि उत्तमराव उकाडे मंडई-पिशव्या घेऊन येतात. नमस्कारचमत्कार झाल्यावर— ]

**केशवराव** :—हें पहा मित्रद्वय, आज तुम्हीं दोघांनींही आमच्याकडे जेवायला आलं पाहिजे. आज आमची 'वाइफ' फक्कडसं पुरण घालून वारूताईपेक्षांही चांगल्या पोळ्या करणार आहे.

**सदाशिवराव** :—आज शक्य नाहीं बुवा! आमच्या हिनं तर आज वारूताईसारख्या सुंदर पोळ्या करून दाखवण्याचा चंग बांधला आहे. तेव्हां तुम्हीच दोघं आमच्याकडे पंगतीस या.

**उत्तमराव** :—नो, नो, तुम्हीं दोघांनीं आज आमच्याकडे यायला हवं. आमचं कुटुंब आज खुसखुशीत पुरणपोळ्या करून वारूताईवर ताण करणार आहे. तेव्हां —

[ एकमेक एकमेकाला आग्रह करतात. पण कोणीच आज दुसरीकडचं आमंत्रण स्वीकारीत नाहीं. शेवटीं प्रत्येकानं प्रत्येकाकडे पांच पांच पोळ्या पाठवून द्याव्या अशी तडजोड ठरते. ]

## अंक पांचवा व शेवटचा

[ **स्थळ** :—स्वयंपाकघर. पात्रें काशीबाई व केशवराव फाकडे. काशीबाई पोळ्या लाटीत आहे व केशवराव जेवावयास बसले आहेत. वॉटर्लूची लढाई मारल्यानंतर ड्यूक ऑफ वेलिंग्टनच्या चेहऱ्यावर जो भाव दृग्गोचर झाला असेल तो काशीबाईच्या चेहऱ्यावर ओसंडत आहे. केशवराव बायकोच्या आजच्या आविर्भावानें थक्क होऊन निमूट स्थितींत जेवीत आहेत. ]

**काशीबाई** :—(तव्यावरची ताजी पोळी तुपांत भिजवून नवऱ्याच्या पानांत वाढीत असतां अभिमानी आवाजानें) पहा तर खरी आज बायकोची करामत. आणि पुन्हां त्या मेल्या वारूबाईचं नांव नका घेऊं माझ्यापुढं. काय

म्हणे 'वारूबाईसारख्या पुरणपोळ्या तुला साधत नाहींत.' आज पहा तर खरं.....

**केशवराव** :—(मोठ्या उत्सुकतेनें पोळीचा घांस तोंडांत भरतात. पण इतक्यांत वैदिक ब्राह्मणाच्या घशांत नळीचें हाडूक अडकल्यासारखें करून थूः थूः थूः थूः करून थुंकतात. तव्यावर टाकायची पोळी तशीच हातावर ठेवून आपल्या नवऱ्याला वेड तर लागलं नाहीं, या भावनेनें काशीबाई त्यांच्याकडे पाहात राहते. घांस थुंकल्यावर रागानें) काय ग, आज काय पुरणांत गुळाऐवजीं मीठ ओतलंस वाटतं शेरभर ? सारं खारट घोट आणि म्हणे वारूबाईपेक्षां मी पोळ्या चांगल्या करतें. उजेड! बिचारा तो सदाशिवराव जेवायला बोलवत होता. गेलों असतों, तर जेवण तरी पोटभर मिळालं असतं. ह्या तुझ्या काय पोळ्या कीं मिठाच्या गोळ्या?..... बरं त्या साळूबाईनं नि उमाबाईनं पाठवलेल्यांपैकीं एकेक पोळी वाल पाहूं......

चरफडत धडपडत काशीबाई तसें करते. पण त्याही पोळ्यांची चव घेतांच केशवराव तोंड वाईट करून घांस थुंकतात. तोंडानें बायकोवर ताशेरा झाडीत रागानें उठतात व आंचवून जेवणासाठीं जवळच्या खाणावळींत जातात. तों तेथें उत्तमराव व सदाशिवराव भेटतात. प्रत्येक जण मनांत काय तें समजतो. पण एकमेकांकडे पाहण्याचेंही टाळतो. ]

[ इकडे काशीबाई, साळूबाई व उमाबाई यांच्या अंगाचा म्हणजे नुसता ज्वालामुखी झालेला असतो. आणि त्यांतून वारूबाई वांकडे यांजवर शिव्यांचा लाव्हा रस वाहात असतो. त्या गडबडीनें पडदा धाडकन् पडतो.]

# नगरशेटांचें आभारप्रदर्शन !

तालुके ठणठणपूरचे किराणा मालाचे प्रसिद्ध व्यापारी नारूशेट भुसारी यांना नुकताच सट्ट्याच्या व्यापारांत मोठा फायदा झाला होता. या आनंदाप्रीत्यर्थ गांवकऱ्यांना आज त्यांनीं फीस्ट व पानसुपारी देण्याचा समारंभ केला होता. समारंभास गांवांतील प्रमुख व प्रतिष्ठित मंडळी हजर होती. फीस्ट व पानसुपारी आटोपल्यावर नारूशेटांच्या कानांत कोणीं तरी गुणगुणलें.—

"शेटजी, आतां जमलेल्या मंडळींचे आभार मानायला हवेत तुम्हीं."

शेटजींनाही ही सूचना एकदम पसंत पडली व ते आभार मानण्यासाठीं उभे राहिले. शेटजी गांवांतल्या पुष्कळ सभांना हजर राहात होते हें खरें असलें, तरी 'सभेंत' भाषण करण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग होता. तरीही शेटजी गडबडले नाहींत. त्यांनीं सभेंत होणाऱ्या भाषणांच्या पायावर पाय ठेवून भाषण करण्याचें ठरविलें.

मात्र त्यांनीं एवढें हेरलें कीं, नेहमींच्या आपल्या दुकानदारी भाषेंत 'भासन' करून चालणार नाहीं. गांवांतील मोठमोठी मंडळी जमली आहेत. त्यांच्यासमोर 'सवस्कुत्रांत' भाषण केलें पाहिजे. अनेक समारंभांतील आभारप्रदर्शनांचीं भाषणें शेटजींनीं ऐकिलीं होतीं; त्या भाषणांची रचना-पद्धति आणि वेचक शब्द यांचा भरपूर 'उपयोग' करून शेटजींनीं आभार-प्रदर्शनाचें भाषण पुढीलप्रमाणें केलें. ते म्हणाले :

"सभ्यगृहस्थहो, व बढी बडी मंडळीहो ! आज आपण सर्व जण या येथें फीस्ट खाण्याकरितां जमलां आहांत हें मला माहीतच आहे. दुसऱ्याच्या खर्चानें फीस्ट खाणें हें जरी फायदेशीर आहे, तरीही आपला अमोल्य टाइम्स खर्चून आपण येथें उपाहार केलांत याबद्दल मी आपला अत्यंत दिलगीर आहें. (मंडळी कांहींशी कावरीबावरी होतात.) ह्या वेळेस आपणांपैकीं कोणास

फिरावयास, कोणास मित्रांकडे गप्पा मारण्यास, कोणास बाजार करण्यास व कोणास खेळण्यास जाण्याचें असतें हें मला अज्ञानच आहे. पण आपण रीतिप्रमाणें हीं महत्त्वाचीं सारीं कामें बाजूस सारून ही फीस्ट झोडण्यास हजर राहिलांत, या माझ्या आपणांवरील ऋणाबद्दल मीं आपले आभार मानले नाहींत तर तें फार वाईट दिसेल. लोक मला हंसतील म्हणून तुमचे मी आभार मानतों. आपणांस येथें आणखीही थोडी गैरसोय सोसावी लागली. हा हॉल फारसा मोठा नाहीं, हें आपण पाहातच आहांत. या वाड्याच्या मालकाकडे मीं तिसऱ्या मजल्यावरील मोठ्या दिवाणखाण्याची या समारंभासाठीं मागणी केली होती. पण मालकांचें अडगळीचें सामान तेथें टाकलेलें असल्यामुळें त्यांनीं तो देण्याचें नाकारलें. या लहानशा जागेंत मीं बोलाविलेल्या लोकांपेक्षां पुष्कळ अधिक लोक घुसले व वाटेल तेथें बसले; त्यामुळें आपली गैरसोय झाली असल्यास कोणींही वाईट वाटून घेऊं नये. या समारंभासाठीं ही जागा दिल्याबद्दल मी मालकांचे आभार मानतों. त्याचप्रमाणें बैठकीसाठीं आपल्या कंपनींतील सतरंज्या, गाद्या व लोड दिल्याबद्दल येथील ॲमेच्यूर्स ड्रॅमॅटिक क्लबाच्या मेंबरांना मीं आज फीस्टला बोलावून त्यांची परतफेड केलीच आहे. या समारंभावर भरपूर प्रकाश पाडणारा किट्सनचा दिवा तीन तास मोफत वापरूं दिल्याबद्दल मी महाजन आणि मंडळींचे आभार न मानले तर माझ्या कृतघ्नतेवर अंधार पडेल (सौम्य हंशा). पानसुपारीसाठीं पानें पुरविल्याबद्दल पानांचे मळेवाले माझे मित्र श्री. सय्यद हुसेन यांचा मी आभारी आहें. सुपाऱ्या वगैरे माल आमच्याच किराणा दुकानांतून आणला आहे. अत्तरदाणी, गुलाबदाणी उसनवारीनें मिळण्याची तजवीज येथील सुप्रसिद्ध सराफ शंकरशेट यांनीं केली. आतां एकाच गृहस्थांचे आभार मानून मी आपलें भाषण औरत (हंशा) (...औरत नव्हे आवरत) आणतों. ते गृहस्थ म्हणजे चंडिकाश्रमाचे रानडे. मागील बाकीबद्दल तगादा न करितां त्यांनीं या समारंभासाठीं शेव, भजीं, चिवडा वगैरे गेल्या आठवड्यांतील शिलकी माल निम्या दरानें पुरविला याबद्दल मी त्यांचे जाहीर आभार न मानावे तर मला अन्नपचन होणार नाहीं. आज आपणा सर्वांनीं माझ्यावर जे उपद्व्याप केले आहेत, ते मी या जन्मांत विसरणार नाहीं, एवढें सांगून आपणांस रजा देतों."

# आठवणी-लेखनाची कला

मरणान्तानि वैराणि हें वचन प्रसिद्ध असलें, तरी तें तितकेंसें खरें नसावें असें मला केव्हां केव्हां वाटतें. कारण जगांत असे कांहीं लोक असतात कीं, ते आपलें वैर माणूस मेल्यावरच साधतात ! मात्र त्यांचा सूड घेण्याचा मार्ग अगदीं अद्ययावत् सुधारलेल्या पद्धतीचा असल्यामुळें मृत व्यक्तीचा हे लोक सूड उगवीत आहेत हें प्रथमदर्शनीं तरी ध्यानीं येत नाहीं. ज्यूलियस् सीझरची अशी एक गोष्ट सांगतात कीं, 'त्याला स्तुति आवडत नाहीं' असें म्हणून एका धूर्त खुषामतखोरानें त्याची स्तुति केली व अशा रीतीनें त्याच्या डोळ्यांत धूळ फेंकली. सीझरची 'निंदा' करण्याच्या मिषानें या महाधूर्तानें त्याची 'स्तुति' करून लोकांना बनविण्याचें एक नवें तंत्र निर्माण केलें असें म्हणावयास हरकत नाहीं. या तंत्राचा उपयोग खुषमस्कऱ्यांना किती झाला हें समजण्यास मार्ग नसला, तरी मरणोत्तर सूड घेऊं इच्छिणारांची मात्र या नव्या तंत्रानें फार सुंदर सोय करून ठेवली आहे असें मला वाटतें.

या तंत्राचा फायदा अनेकांनीं घेतला आहे व सध्यांही अनेक लोक घेत आहेत. ज्या गांवीं जायचें त्याच्या उलट दिशेला तोंड करून प्रवास सुरू करायचा देखावा करून मुक्कामाचें ठिकाण अचूक गांठण्याच्या या कौशल्याबद्दल ही मंडळी खरोखरीच धन्यवादास पात्र असतात. थोर माणसांची निंदा करण्याच्या निमित्तानें त्यांची स्तुति करण्याच्या जुन्या तंत्राचा व्यत्यास करून आधुनिक सूडकऱ्यांनीं स्तुतीची ढाल पुढें करून नालस्तीचे वार मृत व्यक्तीवर करण्याची जी नवी टूम घोटून लोकप्रिय केली आहे, तिला 'आठवणी' असें प्रतिष्ठित नांव सध्यां लाभलें आहे. Come to

scorn and remain to praise या वचनाचे खालीं डोकें वर पाय करून Come to praise and remain to scorn या धर्तीवर जें लिखाण लिहिलें जातें त्याला 'आठवणी' असें म्हणतात !

आठवणी लिहिणें हा एक साहित्यप्रकार झाला आहे व तो प्रसिद्धि-लोलुप लेखकांत अत्यंत लोकप्रियही होऊन बसला आहे. बाकी तें स्वाभाविकच आहे म्हणा. आठवणी लिहिण्याचें तंत्र अगदीं सोपें असल्यामुळें तें कोणाही धूर्त व्यक्तीला सहज यशस्वी रीतीनें हाताळतां येतें; आणि शिवाय आठवणी लिहिण्यापासून फायदेही तसेच असतात.

सत्वर, सुलभ व सवंग प्रसिद्धि मिळविण्याचा राजमार्ग म्हणजे थोर मृत पुरुषांच्या आठवणी लिहिणें हा होय, याबद्दल माझी तरी पूर्ण खात्री आहे. क्ष ही व्यक्ति स्वर्गवासी झाल्याचें कळलें कीं, प्रसिद्धिलोलुप साहित्यिकांच्या लेखण्या कशा, चंदीचे हरभरे पाहून फुरफुरणाऱ्या घोड्याप्रमाणें, वळवळूं लागतात ! अन्नछत्रांत कोणींही जाऊन पोटभर जेवून यावें, त्या-प्रमाणें कोणींही उठावें आणि मृत व्यक्तीच्या तोंडभर आठवणी लिहून प्रसिद्ध कराव्यात. अशी स्थिति असल्यामुळें एकाद्या थोर पुरुषाचा मृत्यु म्हणजे प्रसिद्धिसंपादनाची पर्वणीच ती !

आतां तुम्ही म्हणाल आठवणी लिहिण्यासाठीं मृत व्यक्तीशीं स्नेह-संबंध—निदान परिचय—तरी नको का ? पण ही अडचण ज्याला मृतासंबंधीं खरोखरीच कांहीं लिहावयाचें असेल त्याला असते. 'आठवणी' लिहिणाऱ्या फांकड्या बोरुबहाद्दरांना तिचा कोण केवा ? ज्यांना व्याख्यान ऐकण्याची इच्छा असेल त्यांनाच व्याख्यानाच्या विषयाची पर्वा वाटते. पण जे कुत्र्या-मांजरांचे आवाज काढण्याच्या स्त्रीसमुदायावर "कागदी विमानें" फेंकण्याच्या व असल्याच 'थोर' हेतूनें सभागृहांत गर्दी करतात, त्यांनीं व्याख्यानाचा विषय कसला आहे याची चौकशी करण्याचें कारण काय ? तद्वत् आठवणी लिहिण्याचा मोका साधण्यासाठीं टपून बसलेल्या संधिसाधूंनींही मृतांशीं आपली जानपछान होती किंवा कसें या प्रश्नाच्या काळजीची झळ स्वतःच्या मनाला लागूं देण्याचें सुतराम् कारण नाहीं. आठवणी लिहिण्याच्या तंत्रांतील हें तर पहिलें कलम आहे.

तुम्ही म्हणाल जानपछान नसतां एकाद्याच्या आठवणी कशा लिहितां

येतील? प्रश्न बरोबर आहे. पण प्रसिद्ध झालेल्या व होत असलेल्या आठवणी जर तुम्ही काळजीपूर्वक वाचण्याचे श्रम घ्याल, तर या अवघड प्रश्नाचें उत्तर तुमचें तुम्हांलाच कळून येण्याइतकें सोपें आहे. आठवणी लिहिण्याच्या तंत्रांतील दुसरें महत्त्वाचें कलम हें आहे कीं, आठवणीमध्यें मृत व्यक्तीविषयीं शक्य तितका थोडा मजकूर लिहावा व अधिकांश भाग आत्मवर्णनानेंच भरून काढावा. ऐंशीं टक्के आत्मस्तुति व वीस टक्के मृत व्यक्तीची नांवनिशी अशी भट्टी घातली कीं, शंभर टक्के मसालेदार आठवणींचा रस्सा तयार होतो.

आणि तसें पाहिलें, तर आठवणी म्हणजे स्वतःची जाहिरात करून घेण्याचा शिष्टसंमत प्रकार नव्हे तर काय? आठवणीमध्यें "मी" हा सूर्य आणि मृत व्यक्ति ही त्या सूर्याभोंवतीं फिरणारी पृथ्वी अशी भूमिका घ्यावी लागते. मृत व्यक्ति थोर असल्यामुळें आपण तिच्या परिचयाचे होतों, विश्वासांतील होतों, तिच्या व आपल्या जिवाभावाच्या, सुखदुःखाच्या गोष्टी नेहमीं होत, वगैरे माहिती आवर्जून सांगण्याचा मुख्य हेतु स्वतःचा 'भाव' वाचकांच्या दृष्टीनें वाढवून घेणें हाच असल्यानें मृत व्यक्तीच्या नांवाचा दोरा धरून स्वस्तुतीचा पतंग जितका उंच चढवेल तितका चढविणें अपरिहार्य असतें हें येथें लक्षांत ठेवणें अवश्य आहे. आठवणी लिहिण्याची खरी कसोटी मी तरीही समजतों कीं, त्या वाचून झाल्यावर वाचकाला हटकून संभ्रम पडला पाहिजे कीं, या आठवणी खुद्दांच्या आहेत, कीं मृत व्यक्तीच्या आहेत? मृत व्यक्तीशीं इतकें एकरूप होऊन ज्यांना लिहितां येत नसेल, त्यांनीं वाटलें तर मृत्युलेख लिहावेत; आठवणी-लेखन हा साहित्यप्रांत त्यांचा नव्हे खास!

आठवणी या खरोखर उत्कृष्ट ध्वनिकाव्याचा नमुनाच म्हणतां येईल. ध्वनिकाव्यामध्यें वरवर दिसणारा अर्थ एक, पण प्रछन्न अर्थ दुसराच असतो, आणि तोच अधिक रम्य असतो, नाहीं का? आठवणींचाही मामला तोच. वरवर पाहणाऱ्याला त्या आठवणी मृत व्यक्तीच्या वाटाव्यात, पण थोडें खोल शिरणाऱ्याला त्या आठवणींत, मृत व्यक्तीच्या नामरूप कांचेंतून आठवणी लिहिणाऱ्याचेंच चित्र जास्त उठावदार उमटलें असल्याचें दिसावें, अशी कलाचतुर मांडणी ज्याला साधते त्याच्या आठवणीलेखनाची बहादुरी काय वर्णावी? या दृष्टीनें आठवणी या साहित्यप्रकाराला पौराणिक मयसभेचीही

उपमा साजून दिसेल. मयसभेंत नवख्या कौरवांची जशी दिशाभूल झाली व पाणी वाटावें तेथें दगड निघावा अशी त्यांची अवस्था झाली, तसाच प्रकार आठवणी वाचीत असतां बिनदर्दी वाचकाचा होतो. मृत व्यक्ती-संबंधीं माहिती मिळेल म्हणून आठवणी वाचायला जावें, तों पदरांत लेखकाच्या स्वस्तुतीचेंच पुराण भरपूर पडावें अशी फसगंमत कलावंत आठवणी-लेखक सहज करूं शकतात. या दृष्टीनें —

## एकावरि मन ठेवूनि नेत्रें खूण करिति दुसऱ्याला

या पण्यांगना नीतीचा उत्कृष्ट नमुना म्हणजेच "आठवणी" होत असें म्हणावयास हरकत नाहीं.

आठवणी लिहिण्याचा प्रधान हेतु मृत व्यक्तीच्या थोरपणाच्या झिरझिरीत वस्त्राआडून आत्मस्तुतीचें ताट वाचकांपुढें मांडण्याचा असतो हें नित्यश: प्रसिद्ध होणाऱ्या आठवणी वाचून ध्यानीं येईल. खरोखरींच हा मोका मोठा नामी असतो. मृत व्यक्तीच्या शोकामुळें वाचकांचीं मनें सहानु-भूतियुक्त असतात. त्याचा फायदा घेऊन आठवणींच्या रूपानें शर्करावगुंठित स्वस्तुतीची कडू गोळी त्यांच्या घशांत सफाईनें उतरवतां येते. एरवीं स्वत:चीच स्तुति स्वत: करणें शिष्टसंमत होणार नाहीं. पण मृत व्यक्तीच्या तोंडीं आपल्याला हवे ते उद्गार कोंबून आपली व आपल्या रटाळ वाङमयाची वारेमाप जाहिरात करून घेतां येते; मृत व्यक्तीकडन त्याचा इन्कार होण्याची भीति नसल्यावर वचने किम् दरिद्रता ?

या मुख्य हेतूच्या पोटांत आणखी एक दुय्यम हेतु कैक वेळां साधून घेण्याचीही सोय आठवणी-लेखनाच्या कलेनें उपलब्ध करून ठेवली आहे. ती म्हणजे स्वत:च्या हयात शत्रूवर चोरटा हल्ला करून स्वत: नामानिराळें राहण्याची ! समजा, तुमच्या मनांतून अ या व्यक्तीवर टीका करावयाची आहे; पण ती उघडपणें करण्याइतका बेडरपणा तुमच्या अंगीं नाहीं. अशा स्थितींत तुमच्या लेखणीची खुमखुमी जिरविण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे ब या मृत व्यक्तीच्या आठवणी लिहिणें हा होय. तुम्ही आणि ब हे एकदां बोलत असतां ब नें अ विषयीं काय काय उद्गार काढले ही आठवण सांगण्याचें निमित्त करून अगर जेवढी आग पाखडण्याची तुमची इच्छा असेल तेवढी

व च्या मुखानें खुशाल पाखडून घ्या ! इतकेंच काय, पण या चर्चेच्या प्रसंगीं आपण स्वत: अ ची बाजू घेऊन व बरोबर भांडणही केलें अशी शेवटीं एक 'ठेवून' देण्यास विसरूं नका. म्हणजे तुमचा शहाजोगपणा चांगलाच सिद्ध होऊन अ च्या मात्र जखमेंत मीठ चोळण्याचेंही सुख तुम्हांला लाभेल. उलट मृत व्यक्तीवर प्रतिहल्ला करण्यासारखा तो प्रसंग नसल्यानें अ ला मात्र मनांतल्या मनांतच जळफळत बसावें लागेल ! एका दगडानें दोन पक्षी किती लीलेनें मारतां येतात हें आठवणी-वाङमय वाचल्यानें समजतें.

मृत व्यक्तीचें नांव व आठवणी-लेखकाचें नांव एवढा मजकूर खरा व बाकीचा सारा प्रकार पुराणांत जमा होण्यासारखा अशा बावनकशी आठवणीही लिहिण्याचें नीतिधैर्य कांहीं महात्म्यांच्या ठिकाणीं दिसून येतें. पण त्यानें कांहींच बिघडत नाहीं. उलट असल्याच आठवणी लिहून प्रसिद्ध करण्याला लेखकांच्या अंगीं कलाधारिष्टच लागतें.

आपलें बेंड बाहेर फुटूं नये यासाठीं अशा आठवणी लिहितांना एक मात्र खबरदारी घेणें दूरदर्शीपणाच्या दृष्टीनें सुरक्षितपणाचें असतें. आपण ज्या प्रसंगांच्या आठवणी दिल्या, त्याप्रसंगीं मृत व्यक्ति व आपण स्वत: यांखेरीज तिसरा कोणीं हजर असल्याचा बहाणा सहसा करूं नये. त्यांतल्या त्यांत हयात व्यक्तीची हजेरी तर आठवणींत मुळींच येऊं नये ! Two is company, पण Three is crowd हें वचन आठवणी-लेखकानें सतत नजरेसमोर ठेवावें. एका म्यानांत ज्याप्रमाणें दोन तलवारी राहूं शकत नाहींत, तद्वत् मृत व्यक्तीच्या एका आठवणींत दोन हयात व्यक्ति सुखानें नांदूं शकत नाहींत. हें लक्षांत न घेतां आठवणी-लेखनाच्या कलेचा आडदांडपणें विनयभंग करणाराचा 'सालोमालो' होण्याचा दाट संभव असतो.

आठवणी लिहिणें ही कला हल्लीं किती सवंग झाली आहे याची वाचकांना कल्पना यावी यासाठीं मी दोनचार आठवणी येथें देतों. खालील आठवणींत फक्त मृत व्यक्तीचें नांव-गांव बदललें, कीं त्या कोणाही थोर व्यक्तीच्या विश्वसनीय आठवणी म्हणून केव्हांही व कोणालाही स्वत:च्या नांवावर खपवितां येतील. पुरेशी धूर्तता व धारिष्टच अंगीं असणाऱ्या कोणाही प्रसिद्धिलोलुप वाचकाला या संधीचा फायदा घेतां यावा या थोर व परोपकारी हेतूनें या आठवणीचे कोणत्याही प्रकारचे हक्क माझ्या किंवा

माझ्या सौभाग्यवतीच्या (प्रिय वाचकांनीं क्षमा करावी; माझा अद्यापि विवाह झालेला नाहीं हें खरें असलें, तरी आपल्या पुस्तकांचे हक्क आपल्या बायकोच्या स्वाधीन ठेवण्याची 'लेटेस्ट फॅशन' असल्यामुळें माझा नाइलाज झाला आहे!) स्वाधीन ठेवण्याचा भांडवलशाहीपणा मी करीत नाहीं.

नाना (किंवा काका, तात्या, अण्णा, मामा जो कोणी असेल तो) यांच्या आकस्मिक मृत्यूनें मला जबरदस्त धक्का बसला व माझी हृदयक्रिया एकदम बंद पडली! ती पुन्हां चालू करवून घेण्याच्या हेतूनें मी डॉक्टरांच्या दवाखान्याकडे जात असतांना नानांच्या अनेक आठवणींनीं माझ्या डोक्यांत इतकी गर्दी केली कीं, माझ्या डोक्याचें 'अझाद मैदान' होतें कीं काय, अशी मला भीति वाटूं लागली. नानांचा व माझा इतक्या वर्षांचा दाट स्नेह होता व अनेक प्रसंगीं नानांच्या उपयोगी पडण्याचें भाग्य मला लाभलें, याची मला धन्यता वाटते. नानांची राहणी अत्यंत साधी होती. नाना इतके विद्वान् व प्रसिद्ध होते तरी ते सर्वसामान्य माणसाप्रमाणेंच सर्व चलनवलन क्रिया करीत! मानवी देहाच्या कोणत्याही हालचालींत ते आपली विद्वत्ता किंवा मोठेपणा यांचें प्रदर्शन करीत नसत. कोण साधेपणा आणि विनय हा!

नाना मुंबईला आले कीं, मला भेटल्यावांचून कधींही परत जात नसत. आणि एकदां ते माझ्या घरीं आले कीं, दोनचार तास तरी मनमोकळचा गप्पा-टप्पा होत. आपण लिहिलेल्या नव्या पुस्तकांचीं हस्तलिखितें ते मला अगत्यानें वाचून दाखवीत व त्यांत मीं सुचविलेल्या दुरुस्त्या आनंदानें मान्य करीत. ते मला वारंवार म्हणत, "* * (येथें ज्यानें त्यानें आपलें नांव घालावें) तुमच्यासारखा सहृदय व रसिक टीकाकार विरळा. तो * * (येथें आपल्या हयात शत्रूचें नांव टाकावें) कसला प्रथितयश टीकाकार! बोलून चालून साहित्य-सारमेय तो. ज्याच्या त्याच्यावर भुंकणें तेवढें त्याला माहीत. तुमच्या नखाची सर नाहीं यायची कोणाला महाराष्ट्रांत." एवढा मोठा विद्वान् साहित्यिक माझ्या गुणलवाचेंही इतकें कौतुक करी, यावरून त्यांच्या स्वभावाची ऋजुता व्यक्त होते.

नानांना माझें लिखाण फार आवडे व भेटले कीं, माझ्या लघुकथांची

व कवितांची ते स्तुति करीत. (येथें आपल्या दोनचार रटाळ लघुकथांची मनमुराद प्रशंसा नानांच्या तोंडीं दडपावी.) मरण्यापूर्वी कांहीं दिवस नानांची व माझी भेट झाली, तेव्हां मीं त्यांना माझी 'लेटेस्ट' कविता 'मातृ-विलाप' वाचून दाखविली—

"भोकांड पसरे कार्टा ।
का अजुनी हा थांबेना ? ॥

रट्ट्यावर रट्टे हाणले
'तिकड'च्या हवालीं केलें !
गॅलरिंत नेउनि आदळलें

शिव्या देउनि जीभचि शिणली
परि अजुनी हा थांबेना !"

ही कविता ऐकून नानांचा कंठ भरून आला. ते सद्गदित स्वरानें म्हणाले, "* * राव, हें खरें काव्य. या कवितेंत रडणाऱ्या मुलांचा सामाजिक प्रश्न विदारक स्वरूपांत मांडला आहे. कल्पनासौष्ठव, रचनाचातुर्य, नाद-माधुर्य (येथें सुचतील तेवढीं विशेषणें वापरून घ्यावींत.) वगैरे गुण या कवितेंत ओतप्रोत भरले आहेत; नाहीं तर त्या ह्याच्या कविता......"

❧ ❧ ❧

एकदां रेल्वेच्या प्रवासांत मी थर्ड क्लासमध्यें व नाना सेकंडमधून प्रवास करीत होते. मधल्या एका स्टेशनवर मला पाहतांच नाना धांवतच आले व मग सर्व प्रवास त्यांनीं थर्ड क्लासांत माझ्याजवळ बसून गप्पा मारीत केला. "तुमच्या प्रेमळ संगतीपुढं सेकंड क्लासची काय पर्वा ?" असें ते मला म्हणाले.

❧ ❧ ❧

अशा तऱ्हेच्या अनेक आठवणी कोणाही थोर व्यक्तीच्या नांवानें देऊन स्वतःचा ढोल स्वतः बडवून घेणें फारसें कठिण नसतें. वर दिलेल्या नमु-

न्याच्या आठवणींत नानांच्यापेक्षांही लिहिणाऱ्याचीच थोरवी जास्त गाण्यांत आली आहे हें वाचकांच्या ध्यानीं येईलच. आठवणीलेखनाचा आत्मस्तुति हा आत्मा होय, व त्याचें शरीर म्हणजे मृत व्यक्तीची नांवनिशी. आतां असल्या आठवणी-वाङमयामुळें मृत व्यक्तीची बदनामी होते हें खरें; पण तिकडे दुर्लक्ष करण्याशिवाय गत्यंतर नसतें. मोठें कार्य करूं पाहणाऱ्याला लहान-सहान बाबींकडे कानाडोळा करावाच लागतो, हा धडा जरी वाचकांना या लेखानें शिकविला, तरी तो लिहिण्यासाठीं खर्च केलेला ३ तास १९ मिनिटें व ३७ सेकंद इतका वेळ कारणीं लागला असें मी मानीन.

# एका सिनेमा-तारकेची मुलाखत

सिनेमानटी म्हटली कीं, तिच्या मुलाखतीला वर्तमानपत्रांत जो भाव येतो तो पाहून माझ्या तोंडाला नेहमीं पाणी सुटतें. ‘कलोद्धारक भारत’ या सुप्रसिद्ध साप्ताहिकांत वार्ताहर म्हणून माझी नेमणूक झाली, तेव्हां माझ्या मनांतील महत्त्वाकांक्षा अशी होती कीं, आमच्या ‘पेपर’साठीं एकाद्या सिनेमानटीची ‘सनसनाटी भरेली’ मुलाखत आणून छापावयाची व वार्ताहराच्या जन्मास आल्याचें सार्थक करावयाचें! परंतु कैक दिवस आमच्या ‘सिटी एडिटर’ (म्हणजे शहर-संपादक हं!) नीं माझ्याकडे ती कामगिरीच दिली नाहीं. एकाद्या सिनेमानटीची मुलाखत घेण्याचा प्रसंग आला कीं, ते स्वतःचेंच घोडें पुढें दामटीत असल्यामुळें माझ्या महत्त्वाकांक्षी मनाचें तट्टू खट्टू होऊन वसे!

पण एकदां तो अमृतसिद्धियोग आला आणि म्हापणकरांचें ज्योतिष चुकून बरोबर ठरल्यामुळें मला एका आठवड्यांत ‘अनपेक्षित लाभ’ घडला. आमचे सिटी एडिटर शीघ्रसाहित्याच्या ‘उच्च’ अभ्यासासाठीं एक आठवडा-भर पुण्यास गेल्यामुळें ‘कलोद्धारक भारत’च्या संपादकांनीं मला या आठवड्यासाठीं कोणा तरी सिनेमानटीची मुलाखत घेऊन येण्यास सांगितलें.

मुलाखतीची सारी साग्रसंगीत तयारी मीं आधींच करून ठेवली होती. निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून सिनेमानटींच्या ज्या मुलाखती वारंवार प्रसिद्ध होतात, त्या काळजीपूर्वक वाचून मी सिनेमानटींना विचारावयाच्या प्रश्नांची नंबरवारीनें यादीच तयार केली होती. ती खिशांत कोंबून व पोषाख जरा टाकठीक करून मीं मुलाखतीस जाण्याचें ठरविलें.

या आठवड्यांत कोणाची मुलाखत घ्यावी हा प्रश्न नव्हताच. कारण मॉडर्न आर्ट अँड एन्शंट क्रॅफ्ट लिमिटेड कंपनीच्या नव्या बोलपटाची 'फुल्ल' पेज जाहिरात 'कलोद्धारक भारत'च्या येत्या अंकीं असल्यामुळें त्या बोलपटाची नायिका 'बंगालकी परी' हिची मुलाखत घेण्याची संपादकांची मला आज्ञा होती. मी दुपारीं मॉडर्न आर्ट अँड एन्शंट क्रॅफ्ट कंपनीच्या दहाखणी एक मजली इमारतीच्या 'प्रचंड' स्टुडिओंत जाऊन दाखल झालों.

प्रथमच दारावरचा पठाण मला आंत सोडीना; मोटारी आणि सूट-बूटवाले यांच्याखेरीज कोणासही परवानगीशिवाय आंत सोडतां येत नाहीं असें त्यानें मला सुनविलें. इतक्या साग्रसंगीत तयारीनिशीं स्टुडिओपर्यंत येऊन मुलाखत न घेतांच जावें लागतें कीं काय याची मला भीति वाटूं लागली.

अखेर माझ्या तल्लख डोक्यांत एक कल्पना शिरली. स्टुडिओच्या लॅबोरेटरींत डार्क रूममध्यें फिल्म धुण्याच्या कामावर माझी नवी नेमणूक झाली असून मला कामावर आजपासून हजर व्हायला हवें असें त्याला मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी अशा चार भाषांची गल्लत करून सांगितलें, तेव्हां त्याची समजूत पटली व त्यानें मला निमूटपणें आंत जाऊं दिलें. (आडदांड पठाणांवरही बातारामी प्रयोग किती यशस्वी होतो याच्या आलेल्या या अनुभवामुळें त्या दिवसापासून 'बातारामी कल्ट'बद्दलचा माझा आदर वाढत आहे हें येथेंच नमूद न केल्यास वाचकांना आणखी एक 'थाप' ठोकून देण्याची आयती चालून आलेली संधि गमावल्यासारखें होणार आहे!) घरांतील सर्व निरुपयोगी व मोडक्यातोडक्या जिनसा फेंकून देण्याची जागा म्हणून जशी एक अडगळीची खोली असते, तद्वत् स्टुडिओमध्यें सर्व निकामी परंतु वशिल्यामुळें नोकरीस ठेवणें भाग पडलेल्या इसमांचें आश्रयस्थान म्हणजे लॅबोरेटरी डिपार्टमेंट ही अनुभवानें जाणीव असल्यामुळेंच दारावरच्या त्या आडदांडखां भयंकरखानानें 'डार्क रूम' म्हणतांच डोळे मिटून मला स्टुडिओंत जाऊं दिलें.

❦ ❦ ❦

मॉडर्न आर्ट अँड एन्शंट क्रॅफ्टच्या स्टुडिओंत जिकडे तिकडे कबुतरांनीं 'विधिपूर्वक केलेली 'मॉडर्न आर्ट' आणि जळमटां-कोळिष्टकांनीं केलेली 'एन्शंट क्रॅफ्ट' दिसत असल्यामुळें कंपनीच्या नांवाच्या यथार्थतेबद्दल

मला शंका राहिली नाहीं. थोडी शोधाशोध केल्यावर व्हरांड्यांत एक जाडजुड इसम आडवा पडलेला माझ्या दृष्टीस पडला. त्याच्या पिंजारलेल्या केसांवरून व गालमिशांवरून तो कंपनीचा 'व्हिलन' असावा हें मीं तर्कानें ओळखलें. त्याची भेट घेऊन मी माझ्या आगमनाचा उद्देश त्याच्या (लांब) कानावर घातला. प्रथम त्यानें माझ्याकडे दुर्लक्षच केलें. पण माझ्या तोंडून 'बंगाल की परी' हे शब्द निघतांच अंगांत आल्याप्रमाणें करून तो उठला व माझे दंड धरून 'मेरी प्यारी, मेरी प्यारी,' असें कांहीं तरी बडबडूं लागला.

अखेरीस एकमेकांला न समजणाऱ्या भाषेंत बराच वेळ बातचित केल्यावर मला कळलें कीं, 'बंगाल की परी' या सुप्रसिद्ध सिनेमास्टारचा तो 'मालिक' असून त्याचें नांव बंदेअल्ली. 'छापा'मध्यें आपल्या प्याऱ्या 'बंगाल की परी'चें वर्णन देण्यासाठीं मी आलों आहें असें समजतांच तो आनंदून नाचूं लागला व माझ्यासाठीं त्यानें एक 'सिंगल च्याय' मागविला. त्याच्या बोलण्यावरून मला कळलें कीं, आजपर्यंत त्याच्या 'बंगाल की परी'ची मुलाखत कोणत्याही 'छापां'त आलेली नाहीं. म्हणूनच माझें त्याला इतकें अगत्य वाटलें असावें.

चहापान झाल्यावर बंदेअल्लीनें मला आदरपूर्वक बंगाल की परीच्या मुलाखतीस चलण्यास सुचविलें. एक अभिजात सिनेमासम्राज्ञी, अभिनय-कुशल नाटयतारका, हजारों प्रेक्षकांची 'हृदय की रानी !', सौंदर्य-शालिनी, कलाकमलिनी इ० इ० म्हणून जिचा गौरव मी अनेकांच्या तोंडून ऐकत होतों त्या 'बंगाल की परी'चें प्रत्यक्ष दर्शन व परिचय होणार या कल्पनेनें मनांतल्या मनांत विलक्षण हुरळून मी बंदेअल्लीबरोबर चालूं लागलों.

त्यानें मला स्टुडिओच्या इमारतीच्या मागील बाजूस नेलें आणि तेथील एका तबेल्याचें दार उघडून मला म्हटलें,

"देखो, बाबूजी, ये है बंगाल की परी, पूछो जो कुछ पूछना है, पूछो !

मी क्षणभर स्तंभितच झालों. बंगाल की परी म्हणून जिचें इतकें वर्णन मी आजवर ऐकत आलों, ती शेवटीं एक यःकश्चित् घोडी निघाली ! गोलपिठचावर लागणाऱ्या सिनेमांच्या वाटेस न जाण्याच्या माझ्या आढयतेचें प्रायश्चित्त मला मिळालें म्हणायचें.

परंतु आतां माघार घेणें शक्य नव्हतें. 'कॉपी 'शिवाय परत गेलों तर 'कलोद्धारक भारत 'चे संपादक माझा उद्धार केल्यावांचून राहणार नाहींत याची खात्री असल्यामुळें अखेर मीं 'बंगाल की परी 'ची मुलाखत घेण्याचें ठरविलें. नटींच्या मुलाखतींत दिलेलीं उत्तरें खरोखरीच कोणती नटी देत असते नाहीं तरी? नटींच्या मुलाखती हें एक तंत्र आहे. त्या तंत्रानुसार 'बंगाल की परी 'ची मुलाखत घेण्याचें मीं ठरविलें व म्हटलें:—

'नमस्ते.'

नाक फुरफुरून, थोडेंसें खिकाळून आणि आपल्या मागील पायांना कांहींसा व्यायाम देऊन 'बंगाल की परी 'नें माझें 'प्रेमळ' स्वागत केलें. सिनेमानटीपासून सभ्य व अब्रूदार गृहस्थानें चार पावलें दूर राहण्याची आवश्यकता अनेकांनीं आजवर प्रतिपादलेली माझ्या कानांत घुमत असल्या-मुळें 'बंगाल की परी 'पासून मीं दोन हात दूर राहण्याचें सुरक्षित धोरण प्रथमपासूनच ठेवलें होतें.

'बंगाल-की-परी 'च्या तबेल्यांतील दुर्गंधीनें माझें डोकें उठविल्यामुळें मीं वहींत काय लिहिलें कोण जाणें! पण' कलोद्धारक भारतां 'त छापून आलेला मजकूर पुढीलप्रमाणें होता —

"'बंगाल की परी' यांच्या 'दिवाणखान्यां 'त मीं प्रथम पाऊल टाकलें तेव्हां तेथें दरवळणाऱ्या सुगंधानें माझें मस्तक भरून गेलें. 'बंगाल-की-परी' यांना सेंटस्‌चा शौक बराच दिसला. त्यांच्या दिवाणखान्यांत सर्वत्र कला-कुसरीचे चित्रविचित्र नमुने दिसत होते व ते पाहून प्रेक्षकांचें मन गारीगार होत होतें. 'बंगाल-की-परी' या शामलवर्णी असल्या, तरी दिसायला मोहक असून बोलतांना नाकपुड्या प्रस्फुरित करण्याची त्यांची लकब तर अगदीं जीवघेणी आहे."

नंतर खिशांतील वही हळूच पाहून मीं पहिला प्रश्न केला :

"आपलें नांव काय?"

माझ्या प्रत्येक प्रश्नाला 'बंगाल की परी 'नें फुरफुरणें, खिकाळणें व खुरडणें या क्रिया करण्यापरीकडे वास्तविक कोणतेंच उत्तर दिलें नाहीं. परंतु सिनेमानटींच्या अनेक मुलाखती मीं वाचलेल्या असल्यानें बंगाल की परीच्या

या कृतींतून कोणतें उत्तर ध्यायचें याची मला पूर्ण कल्पना येई व तींच उत्तरें मी आतां सरळ मुलाखतीच्या स्वरूपांत देतों. मायामच्छिंद्र बोलपटांत गोरखनाथाच्या तबल्यांतून "चलो मछिंदर, गोरख आया" हे शब्द उमटले, तसे बंगाल की परीच्या फुरफुरण्यांतून मला तिच्या उत्तराचे शब्द बरोबर ऐकूं येत.

आमच्यांत झालेलीं प्रश्नोत्तरें :

"आपलें नांव काय ?"

"बंगाल की परी ?"

"आपला जन्म कोठें व केव्हां झाला ?"

"माझा जन्म तामिळनाड प्रांतांत झाला. जन्मसाल नक्की माहीत नाहीं. परंतु गेलीं चार वर्षें आमच्या मॉडर्न आर्ट अँड एन्शंट क्रॅफ्ट कंपनीतर्फे माझा तेरावा वाढदिवस पाळला जात आहे."

"आपणास बंगाल की परी कां म्हणतात ?"

"तें माझें सिनेमांतील नांव आहे. माझें खरें नांव तामिळ नाडद हुड्गी असें आहे. परंतु सिनेमाला असली हेंगाडीं नांवें चालत नाहींत, म्हणन मला तें लुसलुशीत नांव देण्यांत आलें."

"आपला सिनेमांत प्रथम प्रवेश केव्हां झाला ?"

"वर्ल्ड वाइड फिल्म कंपनीच्या 'संगदिल मौत यानें समशेर-ई-तोफ' या दणदणीत बोलपटांत बदमाषांच्या तावडींत सांपडलेल्या नायकाला सोडविण्यासाठीं ज्या व्हिक्टोरियांतून नायिका जाते त्या व्हिक्टोरियास मला जुंपलें होतें व त्याच स्थितींत रजतपटावर माझा प्रथम प्रवेश झाला."

"आपण आतांपर्यंत किती बोलपटांत किती भूमिका केल्या व त्यांपैकीं कोणत्या आपणांस आवडतात ?"

"आतांपर्यंत मी एकूण तेवीस बोलपटांत लहान मोठ्या भूमिका केल्या आहेत. ऐतिहासिक व स्टंट बोलपटांत मला भूमिका मिळते व स्टंट बोलपटांतील अद्‌भुत कामें मला मनापासून आवडतात. "औरत क्यों हुई यानें मध्यरात का जंग" या बोलपटांतील माझी भूमिका फार लोकप्रिय झाली व तीमुळेंच मला 'स्टारडम' मिळालें. तथापि कलेच्या दृष्टीनें माझी

सर्वोत्कृष्ट भूमिका 'आर्टकिलर मुव्हीटोन'च्या "सब घोडे हिंदुस्थान यानें गद्धे की दुनिया" या बोलपटांतील आहे असें माझ्या अल्प बुद्धीला वाटतें."

"आपण सिनेमांत कोणत्या हेतूनें शिरलांत ?"

हा माझा प्रश्न ऐकून बंगाल की परी पांच मिनिटें हेटाळणीनें हंसत खिदळत राहिली. माझा प्रश्न चुकला कीं काय म्हणून मीं माझी यादी तपासून पाहिली. प्रश्न अगदीं बरोबर होता. मग ही घोडी खिकाळते कशाला ?

पण इतक्यांत खिकाळणें संपवून बंगाल की परी म्हणाली,

"माफ करा माझ्या खिकाळण्याबद्दल. पण तुमचा प्रश्नच तसा हास्यास्पद नाहीं का ? 'कलेची सेवा' या एकाच उदात्त उद्देशावाचून सिनेमांत पाऊल टाकणारी एक तरी नटी तुम्ही आजकाल दाखवून द्याल काय ? माझा सुद्धां तोच थोर उद्देश आहे. कलेची निरपेक्ष सेवा ! आम्ही सिनेमा-तारका एकाद्या राष्ट्राचें कर्ज शोभेल एवढ्या लठ्ठ आंकड्याचे पगार घेतों ते सुद्धां केवळ कलेच्या निरपेक्ष सेवेसाठींच."

"स्टुडिओचें वातावरण आपणांस कसें काय वाटतें ?"

"अगदीं निर्मळ. इतर स्टुडिओचें काय असेल तें एक असो बापडें; परंतु आमच्या स्टुडिओचें मात्र वातावरण गंगेहून निर्मळ आणि भागिरथीहून पवित्र आहे. अहो, फार काय सांगावं ? कैक गांवसावित्री आमच्या स्टुडिओंत आल्यावर कुलीन व खानदानीच्या घराण्यांतील सभ्य महिला म्हणून समाजांत वावरतात; इतकं आमच्या इथलं वातावरण स्वच्छ आहे."

"आपलं शिक्षण कुठवर झालं आहे ?"

"तें नक्की सांगतां येत नाहीं. परंतु सुशिक्षित सिनेमानटींत माझी गणना होते व इतर अनेक नटींप्रमाणें हिंदी, उर्दू, इंग्रजी, पंजाबी, तामिळ, मराठी, पुस्तु वगैरे भाषा मला अवगत आहेत हें आमच्या कंपनीच्या जाहिरातींत तुम्ही वाचलंच असेल."

"प्रेक्षकांचें आपल्याविषयीं मत कसें आहे ?"

"माझी अल्पस्वल्प सेवा प्रेक्षकांनीं आजवर गोड मानून घेतली आहे. माझी फॅनमेल दिवसेंदिवस वाढत असल्यामुळें माझ्या तबेल्याशेजारीं लौकरच एक पोस्ट ऑफिस उघडणें सरकारला भाग पडेल असें माझे डायरेक्टर घोड-पाणी म्हणतात. माझें काम पाहून कांहीं लोक माझी पूजा करतात, तर

कांहीं दुष्ट लोक दुसऱ्या फिल्लमवाल्यांच्या चिथावणीमुळें, मला फटके मारूं इच्छितात. आजकाल निरनिराळ्या पोझिशनमधील माझ्या फोटोंना फार मागणी आहे असें आमच्या कंपनीचा पब्लिसिटी ऑफिसर म्हणतो."

"आपल्या आयुष्यांतील एकदोन संस्मरणीय प्रसंग सांगूं शकाल काय ?"

"हो. मध्यरात का जंगमधील माझ्या कामाबद्दल एका संपादकानें, त्याच्या पत्राला फुलपेज जाहिरात दिली असतांही, माझ्या कामांत दोष काढले. तेव्हां मीं तडक त्याच्या ऑफिसांत जाऊन संपादकमहाशयावर दोनचार दुगाण्या झाडल्या. माझ्या या स्टंटचा आमच्या पब्लिसिटी मॅनेजरनें असा फायदा करून घेतला कीं, त्यामुळेंच मध्यरात का जंग हा बोलपट रेकॉर्डब्रेकिंग ठरला."

"हिंदुस्थानांत सर्वश्रेष्ठ दिग्दर्शक कोण आहे असें आपणांस वाटतें ?

"अर्थात् आमच्या कंपनीचे दिग्दर्शक घोडपाणी हेच हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ दिग्दर्शक आहेत असें मला वाटतें."

"सर्वश्रेष्ठ नट कोण ?"

"पंजाब का बेटा."

"आणि नटी ?"

या प्रश्नाच्या उत्तरादाखल बंगाल की परीनें जो थयथयाट मांडला, त्यावरून माझ्या लक्षांत आलें कीं, भलताच प्रश्न माझ्या तोंडांतून गेला! प्रत्येक सिनेमानटीची आपणच सर्वश्रेष्ठ नटी असल्याची बालंबाल खात्री असल्यामुळें, या प्रश्नाचें उत्तर सिनेमानटींना स्पष्टपणें देतां येत नाहीं. परंतु प्रश्न विचारणारानें तें उत्तर गृहीत धरावें अशी त्यांची अपेक्षा असल्याचें बंगाल की परीच्या या 'कलात्मक' अभिनयावरून मी समजून चुकलों!

झालेली चूक सांवरण्यासाठीं मीं चटकन् विषय बदलून विचारलें—

"आपले पुढील बेत काय आहेत ?"

"म्हटलें तर मनाशीं मीं अनेक बेत योजिले आहेत. माझी कीर्ति ऐकून मला होलिवुडहून एकसारखे 'कॉल्स्' येत आहेत. परंतु मातृभूमीच्या सेवेपेक्षां मला पैसा व कीर्ति यांचें महत्त्व वाटत नाहीं. म्हणून मीं त्या आमंत्रणांचा स्वीकार केला नाहीं. परंतु माझ्या कलेंत सुधारणा व प्रगति व्हावी म्हणून उच्च अभ्यासासाठीं युरोप व अमेरिका खंडांचा प्रवास करण्याची

व होलिवुडला समक्ष भेट देण्याची मात्र माझी महत्त्वाकांक्षा आहे. लढाई संपतांच मी त्या दौऱ्यावर जाणार आहें. आमचे डायरेक्टर घोडपाणी हेही माझ्याबरोबर येणार आहेत."

"सध्यां आपण काय करीत आहांत ?"

"सध्यां मी माझें आत्मचरित्र लिहिण्यांत गुंतलें आहें. आमच्या कंपनींतील कुणींसें मला सांगितलें कीं, तुमच्याकडच्या एका नटीनें एक पुस्तक लिहून नुकतेंच प्रसिद्ध केलें म्हणून. मींही तेव्हांपासून ठरविलं मनाशीं आणि त्याप्रमाणं अवघ्या पन्नास रुपयांत एका आडवारी पत्रांतील एका प्रूफरीडरनें "मी कां फुरफुरतें ?" या नांवानें माझें आत्मचरित्र लिहून देण्याचं मान्य केलं आहे. जगांतील निरनिराळ्या बावीस भाषांत तें एकाच वेळीं प्रसिद्ध करण्याचा माझा विचार आहे."

"आपला जगाला कांहीं संदेश आहे का ?"

"भले, काय प्रश्न हा ? कॉंग्रेस पुढारी व सिनेमानटी यांना जगाला हरघडी संदेश देण्याचा जन्मसिद्ध हक्कच आहे. मी तो कां गमावूं ? माझा जगाला संदेश असा आहे कीं—

"स्त्रियांचें शील व पावित्र्य म्हणजे जगाची नीति असल्यानें सिनेमा-नटींना घरोघरीं देव्हाऱ्यांत स्थान मिळाल्यावाचून जगाचा खरा उद्धार होणार नाहीं."

बंगाल की परीचा हा संदेश ऐकून, ती आपला फोटो माझ्या घरीं देव्हाऱ्यांत ठेवण्यासाठीं देईल या भीतीनें मी चटकन् "शुक्रियार, अच्छा, नमस्ते" म्हणून तेथून झटकन् निसटलों व पळतच स्टुडिओच्या बाहेर सटकलों.

# पिता-पुत्र !

पिता आणि पुत्र ! किती निकटचें व जिव्हाळ्याचें नातें हें ! अगदीं एकाच हाडामांसाचे अन् रक्ताचे जीव ! पण या दोन जिवांचा संबंध जितका निकटचा असतो तितकाच त्या उभयतांचा एकाद्या गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोण भिन्न असतो हें आश्चर्य नव्हे काय ? फार लांब कशाला ? प्रत्यक्ष पित्याच्या दैनिक कार्यक्रमाची दैनंदिनी लिहावयास सांगितली तर दोघांच्या विचारांत किती तफावत पडेल तें तुम्ही एकदां प्रत्यक्ष अनुभव घेऊनच पहा.

## पित्याचा दैनिक कार्यक्रम

(प्रत्यक्ष पित्याची रोजकीर्द)

६–३० : सूर्य नुकताच कोठें क्षितिजावर येत आहे. अजून उन्हें पडण्यास तासभर अवकाश आहे. डोळ्यांत झोंप कशी मी म्हणत आहे. पण आतां उठलेंच पाहिजे. मोठ्या आणि वाढत्या संसाराची जबाबदारी शिरावर असल्यामुळें स्वसुखाकडे पाहण्यास वेळच नाहीं. कर्तव्य म्हणजे कर्तव्य !

७ : अगदीं संताप आणणारी गोष्ट. सूर्य कासराभर डोक्यावर आला तरी चहा तयार नाहीं ! वेळेवर चहा करील तर ती बायको कसली ! पण रागावण्यांत अर्थ नाहीं. सर्व भोग शांतपणें भोगलेच पाहिजेत.

७–३० : हीं कार्टीं घोड्याएवढालीं झालीं तरी अजून लौकर उठण्याची कांहीं त्यांना संवय लागत नाहीं. रोज रोज त्याबद्दल पोरांना रागें भरण्याचा खेद वाटतो. पण इलाज नाहीं. सर्वच गोष्टी त्यांच्या आईवर अवलंबून

ठेवणें ठीक नाहीं. प्रेमळपणेंच पण निश्चयपूर्वक पोरांना शिस्त लाविली पाहिजे, अशानें आपल्याविषयींचा आदर वाढतो.

८ : जरा कोठें सुपारी चघळतों आहे तोंच बाईसाहेबांनीं भाजीची झोळी अन् पन्नास जिन्नसांची यादी आणून आदळलीच समजा ! रोज रोज या बायकांना सारी बाजारपेठ खरेदी करावयाची असते कीं काय ?

८–४५ : मंडई करून येत असतां वाटेंत सहज रामभाऊंच्या दुकानांत टेकलों. ताजा ज्ञानप्रकाश वाचण्यासाठीं हातांत घेतला. पण दुकानांतील रामभाऊंच्या चटोर स्नेह्यांच्या गप्पांपुढें व वादविवादापुढें एक अक्षर वाचावयास सुचेल तर शपथ !

९–३० : पाठीवर दीड मणाचें ओझें घेऊन उरापोटीं घर गांठलें, तर बाईसाहेबांनीं फार उशीर केल्याबद्दल पूजा बांधली. बायकांची जीभ लोखंडाची असती तर —

१० : अंघोळीचें पाणी सारें गार होऊन गेलेलें असावयाचें हें रोजचेंच आहे. जळकीं लांकडें विझविल्याचे राखेचे तरंग पाण्यावर पसरलेले ! कसेबसे चार तांबे अंगावर ओतून घेतले. ब्राह्मणधर्म !

१०–३० : जेवणाची तऱ्हा खाणावळीच्याही तोंडांत मारणारी ! भात मऊ सूत, पोळी अर्धीकच्ची अन् आमटी म्हणजे तांबडया भुकटीचें सारच ! स्टेशनवरच्या जेवणासारखें घडयाळाकडे पाहून पानांत पडेल तें पोटांत ढकलायचें !

११ : ऑफिसची वेळ होऊन गेली. आतां बुधवारांतून टांगा करूनच गेलें पाहिजे. जेवल्याबरोबर ही धांवपळ रोजची, मग कसलें अन्नपचन ?

११–३० : मस्टरवर सही ठोकून कारकुनी आसन गांठलें. कोण उष्मा हा ! अगदीं जाकोबाबादला गेल्यासारखं वाटतं. जड पोट झालेलं अन् वर उकाडा ! पांच मिनिटें सुरसुरी काढलीच पाहिजे. त्याखेरीज कामाकडे लक्ष नाहीं लागणार —

१ : हा हेडक्लार्क म्हणजे दैत्य आहे नुसता ! जरा कोठें डोळा लागतो न लागतो तों आलें बोलावणें ! बापाचं मतिक अडलंय् याच्या —

३ : त्या रेळचाच्या टेबलचें कामही माझ्याच टेबलावर ? धन्य आहे या साहेबाची !

४ : भटजीच्या ‘ राजभुवनां ’तला चहा म्हणजे कढत गुळवणीच ! पण सकाळपासून पोटांत कांहीं नाहीं. कांहीं खाल्ल्याप्याल्याखेरीज ऑफिसचं काम कसं होणार हातून ?

५ : दोन माणसांना पुरून उरेल इतकं काम बडवलं तेव्हां कुठं ऑफिसांतून सुटका —

५–३० : दमूनभागून घरीं यावं, अंग लवंडण्यास स्वच्छशी बैठकही नसायची. खोली म्हणजे म्युनिसिपालिटीच्या कचऱ्याची पेटीच जणूं ! तरी घरांत खायला काळ चार कार्टीं आहेत —

६ : अशक्तपणा वाढतो म्हणून डॉक्टरनीं कांहीं व्यायाम घेण्यास सांगितलें आहे. खरें म्हणजे मला मिनिटाची फुरसत नाहीं या संसाराचा गाडा ओढण्यापुढें. पण प्रकृतीसाठीं —!

७ : आज ब्रिजमध्यें मी चांगला खेळलों. घरीं पोरांना ही हकीकत सांगितलीच पाहिजे. नाहीं तर तो गोडबोले —

८–३० : क्लबमधून घरीं येतांच पोरांच्या कटकटी नि तक्रारी सुरू. जीव वैतागून जातो. तशीं माझीं मुलं हुषार आहेत. पण माझा सल्ला तीं मनावर घेत नाहींत. हीं आजकालचीं पोरं. आमच्या वडिलांच्या वेळीं त्यांच्यासमोर एक चकार शब्द काढण्याची आमची छाती नसे —

९ : हेडक्लार्कसाहेबांच्या घरीं गंजिफा खेळून —

१०–३० : दिवसभराच्या श्रमानें अंथरुणावर अंग टाकतांच निद्रादेवी प्रसन्न !

## पित्याचा दैनिक कार्यक्रम

(मुलाच्या रोजनिशींतील उतारा)

आणि आतां मुलांच्या दृष्टीनें त्याच कार्यक्रमाकडे पहा.

६–३० : सूर्याच्या आधीं उठून घरांतील शांततेचा भंग करतात. या म्हाताऱ्यांना झोंपच कशी येत नाहीं ?

७ : चहासाठीं ओरडाओरड व आदळआपट. जणूं चहाखेरीज डोळ्यांत प्राण गोळा झालेत !

७–३० : सुखाच्या साखरझोपेंत मग्न असणारांवर एकाद्या महाभारत-कालीन योद्धयाप्रमाणें तुटून पडतात.

८ : भाजी आणण्याच्या निमित्तानें गांवभर 'भ्रमंति' करण्यासाठीं स्वारी घराबाहेर पडते.

८–४५ : मंडईहून येतांना त्या रामभाऊंच्या दुकानीं फुकट ज्ञान-प्रकाशाबरोबरच चार फुकटे वाचक जमवून राजकारणावर जंगी 'चर्चा' करतात. एकाद्या खेडवळाला वाटेल, पुण्याचे पुढारी तात्या केळकर म्हणतात ते हेच —

९–३० : मंडईची झोळी आईपुढें आपटून त्या जड ओझ्याबद्दल एक खरपूस व्याख्यान तिला ऐकवितात.

१० : सर्वांत उशिरानें स्नानास येऊनही पाणी गार झालें म्हणून पोरांना शिव्या देतात. एरव्हीं त्यांचा मोठेपणा कसा दिसणार ?

१०–३० : स्वयंपाकांत हजार खोडी काढीत, पण प्रत्येक पदार्थावर यथेच्च हात मारीत जेवण चालतें.

११ : ऐटींत टांग्यांत बसून कचेरीला जातात. आम्हांला मात्र शाळेंत तंगड्या तोडीत पाठवितात हं !

११–३० : ऑफिसमध्यें जाऊन शिपाईपोरांवर कातावतात. टेबला-वरचें काम हाताखालच्या लोकांत वांटून आपण तण्णावून देतात —

१ : हेडक्लार्कच्या खोलींत जाऊन इतर सहकारी कारकुनांच्या चहाड्या निवेदन करून त्यांची मर्जी संपादन करण्याची धडपड करतात.

३ : इतर कारकुनांनीं केलेल्या कामांत नसत्याच शुद्धलेखनाच्या चुक्या काढतात व आपण फार काम केलें असें दर्शवितात.

४ : भटजीच्या राजभुवनांत चहा-चिवडा-भजीं चापतात. आम्हांला मात्र हॉटेलांत न जाण्याबद्दल नेहमीं व्याख्यानें ऐकवितात.

५ : पांचच्या ठोक्याआधींच सर्व कामें दप्तरांत बांधून ऑफिसमधून बाहेर पडतात.

५–३० : घरीं आल्यावर आपण ऑफिसला गेल्यामुदतींत तेंच काम कां केलें नाहीं, हेंच काम कां केलें नाहीं, म्हणून साऱ्यांचा उद्धार करतात.

६ : व्यायामाच्या नांवाखालीं क्लबांत जाऊन बसतात.

७ : ब्रिज खेळतांना छपन्न चुक्या करतात, पण आपण किती उत्तम खेळलों त्याचें रसभरित वर्णन घरीं सांगण्याचा बेत ठरवितात.

८–३० : मीं साहेबाला असा झाडला, क्लबांत त्या गोडबोल्याला चीत मारला, वगैरे वीररसप्रधान अद्‌भुत गोष्टी जेवतांना सांगतात. हंसलें किंवा मधें कोणी कांहीं बोललें कीं भरलींच त्याचीं शंभर वर्षें!

९ : हेडक्लार्कसाहेबांच्या घरीं दशावतारांची दशा करून—

१०–३० : घरीं आल्याबरोबर लौकर झोंपण्याच्या आवश्यकतेवर एक व्याख्यान देऊन घरांतील सगळे दिवे मालवून जोरानें घोरूं लागतात.

जय अलख निरंजन!

—इंग्रजी कल्पनेवरून

# एका वर्तमानपत्राचें मत

मराठी वर्तमानपत्रें सध्यां बहुतांशीं ज्या लोकांच्या तावडींत सांपडलीं आहेत, त्यांच्या 'विद्वत्ते' विषयींची माझी आदराची भावना सारखी वाढत राहावी म्हणून कांहीं दैनिकें व साप्ताहिकेंही कंबर कसून प्रयत्न करीत असावींत असा मला केव्हां केव्हां संशय येतो. ह्या संशयाचें रूपांतर खात्रींत करण्यास कारण होणाऱ्या कांहीं मासलेवाईक संपादकीय हातचलाख्यां-पैकीं एक नमुना या लेखांत देत आहें. मराठींतील स्वतःला नमुनेदार वर्तमान-पत्र समजणाऱ्या एका दैनिकाच्या एकाच तारखेच्या अंकांत आलेले दोन उतारे मी खालीं देत आहें.

उतारा नं० १

## अपूर्व थाटामाटाचा अभिनंदनीय विवाह

येथील 'आर्यावर्तोद्धारक नित्योपयोगी वस्त्वालय' नामक किराणा मालाचे दुकानदार श्री. रा. रा. बाबूराव खंडेराव मराठे यांच्या द्वितीय कन्या सौ. कां. गोदूताई यांचा विवाह खानदेशकडील एक प्रसिद्ध वकील रा. वासुदेवराव चितळे, बी.ए., एल्‌एल्‌.बी. यांचे चतुर्थ चिरंजीव रा. रा. प्रभाकरपंत यांचेशीं गेल्या रविवारी रविवारांतल्या धर्मशाळेंत अत्यंत थाटा-माटानें पार पडला. या समारंभासाठीं धर्मशाळेच्या विस्तीर्ण चौकांत भव्य शामियाना उभारण्यांत आला असून शामियानाचें काम येथील 'लग्न-मंडप बांधणार आणि मंडळी' चे प्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर रा. विसुभाऊ ढोले यांनीं प्रेक्षणीय केलें होतें. शामिनान्याच्या आंतील दर्शनी बाजूस किनखापी कापड लावलें होतें व दोन खांबांमध्यें रेशमी पडद्याच्या शोभिवंत झालरी

सोडल्या होत्या. छताला ठिकठिकाणीं हंड्या-झुंबरें लावून त्यांमधून सर्वत्र निरनिराळ्या रंगांचे विद्युद्दीप खेळविले असल्यामुळें मंडपांत चहूंकडे मनोहर रंगीबेरंगी प्रकाश-शलाका प्रेक्षकांच्या डोळ्यांना आनंदवीत होत्या. प्रवेशद्वारांत एक नंबरचा बॅंड सुस्वर आलाप काढीत निमंत्रित पाहुण्यांचें सुस्वागत करीत होता. त्याच्यामागें देशी ताशावाजंत्रीही 'वाजवा' 'वाजवा' या आरोळींची अधीरतेनें वाट पाहात होता. मंडप खूप विस्तीर्ण असूनही माणसांनीं फुलून गेला होता. गांवांतील बडी बडी व प्रतिष्ठित मंडळी समारंभास उपस्थित होती. नवपरिणित जोडप्याचें निमंत्रितांना दर्शन व्हावें म्हणून उच्चस्थानीं एका किंमती कोचावर उभयतां पतिपत्नीला बसविलें होतें. त्यांना लग्नांत मिळालेल्या बहुमोल आहेरांचा ढीग समोरच मांडून ठेवला असून त्यांत सारखी नवी भर पडत होती. आहेरांत सोन्या-चांदीच्या विविध वस्तु व भरजरी रेशमी वस्त्रेंही दिसत होतीं. पुष्कळ पाहुण्यांचें, विशेषतः समारंभास आलेल्या स्त्रियांचें, लक्ष वधू-वरापेक्षांही आहेराच्या प्रदर्शनाकडेच अधिक ओढ घेत असल्याचा अनभव येई! या लग्नाचा प्रमुख अभिनंदनीय विशेष हा कीं, वधू व वर दोघेंही सुशिक्षित (वधू इंग्रजी तिसरींत आहे व वर कॉलेजमध्यें इंटरच्या क्लासांत गेले आहेत असें कळतें.) असूनही अलीकडील हुच्च नवमतवादी कॉलेजिएटप्रमाणें त्यांनीं वृद्ध मंडळींच्या मताविरुद्ध वागण्याचा आचरट हेका न धरतां जुन्या समजुतीप्रमाणें विड्या तोडणें, सुपारी हुडकणें वगैरे बारिकसारिक धार्मिक चालीसुद्धां यथासांग पाळल्याबद्दल त्यांचें जो तो कौतुक करीत होता.

लग्नाची वरातही थाटामाटानें घोड्यावरून काढण्यांत आली. वरातीच्या वेळीं अडीचशें रुपयांचें दारूकाम उडविण्यांत आलें. शंभर किटसन्चे दिवे वरातीबरोबर चालले होते. वरातीचा अपूर्व सोहळा पाहण्यास सारा गांव लोटला होता. गेल्या पांचसात वर्षांत या गांवांत असा लग्नसोहळा आणि अशी वरात कोणाच्या पाहण्यांत नाहीं असें जो तो म्हणत होता.

दुसऱ्या दिवशीं लग्नाच्या मेजवानीचा बेतही एकंदर समारंभास साजेसाच होता. सव्वा हात लांब केळीचें पान निरनिराळ्या पदार्थांनी भरून जाईल असा केलेला थाटाचा बेत व पंचपक्वान्नांची योजना पाहून पुष्कळांना पेशवाई रमण्याची सुखद आठवण झाल्यावांचून राहिली नाही.

या अपूर्व थाटामाटाच्या व श्रीमंती बाण्याच्या लग्नसोहळयानें रा. मराठे यांचें नांव गांवांत ज्याच्या त्याच्या तोंडीं बहुत काळ गाजत राहील यांत शंका नाहीं. आपल्या उदारपणानें व दिलदार वृत्तीनें त्यांनीं गांव-कऱ्यांना एक अनुकरणीय धडाच घालून दिला आहे हें कोणीही कबूल करील.

आतां त्याच पत्रांतील दुसरा उतारा पहा.

उतारा नं० २

## अनुकरणीय विवाहसमारंभ

येथील सुप्रसिद्ध पेन्शनर गृहस्थ रा. सा. बाळकृष्णपंत ऊर्फ अण्णा-साहेब करंदीकर यांचे एकुलते एक चिरंजीव रा. रा. विश्वनाथराव ऊर्फ भय्यासाहेब करंदीकर यांचा विवाह वऱ्हाडचे एक श्रीमान् रईस रा. रा. अच्युतराव देशपांडे यांच्या कन्या सौ. कां. मालतीबाई यांच्याशीं गेल्या सोमवारीं येथील टिळक हॉलमध्यें झाला. या समारंभाचा अनुकरणीय प्रमुख विशेष हा कीं, वधू व वर या दोन्ही पक्षांची मंडळी चांगली घरंदाज व सधन असतांही लग्नसमारंभांत नेहमीं होणारा अनाठायीं खर्च करून बडेजाव दाखविण्याचा मोह उभय पक्षांनींही आवरला हें अभिनंदनीय आहे. सर्व समारंभ अत्यंत साधेपणानें व अतिशय थोड्या वेळांत उरकल्यानें समा-रंभास सुटसुटीतपणा व आटोपशीरपणा आला होता. जुन्या पद्धतीच्या विवाहसमारंभामधून होणारी अव्यवस्था व नासधूस तर त्यामुळें वांचलीच, पण राष्ट्राच्या सध्यांच्या बिकट परिस्थितींत निष्कारण होणारा काळ, शक्ति व पैसा यांचा अनाठायीं अपव्ययही टळला. विवाहविधीपैकीं धार्मिक दृष्ट्या अत्यंत जरूरीच्या होम, सप्तपदी यांसारख्या अपरिहार्य गोष्टी तेवढ्याच विधिपूर्वक करून रूढीनें माजवलेल्या फाजील पसाऱ्याला संपूर्ण फांटा देण्यांत आला होता. इतकेंच नव्हे तर आहेराची पद्धतही नव्या रीतीची म्हणजे दानवस्तुऐवजीं रोकड रुपये घेण्याची योजना केल्यानें आहेराच्या तादृश्य निरुपयोगी वस्तूंचा जो गळाठा विवाहानंतर वधूवरांकडे सांठून राहतो, तसें होण्याचा संभव उरला नाहीं. हिंदूंच्या धार्मिक विधींत विधर्मी बँड अगर मुसलमान ताशावाजंत्री आणण्याचा विचारही असाच दूर सारण्यांत

उभय पक्षांनीं स्तुत्य मनोधैर्य दाखविलें. वरातीसारख्या विनाकारण गांव-दंगा माजविणाऱ्या निरुपयोगी कार्यक्रमावर कडकडीत बहिष्कार घालून एका अनिष्ट प्रथेला पायबंद घालण्यांत आला. भोजनसमारंभ हा तर आपल्या विवाहपद्धतींत अत्यंत महत्त्वाचा व तितकाच गैरव्यवस्थेचा कार्यक्रम. पण हा कार्यक्रमही प्रस्तुत विवाहांत अत्यंत व्यवस्थेशीरपणें व आटोपशीरपणें पार पाडण्यांत आला. अशा वेळीं अति पदार्थ करण्यानें जी नासधूस होते ती टाळण्यासाठीं मोजकेच पण सुग्रास पदार्थ करण्यांत आले होते व जेवतांना कोणासही आग्रह न करण्याची विलायती पद्धत स्वीकारल्यामुळें भोजन-समारंभ गोड झाला.

एकंदरीनें पाहतां आजच्या बदलत्या कालमानाप्रमाणें आपल्या विवाहपद्धतींत इष्ट त्या सुधारणा घडवून आणण्यांत रा. करंदीकर व रा. देशपांडे या प्रतिष्ठित घराण्यांनीं जें नीतिधैर्य दाखविलें तें व्यक्तिशः त्या उभयतांना भूषणावह आहे; इतकेंच नव्हे तर इतरांनाही त्यांचें उदाहरण अनुकरणीय आहे. या साधेपणाबद्दल गांवांत सर्वत्र या विवाहसमारंभाचें कौतुक होत असल्याचें कळतें.

एकाच वर्तमानपत्राच्या एकाच अंकांत प्रसिद्ध झालेले हे दोन उतारे वाचून विवाहसमारंभाबद्दल त्या पत्राचें नक्की मत काय होतें हें जो कोणी बरोबर सांगेल त्याला 'जरनॅलिझम्'चें शिक्षण घेण्यासाठीं मी अमेरिकेस पाठवून देण्यास तयार आहें!

# चहाच्या कपाला पैसा !

ह्या लेखाच्या "चहाच्या कपाला पैसा !" या मथळ्यानें माझ्या ज्या वाचकांचा कांहीं गैरसमज होईल, त्याच्याबद्दल मी अगाऊच जाहीर सहानुभूति व्यक्त करितों. हल्लींच्या आर्थिक मंदीच्या काळांत कपभर तांबड्या पाण्याला खाडकन् तीन पैसे घेणाऱ्या उपहारगृहांशीं स्पर्धा करण्याच्या हेतूनें कांहीं "चहाच्या कपाला पैसा !" घेणारें नवें हॉटेल कोठें उघडण्याचा माझा इतक्यांतच विचार नाहीं ! केवळ एका घरगुती प्रसंगाचें निवेदन वाचकांना करण्याच्या उद्देशानेंच मी पेन चालवीत आहें.

आजच्या रविवारचीच ही गोष्ट आहे. त्यामुळें ताज्या भज्यांसारखी ही गोष्टही गरमागरम आहे; पण ती वाचून माझ्या पुरुषवाचकांनीं मात्र 'गरम' होऊं नये.

इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत स्थापन झाल्यापासून आपले जे कांहीं फायदे झाले आहेत, त्यांत सरकारी नोकरांना मिळणारी रविवारची सुटी हा सर्वांत मोठा फायदा आहे, असें माझें प्रामाणिक मत आहे. मिळालेल्या या सुटीचा उपयोग, पेशवाईत अशी सुटी होती किंवा कसें, या निरर्थक गोष्टीचा छडा लावीत बसण्यांत न करतां, मी मंडळी जमतील त्याप्रमाणें ब्रिज, सहा जणांचें लॅडिस, गद्धेकोट वगैरेंचा यथेच्छ समाचार घेण्याकडे करीत असतों.

गद्धेकोटाचा अखेरचा डाव 'मारून' व मित्रमंडळींना निरोप देऊन रात्रीं साडेआठ वाजतां जो मी स्वयंपाकघरांत गेलों, तों बाईसाहेब वाफ सोडणाऱ्या इंजिनाप्रमाणें फुसफुसत होत्या. बायको रागावलेली पाहिली कीं, नवरोजींच्या छातीचे ठोके 'डबल स्पीड'नें क्विक् मार्च करूं लागतात, हा अनुभव साऱ्या विवाहित पुरुषांना आहेच.

धडधडणारी छाती हातांनीं दडपीत मीं विचारलें:

"कां? आज रागावलांतशा? कांहीं चुकलं वाटतं आमच्याकडून?"

या माझ्या घाबरट प्रश्नाला 'तिकडून' फणकाऱ्यानें उत्तर मिळालें:

"छे, तुमचं काय चुकणार? माझंच चुकलं तुमच्याशीं लग्न केलं तें." स्लो बोलरची डिलिव्हरी बॅट्समननें क्षणांत बाउंडरीला पाठवावी, तशीं हीं प्रश्नोत्तरें मला वाटलीं.

"सगळ्याच विवाहित बायकांची ती चूक होते म्हणा!" मीं हळूच म्हटलें. रखवालदाराच्या दंडक्याच्या हाताकडे नजर ठेवून एकादा पोऱ्या दबकत दबकत बागेंत शिरतो ना, तसें. "पण मीं विचारलें असें कीं, आपल्याला रागवायला कारण तरी काय झालं तसं?"

"कारण?"

एवढेंच म्हणून तिनें माझ्याकडे रागानें डोळे वटारून पाहिलें. चुलींतील दोन रशरशीत निखारे काढून भाताच्या झांकणावर ठेवावेत, तसें मला झालें!

सौभाग्यवती ताडकन् उठली. मी झटकन् दोन पावलें मागें सरकलों!

गृहलक्ष्मीनें मोरीजवळच्या कोपऱ्यांतून कायसें उचललें आणि दाणकन् माझ्या पायापाशीं आणून आदळलें.

मीं पाहिलें —

एका ताटांत चहाचा ओला चोथा सांठविला होता. चोथ्यानें जवळ जवळ सगळें ताट भरून गेलें होतें. पण माझ्या आजवरच्या सांगण्याप्रमाणें हा चहाचा चोथा तुळशीच्या कुंडींत न टाकतां, सोन्याच्या मोलानें इतका जपून ठेवण्याचें कारण मात्र मला कळेना! मीं प्रश्नार्थक चेहरा करून सौभाग्यवतीस विचारलें:

"हा गाळ रोजच्या रोज तुळशींत कां नाहीं टाकलास? तें काय केशर आहे इतकं जपून ठेवायला आठवडेच्या आठवडे?"

"आठवडेच्या आठवडे?" पत्नी उसळून ओरडली. पॉवर कमी कमी घेऊं लागणाऱ्या मोटरच्या इंजिनांत पेट्रोल सोडावें, तसा माझ्या बोलण्याचा तिच्यावर परिणाम झाला. "हा सारा चोथा आजच्या एका दिवसांत उकळलेल्या चहाचाच आहे, बरं! मेला दिवसांतून पन्नास वेळेला चहा करायला सांगायचा! कोण मेले सोळभोक आयता चहा गिळायला येतात!

कुणी नव्यानें आला कीं, पुन्हां सगळ्यांची आपली तयारी चहा ढोसायला. फुकटचा मिळत असल्यास कोण कमी करणार म्हणा ! पण मी म्हणतें, छपन्न वेळां चहा करायला हुकूम सोडणाऱ्या घरच्या पुरुषांना नको का कांहीं अक्कल ? एकटी बायको मी घरांत. रोजचं घरकाम सांभाळून हा चहाचा आणि रामरगाडा किती मेला आवरायचा तरी ? आधण ठेवण्यापासून चहा प्यालेल्या कपबशा विसळण्यापर्यंत तेंच तेंच काम दिवसांतून करायचं तरी किती वेळ मेलं माणसानं ? "

" बायकांना अतिशयोक्ति करायची संवय असते; असा दिवसांतून किती वेळ चहा करायला सांगितला मीं ग ? फार तर चारपांच वेळ झाला असेल. पण त्याचें हें किती करावं ? "

" काय ? चारपांच वेळ ? सकाळीं स्वत:साठीं एकदां, अनंतराव आले तेव्हां दुसऱ्यांदां, डॉक्टर आले ती तिसरी खेप. पुन्हां दुपारीं दोनपासून रात्रीं आठपर्यंत कमींत कमी चार वेळेला, वेळेला सहा सहा आठ आठ कप चहा करावा लागतो. कांहीं आहे खातर ? एकदां चहा करून पहा न् त्याचे सारे सोपस्कार निस्तरा म्हणावं, म्हणजे कळेल काय माझी अवस्था होत असेल ती ! रविवार म्हणजे माझा मरणकाळ जणूं ! "

आणि गृहिणीनें स्फुंदून स्फुंदून रडण्यास सुरुवात केली ! मरणकाळची आठवण झाली कीं, बायकांना रडें आलेंच म्हणून समजावें ! पण माझ्या बायकोच्या रडण्यानें मात्र माझा मरणकाळ जवळ आल्यासारखें मला वाटूं लागलें.

नायिकेला क्लायमॅक्सपर्यंत आणल्यानंतर नाटक लौकर संपविण्याची ओढ कर्त्यास लागते, तसें मला झालें. मीं किंचित् आर्जवी आवाजांत म्हटलें:

" पण तुला जर असा त्रास होतो, तर तूं मला तसं कां नाहीं सांगितलंस ? मी समोरच्या ' चंडिकाभुवनां 'तून चहा आणण्याची व्यवस्था नसती का केली ? "

" आजपर्यंत कितीदां तरी आपल्या कानीं ओरडा केला आहे, पण कधीं दिलं का लक्ष तिकडे ? म्हणून तर शेवटीं आज सकाळपासूनचा चहाचा चोथा ठेवला गोळा करून दाखवायला. म्हणे चंडिकाभुवनांतून

आणीन चहा. आणून पहा एक दिवस. चाळीसपन्नास कप चहा फुकट करून घ्यायला चंडिकाभुवनांत कांहीं तुमची बायको नाहीं म्हटलं ! तिथं अडीचतीन रुपये ठाणकन् मोजावे लागतील. मग कळेल बायकोचं महत्त्व."

माझ्या कांतेच्या या उद्‌गारांनीं माझ्या मनांत वेगळीच एक कल्पना चमकून गेली. खरंच, घरीं बायकोला वरचेवर चहा करायचें फर्मान सोडणाऱ्या नवरोजींना जर हॉटेलांतून चहा आणावा लागेल, तर खास त्यांच्या चहापानाला आपोआप मर्यादा पडेल. घरीं रिकाम्या मित्रांचा अड्डा जमवून पत्ते, कॅरम, गंजिफांचा समाचार घेतां घेतां चहाचे पेल्यांवर पेले झोकणाऱ्या क्लबच्या मुख्यालाही आपली आतिथ्यतत्परता पायबंद करावी लागेल, आणि एरव्हीं बिनहिशेबीपणामुळें चहाच्या पाण्यापायीं माझ्यासारख्या मध्यम स्थितींतल्या गृहस्थाच्या खिशांतले जे पैसे न कळत खर्च होतात, त्यालाही थोडा आळा बसेल, आणि घरच्या बायकांची दगदग कमी होऊन त्यांना थोडी तरी विश्रांति आणि स्वस्थता मिळेल !

हा सारा विचार मनांत येऊन मला ओशाळल्यासारखें झालें. खरोखर आपण रोजच्या घरगुती व्यवहारांतही किती अविचारी बेफिकीरपणानें वागतों !

थोडा वेळ थांबून मीं पश्चात्तप्त स्वरानें म्हटलें :

"तूं म्हणतेस त्यांत पुष्कळच तथ्य आहे. आजवर हा विचारच माझ्या नाहीं आला ध्यानांत. पण जाना देव ! यापुढें आपण चूक दुरुस्त करूं. उद्यांपासून ही रिकामटेकड्या दोस्तांची बैठक बंद करून टाकतों. मग घरांत तून् मी राजाराणी."

वाचिक कां होईना, पण मिळालेल्या या 'राणीपदप्राप्ती'मुळें माझी प्रिया खुदकन् हंसली. ती किंचित् लाजत म्हणाली ! :

"इश्श, कुठली गोष्ट कुठं भिडवणं ? आपल्याकडे कुणी मित्रमंडळी येऊं नयेत असं का मीं म्हटलं ? चहाचीं फर्मानं थोडीं बेतानं सोडावींत इतकंच माझं म्हणणं."

"पण मंडळी आली कीं मला कांहीं हा विवेक नाहीं राहायचा. इतक्या दिवसांची संवय 'जा' म्हटल्यानं कशी जाणार ?"

"त्याला एक उपाय आहे. सांगूं ?"

"हं ! "

"प्रत्येक चहाच्या कपाला एक पैसा करणावळ म्हणून आपण मला देत जावा. रोज रात्रीं जेवणापूर्वी आपण मला चहाच्या करणावळीचा हिशेब चुकता द्यावा. खिशांतून रोज असे पैसे काढून देण्याचा प्रसंग आला कीं, इतक्या दिवसांची संवय कशी चुटकीस जाते पहा. हे पैसे मात्र माझ्या कमाईचें स्त्रीधन हो ! नाहीं तर जरूर लागली कीं घ्याल परत मागून."

पुन्हां माझी भार्या रम्यपणें हंसली.

तें पाहून मीही हंसलों व म्हटलें —

"बरं कबूल. ठरलं आपलं कॉन्ट्रॅक्ट. चल."

# एक सत्कारसमारंभ

'अखिल ठणठणपूर तालुक्याचें मुखपत्र' अशी बिरुदावली शिरावर धारण करणाऱ्या 'अनृतहारी' पत्राचे संपादक श्री. बळवंतराव टकळे यांना हल्लींच साऱ्या तालुक्याचें पुढारीपण घेऊन जनतेचें लक्ष आपणांकडे वेधून घेण्याची हांव सुटली होती. पुण्याचे प्रख्यात पुढारी कै. बळवंतराव टिळक यांच्या व आपल्या नांवांत बरीचशी एकरूपता आहे, ते जसे केसरी पत्राचे संपादक होते तद्वत् आपणही अनृतहारी पत्राचे संपादक आहोंत, या दोन गोष्टींत जर टिळकांत व आपल्यांत साम्य आहे, तर, दोन त्रिकोणांतील प्रत्येकीं दोन कोन जर सारखे असतील तर तिसरा कोनही सारखा असलाच पाहिजे या इंग्रजी पांचवींत असतांना शिकलेल्या भूमितीच्या सिद्धांताप्रमाणें, टिळकांप्रमाणें आपणही पुढारी झालेंच पाहिजे असा हिशेब श्री. बळवंतराव टकळे यांनीं आपल्या मनाशीं बांधला; आणि ठणठणपूर तालुक्याचें पुढारीपण संपादण्याच्या मोहिमेवर स्वारी निघाली!

अनिवार आत्मप्रसिद्धि करण्याचें एकादें तरी सुलभ साधन खिशांत असल्याखेरीज हल्लींच्या काळांत कुणालाच पुढारीपण मिळत नाहीं हें बळवंतरावांच्या धूर्त बुद्धीनें तेव्हांच हेरलें. पण सुदैवानें घरचें अनृतहारी साप्ताहिक बळवंतरावांच्या एकमेव मालकीचें असल्यामुळें तो कांहीं फारसा बिकट प्रश्न नव्हता. अडचण होती ती इतकीच कीं, अनृतहारी हें उदात्त नांव धारण करणाऱ्या या साप्ताहिकाचा गेल्या तीन वर्षांचा अनृतवादी उज्ज्वल (?) इतिहास लोकांच्या स्मरणांतून कसा नष्ट करावयाचा? श्री. टकळे हे बुद्धिमत्तेच्या दृष्टीनें मृच्छकटिकांतील शकाराच्या 'पत्रावळीएवढ्या मोठ्या

घराण्याशीं ' सोयरिक सांगणारे असल्यामुळें यांच्या अनृतहारीचा दर्जा सालो-मालोच्या अभंगापेक्षां फारसा श्रेष्ठ नव्हता. चार दुकानदारांकडे सतरा खेटे घालून मिळविलेल्या कांहीं (फुकटच्या) जाहिराती, नवराबायकोच्या पाटाच्या नोटिसा, आठवड्याचे राशी फिरवून दिलेलें कायम भविष्य, इहवृत्त, वर्तमानसार इत्यादि मजकूर देऊन उरलेल्या वीत दीड वीत जागेंत ' बायकोनें नवऱ्यास मारिलें ', ' एका नवऱ्यास सत्तावीस बायका ', ' एका गांवांत एका बाईस रेडकूं झालें ', वगैरे अत्यंत चटकदार व चित्ताकर्षक (संपादकांच्या मतें) मजकूर दर आठवड्यास अनृतहारीमध्यें बिनचूक येत असे. अर्थातच या पत्राचा तडाखेबंद खप हॉटेलें, सलून्स, पानपट्टीवाले, टांगेवाले व क्लीनर-ड्रायव्हर लोक यांतच फार होता हें सांगणें नकोच. उरलेल्या शिलकी प्रती समोरच्या भाजी मंडईंतील किराणा मालाच्या दुकानांत रद्दी म्हणून रवाना होत असत.

पण कसल्या का होईना एका वजनदार (येथें संपादकाचा व इतरे-जनांचा प्रामाणिक मतभेद होणें स्वाभाविक आहे.) वर्तमानपत्राचे आपण संपूर्ण संस्थापक, संचालक व संपादक आहोंत या आत्मगौरवाच्या भावनेनें बळवंतरावांना पछाडलेलें असल्यामुळें समाजांत ते जरा ' पोझिशन 'नें (!) वागण्याचा प्रयत्न करीत. जुनाच का होईना पण चढाव घातल्यावांचून ते घराबाहेर पडत नसत. एका म्हाताऱ्या बारगिराची फाटकी सुरवार रफू करून घेऊन तीच पेहेरण्याची पद्धत त्यांनीं ठेविली होती. पिवळ्या शर्टवर तांबडा डबल ब्रेस्टचा कोट व डोक्यावर साहेबी ' घमेलं ' घातलेलं, अशा परिवेषांत बळवंतराव ठणठणपूर गांवांत हिंडूं लागले कीं, आफ्रिकन् नेटिव्ह रहिवाशासारखे शोभत. ' सुंदर तें ध्यान ' पाहून गांवांतील पोरें आपली करमणूक करून घेत व प्रतिष्ठित लोक तोंडाला उपरणीं लावून आपलें हंसूं पड्याआड करीत. पण बळवंतरावांची मात्र प्रामाणिक समजूत होती कीं, लोक आपल्या ' झकास ' पोषाखावर एकदम खूष आहेत !

आपण फार ' इंटिलिजंट ' आहोंत अशी बळवंतरावांची कायमची कल्पना होती. " महाराष्ट्रांत माझ्याइतका इंटिलिजंट माणूस वर्तमान-पत्राच्या धंद्यांत पडल्याचं दुसरं उदाहरण नाहीं " असें ते स्वतःहूनच प्रत्येक नव्या ओळखीच्या माणसाला बजबजावून सांगत असत. हरेक महत्त्वाच्या

कामीं जिल्ह्याचे कलेक्टरसाहेब आपली सल्लामसलत घेतल्यावांचून राहात नाहींत असेंही लोकांना वारंवार सांगण्यास ते कधीं चुकत नसत. पण बळवंतरावांचे हे आत्मप्रसिद्धीचे स्टंट्स् वारंवार ऐकलेल्या लोकांच्या हें ध्यानीं येत नसे कीं, एवढा इंटेलिजंट व कलेक्टरला सल्लामसलत देण्याच्या योग्यतेचा महापुरुष ठणठणपूर गांवांत प्रतिष्ठित व विद्वान् म्हणून गणल्या गेलेल्या लोकांत बसला उठलेला कधींच कसा दिसत नाहीं ? बळवंतरावांचे नेहमींचे बसण्याचे अड्डे म्हणजे सदू पानपट्टीवाल्याचें दुकान किंवा सोपाना न्हाव्याचें सलून हेच होत. आणि बळवंतरावांचे सारे जानी दोस्त याच दर्जाच्या लोकांत होते. लक्ष्मीधराचा धैर्यधराशीं जसला स्नेह होता, तसलीच दोस्ती बळवंतरावांची व गांवांतील सज्जनांची होती !

बळवंतरावांचें गतायुष्य या प्रकारचें असल्यामुळें त्यांच्या अनृतहारी हें अगडबंब नांव धारण करणाऱ्या पत्राची स्थिति नांव हिराबाई आणि हातीं कोळशाची टोपली अशी होती. आतां ठणठणपूर तालुक्याचें पुढारीपण मिळवावयाचें म्हणजे नाहीं म्हटलें तरी प्रतिष्ठित व विद्वान् लोकांची सहानुभूति थोडीफार तरी संपादणें अवश्य होतें. ती संपादण्याचा एक मार्ग या दृष्टीनें बळवंतरावांनीं आपल्या वर्तमानपत्राच्या ऑफिसांत एक सत्कारसमारंभ घडवून आणण्याचें ठरविलें.

ठणठणपुरांत पंडित राधाकिसन प्रसाद हे एक नाणावलेले संस्कृतज्ञ विद्वान् होते. त्यांच्या विद्वत्तेचा बोलबाला सर्व देशभर झाला होता. काशीच्या पंडितांना वादांत जिंकून विजयी होऊन पंडितजी नुकतेच गांवीं परत आले होते. या त्यांच्या अपूर्व विजयाबद्दल गांवांत ठिकठिकाणीं सभा भरवून त्यांचें अभिनंदन करण्यांत येत होतें.

बळवंतरावांच्या अनुकरणबुद्धीनें ही पंडितजींच्या सत्काराची कल्पना उचलली व सत्कारसमारंभाच्या निमित्तानें तरी गांवांतले चार सभ्य व वजनदार नागरिक अनृतहारीच्या ऑफिसांत पायधूळ झाडतील तर तिचें आपण जाहिरातीच्या किमयेनें सोनें करून विकूं व पुढारीपणाचा पाया घालूं अशी मोहक कल्पना त्यांनीं मनाशी रंगविली.

पंडितजींचा एक मित्र बळवंतरावांच्या ओळखीचा झाला होता. सोपानाच्या दुकानीं दाढी करण्यास तो गृहस्थ येत असे. तेथेंच बळवंतरावांशीं

त्याची जानपछान झाली. पुढें बरेच वेळां अनृतहारीमध्यें त्याचा ब्लॉक छापून बळवंतरावांनीं त्याची मैत्री वाढविली. हा मैत्रीचा मामला कांहींसा देवाणघेवाण स्वरूपाचा होता. दलपतरामभाई पक्का बनिया गृहस्थ. तो कोणास मोबदल्यावांचून मैत्री देखील देणारा नव्हता. दर वर्षी दिवाळीच्या सुमारास तो व्यापारी कॅलेंडर काढीत असे, त्यावर छापण्यासाठीं त्यानें स्वतःचा एक ब्लॉक करून घेतला होता. एकदां कॅलेंडर छापून झाल्यावर पुढच्या दिवाळीपर्यंत ब्लॉक बासनांत बांधून ठेवण्याचा प्रसंग येत असल्यानें अशा प्रकारें आपला 'माल' वर्षभर 'फुकट' पडून राहणें दलपतभाईच्या बनियेगिरीस रुचेना; म्हणून त्यानें तो ब्लॉक अनृतहारींत छापण्यासाठीं बळवंतरावांकडे दिला. बळवंतरावांनाही आपलें साप्ताहिक 'सचित्र' करण्याची हौस होतीच, त्यांनीं हा ब्लॉक इतके वेळां छापला कीं, एकच ब्लॉक सारखा छापीत राहण्याचें जागतिक रेकॉर्ड अनृतहारीनें केलें आहे असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे; आणि हा ब्लॉक छापण्यास बळवंतराव कारणेंही मोठीं मासलेवाईक शोधून काढीत. दलपतरामभाईंच्या व्याह्यांनीं एक कसलासा खटला स्मॉलकॉज कोर्टांत जिंकला, ही बातमी देण्याचें निमित्त करून अनृतहारीनें एकदां दलपतरामभाईंचा ब्लॉक छापला तर पं. राधाकिसन काशीला गेले तेव्हां त्यांना स्टेशनवर निरोप देण्यासाठीं म्हणून दलपतरामभाई हजर होते या निमित्तानें त्या ब्लॉकचा उपयोग करण्याची आणखी एक सुंदर संधी बळवंतरावांनीं साधली !

दलपतराम आणि बळवंतराव यांचे संबंध अशा प्रकारें प्रेमाचे असल्यामुळें त्यांच्यामार्फत पंडितजींना सत्कारसमारंभासाठीं अनृतहारी पत्राच्या कचेरींत रविवारीं सकाळीं नऊ वाजतां आणण्याचें मुक्रर झालें. समारंभासाठीं बळवंतरावांनीं सोपानाकडील खुर्च्या आणल्या. रविवारचा सुटीचा दिवस असल्यानें खुर्च्या नसल्यास आपली गिऱ्हाइकी बुडेल म्हणून त्यानें प्रथम तक्रार केली. पण समारंभास व्यासपीठावर उपस्थित असलेल्या बड्या लोकांत तुझें नांव छापतों असें आश्वासन मिळाल्यावर त्याची समजूत पटली, व मग त्यानें दाढी करतांना गिऱ्हाइकांची मान टेकण्यासाठीं केलेल्या दांड्यासकट सर्व खुर्च्या बळवंतरावांना दिल्या.

सत्कारसमारंभानंतरच्या अल्पोपाहाराचें कॉन्ट्रॅक्ट एका हॉटेलवाल्यास

देऊं करून बळवंतरावांनीं त्याच्याकडून एक जुनाट जाजम आणलें. त्या जाजमावरील शाईचे डाग आणि फाटकीं ठिगळें चुकवून जाजम कसें हांथरतां येईल तें पाहण्यासाठीं चार कंपॉझिटर्स तब्बल तासभर खटपट करीत होते. टेबलावर घालण्यासाठीं बळवंतरावांचें धोतर चालेल कीं पांघरावयाची चादरच अधिक स्वच्छ दिसेल याचा निर्णय करण्यासाठीं एक फॅक्ट्स् फाइंडिंग ऑफिसर नेमण्याची जरुरी सर्वांनाच भासूं लागली. पण इतक्यांत खुद्द पंडितजींची मोटारच दाराशीं येऊन उभी राहिल्यामुळें बळवंतरावांचें लक्ष घड्याळाकडे गेलें.

नऊ तर वाजून गेले होते. पंडितजी येऊन दाखलही झाले. पण सदतीस निमंत्रितांपैकीं एक जण तिकडे फिरकला असेल तर शपथ ! बळवंत-राव, त्यांचा मॅनेजर आणि पांचसात कंपॉझिटर एवढाच काय तो प्रचंड जनसमूह सभेला हजर होता. तेव्हां गाडी कांहीं वेळ फिरवून आणखी अर्ध्या तासानें फिरून येण्याबद्दल पंडितजींना बळवंतरावांनीं विनविलें

पंडितजींची पाठ फिरताक्षणींच बळवंतरावांनीं मॅनेजरवर आग पांखडण्यास सुरुवात केली. जणूं काय मंडळी आली नाहींत हा त्याचाच दोष. शेवटीं "मी पहा पांच मिनिटांत किती मंडळी आणतों तें ! काम करायला डोकं लागतं." अशी मॅनेजरला धमकी देऊन खुद्दांची स्वारी बाहेर पडली व पांचदहा मिनिटांतच दहाबारा लोकांसह परतही आली. त्यांत छाप-खान्यांतील कंपॉझिटर्स, सोपानाकडील पोरें व हॉटेलबॉईज् यांची भर घालून पंचवीसएक श्रोते त्यांनीं कसेबसे 'उभे' केले. नंतर मोठ्या अभिमानानें आपल्या मॅनेजरकडे दृष्टिक्षेप टाकून ते पंडितजींच्या पुनरागमनाची वाट पाहूं लागले. एकवार आपण त्यांना माघारीं दंवडलें आहे तेव्हां आतां ते परत येतील कीं नाहीं याची बळवंतरावांच्या पोटांत थोडी धाकधूक होतीच ! पण ती निराधार ठरली.

पंडितजी अर्ध्या तासानें पुन्हां आले. या खेपेस अध्यक्ष होण्याच्या तयारीनें दलपतभाईही त्यांच्याबरोबर आले होते.

बळवंतरावांनीं त्यांचें यथोचित स्वागत केल्यावर सभेस सुरुवात झाली. आपल्या हाताखालच्या नोकरांना 'शिवराळ व्याख्यानें' ऐकविण्याची जरी बळवंतरावांना संवय होती, तरी 'जाहीर सभे'त भाषण करण्याचा तो त्यांचा

पहिलाच प्रसंग असल्यानें त्यांचे पाय लटलटत होते. आवाजांत आलेला कंप लपविण्यासाठीं शक्य तितकें ओरडून बोलण्यास त्यांनीं आरंभ केला. आपल्या भाषणाला मधून मधून टाळ्या देण्याबद्दल आपल्या कंपॉझिटर लोकांना त्यांनीं अगाऊच बजावून ठेवलें होतें व मालकाची आज्ञा त्यांनीं पाळलीही छान!

बळवंतराव म्हणाले —

"बंधुभगिनींनो! आतांच माझे मित्र दलपतराम भाई हे पंडित राधाकिसन यांना घेऊन आले. ते फार विद्वान् आहेत (टाळ्या). त्यांनीं 'काशीस' जाऊन जो पराक्रम केला, त्याबद्दल त्यांचा सत्कार करणें मला कांहीं कारणांमुळें भाग पडत आहे. विद्वानाचें पाणी विद्वानच ओळखूं शकतो असें म्हणतात. पंडितजींवर मीं माझ्या अनृतहारींतून अनेक वेळां सणसणीत जोडे हाणले आहेत (टाळ्या). पण तो केवळ मतभेदाचा प्रश्न आहे. बाकी त्यांच्या कार्याबद्दल म्हणाल तर मला फार आदर आहे; परंतु त्यांचे मार्ग चुकीचे असल्यामुळें मीं त्यांचेवर टीका केली व ती अगदीं योग्य होती (हिअर हिअर). माझ्या टीकेचा परिणाम होऊन त्यांनीं आपलें वर्तन सुधारलें व म्हणूनच आज पांच पन्नास रुपयांचा पदराला खार लावून मी त्यांचा सत्कार करीत आहें! या समारंभासाठीं मीं गांवांतील पुष्कळ सभ्य व विद्वान् लोकांना बोलावणें धाडलें होतें. परंतु त्यांपैकीं कोणीही आले नाहींत. अर्थात् अनृतहारींत मी त्यांचा खरपूस समाचार घेईनच (टाळ्या). या विद्वान् लोकांचें म्हणजे असेंच असतें. ते फार आढ्यतेखोर व लोकांना तुच्छतेनें वागविणारे असतात (हिअर हिअर). आजचे आपले पाहुणे पंडित राधाकिसन हेही असेच विद्वान् आहेत. म्हणून आजच्या सभेचें अध्यक्षस्थान दलपतरामभाईनीं स्वीकारावें अशी मी विनंति करतों. त्यांचा फोटो माझ्या अनृतहारींत फार वेळां छापला आहे; यावरून ते किती जगप्रसिद्ध आहेत तें कळेलच. ते राधाकिसनसारखे विद्वान् नसतील; परंतु फार सज्जन व स्नेहाला त्यांच्यापेक्षां चांगले आहेत (टाळ्या). त्यांनीं आपला ब्लॉक अनृतहारीला फुकट दिला आहे म्हणून त्यांना अध्यक्ष करणें मला भाग आहे."

अध्यक्षांच्या प्रास्ताविक भाषणानंतर बळवंतरावांच्या आग्रहावरून त्यांचे मित्र श्रीयुत कालवार बोलावयास उठले. ते म्हणाले :

"माझे मित्र व अनृतहारी पत्राचे विद्वान् संपादक श्री. बळवंतराव यांनीं मला पंडितजींच्या गुणवर्णनपर कांहीं तरी बोलावयास सांगितलें आहे. म्हणून मी दोन्ही पायांवर नीट उभा आहें हें आपण पाहतांच आहांत. पण काय बोलावें हेंच मला कळत नाहीं. कारण त्यांच्याविषयीं मला कांहींच माहिती नाहीं. ते प्रथमच ठणठणपुरांत आले तेव्हां गांवाबाहेरील माझ्या बंगल्यांत राहात होते. पण तीन महिन्यांचें भाडें थकल्यामुळें मला नोटीस देऊन त्यांना बाहेर काढावें लागलें (टाळ्या). त्यानंतर पंडितजींची आज गांठ पडते आहे. तेव्हां त्यांच्याबद्दल मी काय बोलणार? त्यांतून काल सांगितलें असतें तर मी कोणाकडून तरी माझें भाषण लिहून आणलें असतें. पण आज सकाळीं भाजी नेण्यासाठीं म्हणून मी रोजच्याप्रमाणें मंडईत आलों तेव्हां मला चहा प्यायला म्हणून बळवंतरावांनीं ओढून आणलें आणि आतां म्हणतात सभेंत बोला म्हणून! माझें इतकेंच मत आहे कीं, पंडितजी कितीही विद्वान् असले तरी त्यांनीं लोकांचीं घरभाडीं बुडवावीत हें ठीक नाहीं, इतकें बोलून मी आपली रजा घेतों (टाळ्यांचा कडकडाट)."

या भाषणानें पंडितजी व बळवंतराव या दोघांचेही चेहरे फोटो काढण्यासारखे झाले. पंडितजी रागानें लालबुंद झाले होते तर बळवंतराव शरमेनें काळवंडले होते. हा आपला सन्मान कीं सूड, हेंच पंडितजींना कळेना. एकदम उठून तावातावानें त्यांनीं खुर्ची मागें जोरानें ढकलली, त्याबरोबर तिचा एक खिळखिळा पाय जायबंदी होऊन पडला. आपल्या आवडत्या खुर्चीची ती भयंकर केविलवाणी अवस्था पाहून समोर बसलेला सोपाना एकदम उठला व ओरडून म्हणाला:

"हां, खबरदार पंडितजी! माझ्या खुर्चीवर कां उगाच राग काढतां? लोकांचीं भाडीं बुडवितां आणि वर दुसऱ्याच्या खुर्च्याही मोडून टाकतां काय! आज रविवार आहे, खुर्ची मोडली तर दुकानाचं काम कसं होईल?"

सोपानाच्या बाजूनें कंपॉझिटरनींही गडबड माजविण्यास आरंभ केला. तेव्हां तर पंडितजींची खात्रीच झाली कीं, अनृतहारींत पूर्वीं आपण लेख देण्याचें नाकारलें होतें, त्याचाच सूड बळवंतरावांनीं आजच्या सत्कार-समारंभाच्या मिषानें घेतला असावा! या कल्पनेनें पंडितजींचा राग अनावर झाला व ते ताडकन् 'सभागृह' सोडून चालते झाले.

दलपतरामभाईनें लिहून आणलेलें भाषण तसेंच खिशांत राहिल्यामुळें आणखी एकवार आपला ब्लॉक अनृतहारींत छापून येण्याची संधि फुकट जाणार कीं काय याची त्यांना धाकधूक वाटूं लागली. परंतु बळवंतरावांनीं दलपतरामभाई जुनें बिऱ्हाड बदलून नव्या बिऱ्हाडांत राहावयास गेल्याबद्दल अभिनंदन करण्याच्या निमित्तानें तो ब्लॉक पुढल्याच अनृतहारींत छापून मित्र-चिंता दूर केली !

पण आपण निर्भेळ सत्यकथन केलें असतांही पंडितजीसारख्या विद्वान् म्हणविणाऱ्याचें पित्त इतकें कां खवळलें याचें गूढ मात्र इमारतीचे कॉन्ट्रॅक्टर श्री. कालवार यांना उलगडलेलें नाहीं ! !

तालुक्याच्या पुढारीपणासाठीं केलेल्या या खटाटोपाचें असें पर्यवसान झालेलें पाहून बळवंतरावांनीं मात्र मनाशीं खूणगांठ बांधली कीं, विद्वान् व शिकलेल्या लोकांच्या नादीं लागून पुढारीपणाऐवजीं फजीतीचे प्रसंग ओढवन घेण्यापेक्षां सदू पानपट्टीवाला व सोपाना सलूनवाला यांच्या साहाय्यानेंच आपली मोहीम चालू ठेवल्यास कांहीं बनलें तर बनण्याचा संभव आहे !

# समाधि-लेखांतील विनोद

खिस्ती व मुसलमानी धर्मांत मृत देह हिंदु रिवाजाप्रमाणें जाळण्यांत येत नाहीं, तर प्रेतें स्मशानभूमींत पुरण्याची चाल आहे. या चालीचे धार्मिक किंवा आरोग्यविषयक नफेतोटे काय असतील ते असोत; पण त्यांपासून वाङ्मयाच्या दृष्टीनें मात्र थोडा फायदा झाला आहे, हें विधान चमत्कृतिपूर्ण दिसलें तरी तें खरें आहे. प्रेतें पुरण्याच्या या चालीपासून शिल्पकलेचा तर फारच मोठा फायदा झाला आहे. ताजमहालसारखे अप्रतिम शिल्पकलेचे नमुने आपल्या प्रिय आप्तेष्टांच्या स्मृतीचें स्मारक करण्याच्या पोटींच जन्मास आले आहेत हें सर्वश्रुतच आहे. अनेक श्रीमंत लोकांनीं स्वतःच्या ऐपतीप्रमाणें आपल्या प्रिय मृत व्यक्तींचीं सुंदर थडगीं बांधलीं आहेत. जगांतील कांहीं नयनमनोहर इमारती या स्वरूपांत आपल्याला मिळाल्या आहेत.

मृत व्यक्तीला पुरल्यानंतर तेथें कांहीं तरी खूण, निदानपक्षीं क्रूस तरी ठेवण्याची पद्धति खिश्चन लोकांत आहे. या खुणेला 'समाधिलेख' (Epitaphs) म्हणतात. पुष्कळदां या स्मृतिलेखांत मृत व्यक्तीचें नांव व मृत्यूची तारीख यांपलीकडे दुसरा मजकूर नसतो. परंतु मनुष्यस्वभावाची गंमत अशी आहे कीं, मिळालेल्या संधीचा भरपूर फायदा घेऊन आपला मानसिक कंडू शमवून घ्यायचा. याच वृत्तीच्या पोटीं स्मृतिलेख काव्यबद्ध करण्याच्या पद्धतीचा जन्म झाला व बरेचसे समाधिलेख कविताबद्ध विलसूं लागले. या काव्यांत केव्हां मृत व्यक्तीचें सरळ वर्णन, केव्हां तिच्या एकाद्या ठळक दोषावर केलेला विनोद, केव्हां तत्त्वज्ञानी विचार अशी विविधताही दिसून येऊं लागली. अशा स्वरूपाचे समाधिलेख म्हणजे कळत न कळत वाङ्मयांत घातलेली भरच नव्हे का?

अशा प्रकारचे स्मृतिलेख एकत्र करून त्यांचें एकादें पुस्तक छापलें तर तें वाचकांची भरपूर करमणूक करील यांत शंका नाहीं. हे समाधिलेख कित्येक वेळां किती मार्मिक, विनोदी व वाचनीय असतात याची मराठी वाचकांना थोडीफार कल्पना यावी या हेतूनें कांहीं इंग्रजी समाधिलेखांचें मराठी काव्यबद्ध भाषांतर या लेखांत देण्याचें योजिलें आहे. हें 'काव्य' वाचून मृत्यूच्या सान्निध्यांतही मनुष्याची विनोदबुद्धि कशी जागृत राहते याचें कौतुक तर वाटतेंच; पण त्याबरोबरच मानवी स्वभावांतील वैचित्र्याचें जें दर्शन या लेखांतून होतें तेंही मनोरम भासतें. मृत्यूच्या दरबारांत हा राव, हा रंक, हा थोर, हा लहान, हा पुरुष, ही स्त्री असा भेदाभेद नाहीं असें म्हणतात. अर्थातच समाधिलेखांतील काव्यलेखकांनीं तसा भेदाभेद न पाळणेंच युक्त आहे आणि म्हणूनच जणूं इंग्लंडच्या राजापासून तों एका भिकाऱ्यापर्यंत सर्व दर्जांच्या मंडळींना या काव्यांत योग्य तें स्थान व उचित तो आहेर मिळाल्याचें दिसून येईल.

❖ ❖ ❖

## राजा

प्रथम इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस् यांचा समाधिलेख पहा. त्यांत उपरोध व वास्तवता यांचें मार्मिक मिश्रण आढळतें —

(मंदारमाला)

भूभाग हा सर्व व्यापूनि येथें सुखें घेइ विश्रांतिला भूपति ।
शब्दांवरी ज्याचिया ना कुणीही कधींही हयातींत विश्वासती ।।
ज्यानें उभ्या जीवनीं एकही ना खुळ्यावाणि शब्दां मुखें काढिलें ।
सूज्ञास साजेल ऐशी कृती ना परी एकही केधवां हो बळें ।।

❖ ❖ ❖

## मुत्सद्दी व भांडवलवाला

राजाच्या खालोखाल मुत्सद्याचा मान! फरान्सचा राजा चौदावा लुई याच्या कारकीर्दींत कोल्बर्ट हा एक मोठाच भांडवलवाला व मुत्सद्दी होऊन गेला. त्याच्यावर फरेंच लोकांचा किती विलक्षण राग होता हें त्याच्या

थडग्यावर लोकांनीं जो समाधिलेख कोरून ठेवला आहे त्यावरूनच दिसून येईल आणि त्या रागाचें कारणही त्यांतच सांपडेल. तें काव्य असें —

(वसंत-गज्जल)

करांचा हा पिता येथें करी निद्रा अतां शांत
प्रभो ! त्याच्या महादोषां करावें माफ स्वर्गांत
दिला देशाप्रती केव्हां जरा विश्राम ना त्यानें—
हयातीं—त्याजला द्यावी अतां विश्रांति ईशानें !

पण एकाच समाधिलेखावर भागलें नाहीं. जणूं काय आपल्या रागाचा उपशम अधिक तीव्र सूडानें व्हावा म्हणूनच फ्रेंच लोकांनीं कोल्बर्टसंबंधीं वरच्याहून अधिक कटु असा आणखी एक स्मृतिलेख कोरला —

घमेंडी, क्षुद्रता यांचा पडे हा पुत्र मातींत
जगे निष्प्रेम जीवन तो मरे, कोणा न हो दुखः !

## लांचखाऊ अधिकारी

मुत्सद्दी झाल्यावर सरकारी अधिकारी आलाच. एका लांचखाऊ अधिकाऱ्याचा हा स्मृतिलेख पहा —

(आर्या)

येथें पहुडे स्वारी स्वस्थ अतां नम्र पूर्ण होऊन ।
अधिकारपदीं असतां केलें लोकांसि त्राहि भगवान ।।
लांचलुचपतीवांचुनि एकहि केलें न काम कोणाचें ।
नाना लटपटि करुनी गाठियलें शिखर आत्मस्वार्थाचें !।।
देशास्तव, स्वजनास्तव हातुन घडलें न एक सत्कृत्य ।
तो एक भाग्यदिन कीं आयुष्याचा तदीय हो अंत ! ।।

## व्यावसायिक लोक

सरकारी नोकरांप्रमाणेंच वकील, डॉक्टर, बँकेंतील कॅशिअर, वृत्त-

पत्राचा संपादक, सावकार वगैरे व्यावसायिक लोकांनाही असले काव्यमय आहेर मिळाले आहेत ते आतां पाहूं.

लॉर्ड ब्रौघाम यानें वकिलाची व्याख्या अशी केली आहे कीं, " वकील तुमची इस्टेट तुमच्या प्रतिस्पर्ध्याकडून सोडवितो आणि स्वतःच बळकावून बसतो." वकिलावरील एक समाधिलेख पहा —

(हरिणी)

अजर करितो केव्हां मोठी चमत्कृति भूप्रती।
वकिल निजला येथें आतां, भला जन तो किती ! ॥

या दोन चरणांना कोणा तरी असंतुष्ट पक्षकारानें मागाहून पुढील पुस्ती जोडून समस्या पुरी केली आहे —

नवल नच हें न्यायाचें कीं विडंबन केवढें।
वकिल निजला, खालीं त्याच्या अशीलहि चीरडे ! ॥

## डॉक्टर

डॉक्टर चार्ड नामक एक डॉक्टरमहाशय होते. त्यांची प्रॅक्टिस मोठी होती, पण त्यांच्या हाताला यश मात्र बेताचेंच असे. म्हणून त्यांच्या कांहीं पेशंटांनीं डॉक्टरांच्या थडग्यावर पुढील काव्य कोरलें —

(आर्या)

चार्ड महाशय डॉक्टर घेती विश्रांतिला इथें आतां।
निम्में स्मशान भरलें ज्यांनीं देऊनि औषधें लोकां ॥

## संपादक

नियतकालिकाच्या एका संपादकाचें समाधिलेखांतील पुढील वर्णन सर्वस्वीं खरें नसलें तरी मनोरंजक आहे खास —

(स्वागता)

पत्रपंडित इथें करि निद्रा ।
चाळवूं बघुं नका परि मुद्रा ।।
प्रार्थना तुज कृपा करि ईशा ।
शांत झोंप करूं दे चिर त्याशीं ! ।।

जीवनार्थ श्रमवी निज बुद्धी ।
नित्य सांगत असत्यच गोष्टी ।।
जोंवरी कर असत्य कथा दे ।
तों करी व्यतित जीवन मोदें ।।
संपता परि असत्य-शिदोरी ।
मृत्युला शरण जायच स्वारी ! ।।

## लबाड भाषण

पण खोटें बोलणें हा कांहीं संपादक लोकांचाच एकमेव मक्ता नव्हे. एका गांवीं विलियम् नामक एक इसम खोटें बोलण्याबद्दल इतका कुप्रसिद्ध झाला होता कीं, त्याच्या शब्दांवर कधींच कोणीं विश्वास ठेवला नाहीं. तो मेल्यावर त्याच्या आप्तेष्टांनीं त्याच्या थडग्यावर पुढील समाधिलेख कोरला—

(वंशस्थ)

रडूं नका हो मजसाठिं सज्जन ।
न मृत्यु माझा, करि झोंप मी क्षण ।।

हा समाधिलेख विलियमच्या खोटें बोलण्याच्या कीर्तीला इतका साजेसा होता कीं, त्याच्या शेजाऱ्यांनीं त्याच्याच खालीं पुढील श्लोक कोरून आपला विनोदकंडु शमवून घेतला —

विमुक्त चिंता-सुख-दुःख भीतरीं ।
सुशांत होई तनु तेंवि वैखरी ।।
असत्य भाषा जगिं बोलला मुखीं ।
विलोकिं चाले व्रत थोर तेंच कीं ! ।।

## स्वतःचा समाधिलेख

एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत बँक ऑफ इंग्लंडमध्यें अब्राहम न्यूलंड नामक एक गृहस्थ चीफ कॅशिअर होता. आपल्या समाधि-लेखांत आपल्या मृत्यूनंतर कोणीं फाजील 'काव्यात्मकता' दाखवूं नये म्हणू-नच जणूं त्यानें स्वतःच स्वतःचा समाधिलेख पुढीलप्रमाणें निवडून ठेवला आहे.

(आर्या)

हचा दगडाच्या खालीं अब्राहम वृद्ध घेइ विश्राम ।
मोद न त्याचा कोणा, दुःख न कोणा, करी कोण प्रेम ? ॥
गेला कोठ तो वा आहे त्याचें कसें कुणा ठावें ।
कोण करी पर्वा ही ? उगवत होता तियेस वंदावें ! ॥

## कृपण व सावकार

कृपण व सावकार यांच्यावर अशा 'काव्या'चा वर्षाव जरा सढळ हातानेंच व्हावा हें साहजिकच आहे. त्याचे कांहीं नमुने येथें देतों —

(वैशाख मास)

व्याजमूर्ति साहुकार येथ पहुडले ।
एकोत्र्याविण न कधीं कर्ज तें दिलें ॥
अधिकाधिक मिळलें धन, व्याजिं लाविलें ।
अधिकास्तव आणि पुन्हां जीव तळमळे ! ॥
केविं अशा शांति मिळे हावऱ्या जिवा ? ।
रक्षशील प्राण तदिय केविं तूं शिवा ? ॥

कृपण व्यक्तीवर काव्य रचतांना मुळींच कृपणपणा न करण्याचाच जणूं बाणा असलेल्या लोकांचा तसल्या काव्यमय विनोदाचे आणखी दोन मासले पहा —

(वैशाख मास)

मस्त् मंजुषेंत येथ जीव झोंपला ।
पैशाविण मोद न कधिं त्यास भेटला ! ॥

समाधान भावना न त्यास माहित ।
क्रोडोपति म्हणति जरी लोक त्या नित ।।
भरलि तिजोरी पूर्णा—गरिब तो तरी ।
अधिकाचा शोष पडुनि जाइ अंबरीं ।।

*  *  *

कृपण इथें काळझोंप शांत काढितो ।
दिडकीचा खर्च न ये म्हणुनि हर्षतो ।।
नव वार्षिक भेटीस्तव खर्च येतसे ।
चुकविण्यास पूर्व दिनीं मरण पत्करितसे ! ।।

ता० ३१ डिसेंबरला गतप्राण झालेल्या एका कंजुष माणसावर केलेला हा विनोद कल्पकतापूर्ण वाटतो.

## कर्जदार

सावकाराप्रमाणेंच कर्जदारही या काव्याचे मानकरी झालेले आहेत. टॉम नामक एक गृहस्थ आपलें कर्ज न फेडतांच परलोकीं गेल्यानें बुडालेल्या सावकारानें त्याच्यावर पुढील आर्या रचून आपली तहान शांत केली —

अंतिम ऋण थोर दिलें, जाई स्वर्गास टॉम शांत मनें ।
अंतिम ऋण ? छे, न तयें दिधलें कधिं परत घेतलें उसनें ।।

## प्रामाणिक माणूस

याच्या उलट हातउसने घेतलेले जिन्नसही परत देणाऱ्या एका शेजाऱ्याचा मरणोत्तर करण्यांत आलेला आश्चर्यगर्भ गौरव पहा —

(शार्दूलविक्रीडित)

येथें घेत सुशांत झोंप पहुडे हा मेरु प्रामाणिक ।
देणीं तेंवि ऋणें दिलीं सकल तें, चित्तीं नको कंटक ।।

शेजारी गुण एक दुर्मिळ जगीं त्याचा सदा वानिती ।
देई वापस घेतली उसनि तो वस्तू असो कोणती ! ।।

येथवर कांहीं व्यावसायिकांवरील समाधिलेखांचे नमुने दिले. आतां कांहीं व्यक्तींच्या प्रमुख 'गुणां'चे त्यांच्या चाहत्यांनीं त्यांच्या समाधिलेखांत कसें कायमचें स्मारक करून ठेवलें आहे तें पहा—

दिसेल त्या खाद्यावर हात मारण्याची संवय असलेल्या जोसेफ जोन्स नामक एका आधुनिक बकासुराला अजीर्णानें प्राप्त झालेल्या मृत्यूचें पुढील आर्याबद्ध विनोदी वर्णन खुसखुशीत साधलें आहे—

जोसेफ जोन्स याच्या मृत देहातें समाधि येथ मिळे ।
जें जें खाद्य दिसे तें बकासुरासम खुशाल उदरिं गिळे ।।
असाच एके दिवशीं पक्वान्नीं हात आडवा मारी ।
येऊन तडस उदरां तळमळला, काळझोंप त्या घेरी ! ।।

## ब्रह्मचारी

एका आजन्म ब्रह्मचाऱ्याच्या थडग्यावरील पुढील समाधिलेखांत त्याच्या बापालाही ब्रह्मचारी राहण्याचा सुविचार कां सुचला नाहीं म्हणून जो शेवटीं प्रश्न केला आहे त्यांत उपरोधाचा भाग नसेलच असें म्हणतां येत नाहीं.

(दिंडी)

साठ उमरीचा वृद्ध घेइ शांति ।
इथें, नाहीं काळजी जरा चित्तीं ।।
पाश कुठले मानवी ब्रह्मचाऱ्या ? ।
तात कां ना करि याच सद्विचारा ? ।।

येथवर फक्त पुरुषांच्याच समाधिलेखांचें वर्णन झालें आहे. पण त्यावरून कोणीं असा गैरसमज करून घेऊं नये कीं, मरणोत्तर स्त्रियांची अशी संभावना करण्यास ख्रिश्चन लोकांचें सुप्रसिद्ध स्त्रीदाक्षिण्य आड येत असावें.

तसा प्रकार मुळींच नाहीं. स्त्रियांनाही या विनोदबुद्धीचा प्रसाद मिळाला आहेच. कसा तो पहा —

एका बहुप्रसवा स्त्रीचा समाधिलेख प्रथम देतों.

(अनुष्टुप्)

लेंकरें कोणा असतीं । त्याविना कोणी जगती ॥
येथें विश्रांति घे साची । माता वीस लेंकरांची ॥

## प्रेयसी व प्रेमी

सारा विल्स नामक एका स्त्रीचा जिम क्रो हा प्रियकर होता. अतिरिक्त औषधांच्या सेवनानें सारा मृत्यु पावली. आपल्या प्रेयसीच्या मृत्यूनें जिम क्रोला इतकें दुःख झालें कीं, तो हृदयक्रिया बंद पडून मरण पावला. तेव्हां त्या उभयतांच्या प्रेमाचें लोकांनीं पुढीलप्रमाणें स्मारक त्यांच्या समाधीवरील लेखांत कोरून ठेवलें —

(जाति—कोकिळा)

औषधपाणी सदा सेवुनी
सारा विल्सहि मरे झिजोनी
अस्थि तिच्या ठेविल्या पुरोनी
तिच्या प्रीतिचा ध्यास घेउनी जिम क्रो सोडी प्राण !

## पतिपत्नी

सारा विल्सचा प्रियकर जिम क्रो याचें व तिचें लग्न झालेलें नव्हतें म्हणूनच बहुधा तिच्या मृत्यूनें तो इतका दुःखित झाला असावा. कारण विवाहोत्तर पत्नीच्या मृत्यूनें पति दुःखित होण्याऐवजीं आनंदित होण्याचाच योग अधिक येतो असें पुढें दिलेल्या तीनचार समाधिलेखांवरून दिसून येतें. या उदाहरणांत पतीनें आपल्या मृत पत्नीच्या थडग्यावर कोरलेल्या समाधिलेखांत दुःखाऐवजीं सुटकेच्या आनंदाचाच ध्वनि ऐकूं येतो.

ड्रायडन या विख्यात इंग्लिश कवीनें आपल्या पत्नीच्या थडग्यावर लिहिलेलें पुढील काव्य उपरोधपूर्ण आहे —

(साकी)

येथें पुरलें मम पत्नीच्या मृत देहातें—निजो सुखें,
मिळे शांतता जिवाला तिच्या, तेंवि माझिया जिवा, सखे !

आणखी एक नमुना पहा. तोंडाळ बायकोच्या मृत्यूनें नवऱ्यास पुढील काव्य स्फुरलें आहे —

(जाति–चंद्रकांत)

मम जीवाची सखी सहचरी सुखें निजे येथें ।
देउनि अपुल्या रजा सकलही पार्थिव कष्टांतें ।।
थोर ईश्वरी कृपा ! लाभु दे मृतात्म्यास शांती ।
आणि त्यासवें शेजाऱ्यांच्या किटल्या कर्णांप्रती ।।

आणखी एक पतिराज आपल्या मृत पत्नीच्या समाधीवरील कवितेंत लिहितात —

(शार्दूलविक्रीडित)

माझा जीवनमोद सर्व भरला या गोड रम्य स्थळीं ।
पुष्पें सुंदर वाढतीं नित, सखी अदृश्य त्याच्या तळीं ! ।।

एका भांडकुदळ स्त्रीच्या समाधीवर पुढील काव्य कोरण्यांत आलें आहे—

(मंजिरी)

ह्या दगडाखालीं ढिगाऱ्यांत मातिच्या ।
इस्तबेल यंग ही आधिन हो मृत्युच्या ।।
मे चोविस दिवशीं प्रथमच निज जीवितीं ।
पागबंद अपुल्या जिभेस घालित ती ! ।।

## पतिपत्नींचें द्वंद्व

आणखी एक नमुना फारच मासलेवाईक आहे. आपल्या मृत पत्नीच्या समाधिलेखांत कोणा एका पतीनें पुढील काव्य लिहिलें—

(द्रुतविलंबित)

प्रिय सख्या, न रडाच, उगी रहा ।
मृत न मी, परि झोंपत ही पहा ॥
मन तयार करा मरणाप्रती ।
जिथ सखी तिथ येइ तिचा पती ॥

या श्लोकाखालीं कोणींतरी वाटसरूनें पेन्सिलीनें पुढील पुरवणी जोडली—

जिवलगे ! न रडे तुजसाठिं मी ।
मजशि पत्नि मिळे दुसरी तमीं ॥
तिजशि रंजविण्या मज जायचें ।
तुजकडे न इतक्यांतच यायचें ! ॥

## समाधिलेखांतील तत्त्वज्ञान

समाधिलेखांत केवळ विनोद व उपरोधच सर्वता असतो असें मात्र नाहीं. कित्येक वेळां त्यांत जीवनांतील सुंदर तत्त्वज्ञान मोठ्या चातुर्यानें मांडलेलें आढळतें. अशा तत्त्वज्ञानांत विचारशीलता चांगल्या प्रकारची व्यक्त होते.

आयुष्य ही एक केवळ असार माया आहे याचा अनुभव मृत्युसमयीं जितक्या तीव्रतेनें येतो तितका इतर वेळीं क्वचितच येत असेल. म्हणूनच एका इसमानें स्वतःचा समाधिलेख पुढीलप्रमाणें निवडला असावा—

(आर्या)

आयुष्य एक चेष्टा दाविति साऱ्याच गोष्टि भूवरिला ।
होतें वाटत ऐसें मज तें परि आज ये प्रचीतीला ॥

## भिकारी

एका भिकाऱ्यानें स्वतःच्या भिकार समाधीवर कोरण्यासाठीं म्हणून निवडलेल्या पुढील काव्यांत वास्तवता व मार्मिकपणा यांचा रम्य अनुभव येतो—

(वसंततिलका)

येथें निवांत पसरे तनु कोपऱ्यांत ।
कां कीं गरीब जन मी अगदीं जगांत ॥
श्रीमंत बांधिति जगीं थडगीं विशाल ।
येथेंहि लाभत मला सुख तें—न हाल ! ॥

## मानवी क्षुद्रता

लॉर्ड ब्रौघाम यांनीं स्वतःच आपला समाधिलेख पसंत केला; त्यांत मानवी क्षुद्रता मोठ्या परिणामकारक रीतीनें मांडली आहे. मागें वकिलावरील समाधिलेखांत वकिलाची जी मर्मभेदक व्याख्या दिली आहे तिचें जनकत्वही याच लाटसाहेबांकडे जातें. त्यांची वक्तृत्वाबद्दल प्रसिद्धि होती याची कल्पना त्यांच्या समाधिलेखावरूनही येऊं शकेल.

(रथोद्धता)

अश्रुसिक्त नयनें पहा जरा ।
थोर नैतिक धडा मुशाफिरा ॥
दैव तो शिकवितें अतां मना ।
ठेंच ही बघुनि होच शाहणा ॥

ज्या मला थडगिं एथ पूरिलें ।
तें किती अहह ! देख सानुलें ॥
मीं जगीं कितिक केलिं भाषणें ।
अर्ध भाग नच यांत मावणें ॥

## आमंत्रण व उत्तर

तत्त्वज्ञानांतच मोडणारें आणि आयुष्याचा अधिक गांभीर्यानें विचार करण्यास वाचकास प्रवृत्त करणारें आणखी एक उदाहरण पहा.

एका समाधिलेखांत पुढील प्रकारची चेतवणी जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूंसाठीं कोरलेली होती —

(चंद्र चवथिचा)

बा मुशाफिरा! ऐक रे जरा।
बोल हिताचेच तुला सांगतों खरा ॥
असंसि आजला, जेविं तूं भला।
मींहि एक काळ तेवि खास भोगिला ॥
आज मम स्थिति, देख दुर्गती।
यायची तुजसि हीच अहह! निश्चिती ॥
म्हणुनि रे नर! बोल हे स्मर।
मज अनुसरण्यास चित्त ठेवि तत्पर ॥

या काव्याखालीं कोणातरी मुशाफरानें वरील आमंत्रणाला पुढील मार्मिक उत्तर लिहून ठेवलें आहे —

कोठल्या पथें
जाशि तूं कुठें
कळल्याविण अनुसरणें केविं तुजसि तें?

## जीवित ही खाणावळ

खालीं दिलेल्या आणखी एका समाधिलेखांत मानवी जीविताला खाणावळीची अद्यावत् उपमा देऊन जें कोटिबाज चातुर्य व्यक्त केलें आहे तें तर हृद्य आहेच; पण शिवाय या काव्यांत जीवनविषयक तत्त्वज्ञानही चांगल्या प्रकारचें असल्यानें काव्य म्हणूनही या चुटक्याची योग्यता बऱ्यापैकीं ठरेल.

(केशवकरणी)

जीवित म्हणजे भली थोरली गमते खाणावळ।
प्रवासी लोकांची वर्दळ ॥
कांहीं केवळ करुनि न्याहरी परतुनि जाती त्वरें।
अल्पसंतुष्टच गमती खरे ॥
कुणी राहती भोजन करण्या, तृप्त होइ अंतर।
देती संतोषें ढेकर ॥

वृद्ध कुणी घे फक्त फराळा, जाइ त्वरित झोंपण्या ।
घाई 'हाक' होइ ऐकण्या ॥
सर्व दिवसभर इथें राहि जो, देणें त्याचें फुगे ।
खर्च किति वाढतात वाउगे ॥
त्वरित परततो निजधामातें तोच ठरे शाहणा ।
संयमीं गोडीं, नच यातना ॥

आणखीही अशा प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील; पण येथवर दिलेल्या नमुन्यांवरून समाधिलेखांतसुद्धां कित्येक वेळां तत्त्वज्ञान, काव्य, विनोद, उपरोध यांचा आढळ कसा व किती होतो याची कल्पना वाचकांस येण्यासारखी असल्यानें आणखी मासले देऊन लेख लांबविण्याची जरुरी नाहीं. दिलेल्या उदाहरणांमध्यें विविधतेकडे अधिक लक्ष देऊनच उताऱ्यांची निवड केलेली आहे. इंग्रजी काव्याचा अनुवाद शक्य तों मुळाबरहुकूम करण्याकडे कटाक्ष ठेवला आहे. वाङ्मयदृष्टया हे समाधिलेख कित्येक वेळां किती वाचनीय असूं शकतात हें वाचकांच्या ध्यानीं आणून देणें एवढाच या लेखाचा उद्देश आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
४०३१
REFBK-0005031